श्रीसद्गुरु ब्रह्मचैतन्यमहाराज
- गोंदवलेकर -

यांचे

संक्षिप्त चरित्र



श्रीसद्‌गुरु ब्रह्मचैतन्यमहाराज

(गोंदवलेकर)

यांचे

संक्षिप्त चरित्र

लेखिका

सौ. मंदाकिनी भास्कर सोमण

मूल्य पंधरा रुपये

❑ **प्रकाशक / कार्यवाह :**

श्री. ग. दामले

© 'चैतन्योपासना'

श्री सद्‌गुरु ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर (संस्थान)

मु. पो. गोंदवले (बु.), ता. माण,

जि. सातारा. पिन - ४१५ ५४०

दूरध्वनी - ०२१६५ २५८२९२

❑ **मुद्रक :**

श्रीकांत मुद्रणालय

पुणे ४११ ०३०.

❑ **चवथी आवृत्ती :**

गुरुपौर्णिमा

रविवार, २९ जुलै २००७

❑ **संपर्क पत्ता :**

विश्राम पाठक

२०२, साईकुंज सोसायटी,

५६९, नारायण पेठ, पुणे ४११ ०३०

❑ **प्राप्तीस्थळ :**

चैतन्य सदन

४/१०, एरंडवणे, कर्वेरोड, नळ स्टॉप जवळ,

(लागू बंधू मोतीवाले शेजारील गल्ली)

पुणे - ४११ ००४.

वेळ : संध्याकाळी ६ ते ८

दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

पहिल्या आवृत्तीचे प्रकाशक व लेखक या दोघांनी सदर पुस्तकाचे प्रकाशनाचे सर्व अधिकार कायमस्वरूपी चैतन्योपासना संस्थानला दिले व लेखकांनी या पुढील आवृत्त्या संस्थानने छापाव्या अशी विनंती केलेवरून संस्थानने ती आनंदाने मान्य करून ही आवृत्ती छापली आहे.

चैतन्योपासना
गोंदवले बु।।

।। श्रीराम समर्थ ।।

हृद्‌गत

माझे लहानपण, म्हणजे वयाच्या १५ वर्षांपर्यंत, दिल्लीलाच गेले. तेव्हा पाकिस्तान झाले नव्हते. दिल्लीला स्त्रिया सर्रास बाहेर जात नसत. मात्र उत्तर हिंदुस्थानात 'तुलसी रामायण' फार प्रख्यात व गोड असल्याने यमुनेवर स्नानाला जाताना बहुतेक लोक दोहे, चौपाया म्हणत जात असत. ते सहजच कानावर पडत असे. तुलसी रामायण फार भावपूर्ण आहे.

माझे वडील नेहमी, लहान मुलास खांद्यावर टाकून फिरवीत असताना "राम राम. राम राम. सीताराम सीताराम," असे सारखे म्हणत असत. दासबोध रोज वाचत असत. आई खूप निस्पृह होती. देवाला साक्ष ठेवून सर्व कामे करायची व "देव माझा सारथी आहे" असे म्हणायची. माझी काकू नेहमी भाषांतरित तुलसी रामायण वाचीत असे. 'श्रीराम, श्रीराम' असे १०८ वेळा लिहून तो कागद मारुतीच्या पायापाशी ठेवायला आम्हाला सांगत असे. तेव्हा मी पण तसेच लिहून आणखी एक कागद तेथे ठेवीत असे. ती उन्हाळ्यात छोट्या खुजात (सुरईत) गार पाणी देवासाठी ठेवीत असे व देवाला वारा घालीत बसे. थंडीत देवाला गरम पाण्याने आंघोळ घालीत असे. सगुणाची ही सेवा होती. देव प्रत्यक्ष तेथे राहतो ही तिची भावना होती. तसेच गोदामाचे रक्षक एक पंडितजी होते. ते सकाळी 'जमुनाजी'वर स्नान करून आले की गात बसत असत. घोगरा, जाडा आवाज होता त्यांचा. पण भावना होती. ऐकायला फार गोड वाटायचे. ते म्हणायचे,

"कैसो बैठो हे आलसमे, तोपे राम कहयो नही जाय.
तोपे किसन भजो नहीं जाय ।
भयो भयो मलमल मूह धोयो, दिन चढते ही उधार टटोयो,

बातन बातन सब दिन खोयो, कैसे बैठो हे आलसमे
तोपे राम कहयो नही जाय ।''

या सर्वांचे संस्कार माझ्या मनावर बालपणीच झाले व नामाचा प्रेमा निर्माण झाला. १९४१ साली लग्न झाले. माझ्या सासूबाई जप करीत असत माळेवर. त्यामुळे माळ हातात घ्यायला संकोच अगर लाज वाटली नाही.

प्रपंचात काय, अगर परमार्थात काय, दोघांचे एकमत असेल तर सुलभ जाते. आम्हाला दोघांनाही नामाबद्दल आदर व प्रेम होते म्हणून १९७३ साली आम्ही 'गोंदवलेकर महाराजांचा' अनुग्रह घेतला. तत्पूर्वी १९६५ साली मी मनानेच महाराजांना गुरु मानून जपाला सुरुवात केली होती.

संसार म्हटला की सुखदुःखाचे मिश्रण असणारच. तसा चारचौघांसारखा संसार बरा झाला. फार मोठ्या सुखाच्या राशीवर नव्हते तसे दुःखही नव्हते. सगळेच मध्यम होते. जीवनामध्ये खरा आनंद, खरी मजा, आंतरिक समाधान हे सर्व महाराज जीवनामध्ये आले आणि मला मिळाले. प्रपंचापेक्षा परमार्थात, नामात, खरीच गंमत आहे. नाम हे सर्व साधनांचा राजा आहे. उपाधिरहित, सोपे आहे. जो जो घ्यावे तो तो समाधान देतच जाणार. संसारापासून मनाने सोडवायला उपयोगी पडते केवळ नामच. संसार कोणाला सोडता येत नाही. तो सुटत नाही, कारण देह हाच मोठा संसार आहे. संसारात ज्यांच्याकरिता आपण खूप कष्ट सोसतो, ज्यांच्यावर खूप प्रेम करतो, माझे माझे म्हणून मान, अपमान सहन करतो ते केवळ जाणिवेचे ओझे असते, हे नामाने उमगते. मग अपेक्षा रहात नाही. अपेक्षा नाही की दुःख नाही. हे सर्व नामच करते. नाम फार महान आहे. गुरुकडून घेतलेले नाम फार प्रभावी असते. ते कर्तेपणाची जाणीव घालविते

नमस्कार!

सौ. मंदाकिनी भास्कर सोमण

।। श्रीराम समर्थ ।।

हेचि मागणे गुरु राया

सद्‌गुरुराया तुजपाशी । आले काही मागावयासी ।
ठाव देई चरणापाशी । हेचि मागणे गुरुराया ।।१।।

कान तुझी कथा ऐको । नेत्र तुझे रूप देखो ।
जिव्हा नामस्मरणी टिको । हेचि मागणे गुरुराया ।।२।।

मत्सर कोणाचा न व्हावा । मनी ताठा नुपजावा ।
नम्रता येवो स्वभावा । हेचि मागणे गुरुराया ।।३।।

कोणाचीही नको निंदा । लबाडीचा नको धंदा ।
भजनाच्या लावी छंदा । हेचि मागणे गुरुराया ।।४।।

उपजोनी सात्विक भावा । नरदेह सार्थकी लावावा ।
सोलीव आनंद लुटावा । हेचि मागणे गुरुराया ।।५।।

दोषाची मी असे खाण । परी तुझी म्हणविते जाण ।
कृपेची न पडो वाण । हेचि मागणे गुरुराया ।।६।।

देह तूचि देही तूच । जगत्रयी अवघा भरला तूच ।
चित्तास देई चिंतन हेच । हेचि मागणे गुरुराया ।।७।।

पुढे तूचि मागे तूच । आत बाहेरी असती तूच ।
आता आणी प्रचितीस । हेचि मागणे गुरुराया ।।८।।

आता करिते तुजसी नमन । नमना वीण काही न आन ।
नमन 'न मन' नामस्मरण । हेचि मागणे गुरुराया ।।९।।

- श्लोक -

घडो मजसि संगती सतत सज्जनांची हरी ।
जडो मन पदी पडो तव कथा ही कानावरी ।।
असोच रसना सदा रत तुझ्या सुनामामृती ।
करोत करं सर्वदा भजन हे तुझे निश्चिती ।।

- जय जय रघुवीर समर्थ -

श्रीराम-समर्थ

सूर्याने आपले प्रकाशकिरणांचे धन चौफेर उधळले होते. अवनी तेजात नाहून निघत होती. माघ महिन्यातला सकाळचा सुखद गारवा सुखवीत होता. विठ्ठल मंदिरातले एकादशीचे भजन द्वादशी उजाडली तरी संपले नव्हते. रंग फारच चढला होता. शेवटी पांडुरंगाची आरती सुरू झाली.

''आज करोनी आरती चक्रपाणी ओवाळती ।
आजी पुरले नवस धन्य काळ हा दिवस ।।''

आरतीला सुरुवात झाली. निरांजनात ज्योत तेजाने तळपत होती. आरती संपून तबक खाली ठेवले गेले आणि एक आनंदाची बातमी लिंगोपंतांचे कानावर आली.

''ऐकलं कां? लिंगोपंतांना नातू झाला.'' जणू आरतीच्या ज्योतीनं नामाची ज्योतच लावली गेली होती. पण हे कोणाला ठाऊक? सर्वत्र एकदम आनंदाचे वातावरण पसरले. भजनाचा आनंद होताच त्यात हा प्रापंचिक आनंदही मिसळला. जो तो ज्याला त्याला सांगू लागला, ''अहो, लिंगोपंतांना नातू झाला. गीतामाईला मुलगा झाला'' अगदी छानच झालं पाहा! थोड्याच वेळात सर्वत्र ही गोड बातमी

वाऱ्यासारखी पसरली. सर्वांनाच मनापासून आनंद झाला. त्याला कारणही तसेच होते. माणसाने जर दुसऱ्यावर निःस्वार्थी प्रेम केले असेल, तर उलट पक्षी त्याला प्रेमाचा वर्षाव अनुभवायला सापडतो. लिंगोपंत गावचे कुलकर्णी होते. ते सर्वांवर अतिशय प्रेम करीत असत आणि त्यामुळे त्यांचा आनंद हा गावचा आनंद झाला होता. कारण तसेच होते.

लिंगोपंतांचे पूर्वज गोंदवल्याला आले होते. त्यांचे मूळचे आडनाव घुगरदरे. वावरहिऱ्याचे. गोंदवल्याजवळचे हे गाव. तेथे त्यांचे पूर्वज राहत असत. पण काही कारणांनी ते गोंदवले येथे आले व कुलकर्णीपद सांभाळू लागले. लिंगोपंत हे प्रस्तुत चरित्रनायकांचे आजोबा होत. त्यांनी कारभार फार चांगला सांभाळला होता. ते फार प्रेमळ, दयाळू, परोपकार करणारे होते. सर्वांनाच ते चांगला न्याय मिळवून देत असत. सर्वांकडे पाहण्याची त्यांची दृष्टी सहानुभूतीची होती. 'भूतमात्री परमेश्वर' हे भागवत धर्माचे तत्त्व त्यांचे मनी चांगलेच बाणले होते. ते दर शुद्ध पक्षातल्या एकादशीला पंढरपूरला जात असत. त्यांची वारी होती. सकाळी उठून, प्रातःस्मरण करून, सर्व विधी आटोपून ते जपाला बसत असत. ज्ञानेश्वरी-वाचन, पांडुरंगपूजा सर्व काही नित्यनियमाने भक्तिभावाने चालत असे. हरिपाठ म्हणत असत. सोमवार, गुरुवार, एकादशीला पांडुरंगासमोर भजन होत असे. या पांडुरंगाचे एक वैशिष्ट्य होते. तो लिंगोपंतांच्या विनंतीवरून आपण होऊन आला होता. त्याचे असे झाले-

लिंगोपंतांनी खूप वर्षे वारी केली. पण म्हातारपणामुळे त्यांना हे जमेना. त्यांना अगदी मनापासून वाईट वाटले. ते डोळ्यांत पाणी आणून भगवंताला म्हणाले, "पांडुरंगा, आता मला नाही रे येता येत - तुझे दर्शन कसे घेऊ? काय करू? मला कळत नाही." आणि या विचारातच रात्री झोपी गेले. तो त्यांना स्वप्न पडले. त्यात 'मळ्यातल्या झाडाखाली खण, मी तेथे आहे." हा दृष्टांत झाला. तो खरा मानून ते पालखी घेऊन तेथे गेले. हातभर खणल्यावर 'खण्' असा आवाज आला. हातानी खणले तो - (आता गोंदवल्यात आपण पाहतो त्या) विठ्ठल-रखुमाईच्या मूर्ती सापडल्या. त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. डोळ्यांतून सारखे आनंदाश्रू वाहात होते. खरेच देव भावाचा भुकेला असतो. नाही का?

त्या या सुंदर मूर्ती. त्यांचेच चाललेले भजन आणि त्यातच नातू झाल्याची गोड बातमी आली होती. जणू त्रिवेणी संगमच!

लिंगोपंतांनी देवाला नमस्कार केला. भजनी मंडळी प्रसाद घेऊन आनंदात घरी गेली. लिंगोपंत घराकडे परतले. राधाबाई- त्यांच्या पत्नी समोरच दिसल्या. दोघांच्याही डोळ्यांत आनंदाचे समाधान दिसत होते. लिंगोपंतांनी राधाबाईंना विचारले, "रावजी कोठे आहे? बाळाला पाहिले का?" असं विचारण्याचं कारण म्हणजे रावजी संसाराच्या बाबतीत जरा उदासच असत. सतत वाचन-चिंतन चालायचे. कुलकर्णीपणाचा कारभारही अजून त्यांनी आपल्याकडे घेतला नव्हता. लिंगोपंत बाळंतिणीच्या खोलीकडे गेले. राधाबाई

बरोबर होत्या. बाळाला पाहिले - काळे कुरळे जावळ, टपोरे डोळे, गौर वर्ण, गुटगुटीत बांधा, सरळ नाक - लिंगोपंतांना फारच समाधान झाले. त्यांना सर्वांत भावले - ते म्हणजे बाळाचा सात्त्विक चेहरा आणि त्यांच्या मनात आले 'हे काम काही वेगळेच दिसत आहे.'

बाळाच्या आईला- गीतामाईला- आपल्या सुनेला लिंगोपंत म्हणाले, "काय गीता, बरी आहेस ना?" अशा प्रेमळ चौकशीने गीतामाय अगदी भारावून गेली. ती सासू-सासऱ्यांची लाडकी सून होती. सासूच्या कर्तृत्वाच्या पुढे एक पाऊल अशी होती. अगदी मनासारखी सूनबाई मिळाली होती. सर्वांना तिजविषयी प्रेमच वाटायचे. कोणाला बरे नसले की तो घरी यायचा. म्हणायचा, "गीतामाय, तुझ्या हातचा भात खाल्ला गेल्यावेळी आणि लगेच ताकद आली बघ." गीतामाय लगेच ओळखायची आणि कोणाला भात, कोणाला लोणचे, कोणाला ताक असे अगदी आवर्जून द्यायची. तसेच कुंची, अंगडे, टोपडे, कपडे हेही द्यायची. कोणाला काही, कोणाला काही असे वाटत असायची. काहीही अडचण आली, तरी गीतामाय ती सोडवते असेच कोणालाही वाटत असे आणि हीच गोष्ट लिंगोपंतांना फार पसंत असे.

"गीता, बरी आहेस ना?" असे सासऱ्यांचे शब्द ऐकून तिला फार बरे वाटले. जणू सर्व शीण गेला. शब्द हे शस्त्र आहे. एखादा शब्द हृदयाच्या चिंधड्या चिंधड्या करतो, दुःख देतो, पण एखादा शब्द अमृताचा सुखद वर्षाव करतो. शब्दांत फार मोठी ताकद आहे. म्हणून

ते जपून वापरावेत म्हणतात. ज्ञानेश्वरीमध्ये एक ओवी आहे. ''साच आणि मवाळ। मितले आणि सरळ। बोल जैसा कल्लोळ। अमृताचे।।'' रामदास तरी हेच सांगतात, ''जगापाशी जग मित्र। जिव्हेपाशी असे सूत्र।।'' अगदी खरे आहे.

सर्वत्र बातमी पसरली. घरी माणसांची बाळाला पाहायला गर्दी होत होती. सर्वांना साखर वाटली आणि बारशाचा दिवस जसा जवळ आला, लिंगोपंतांनी सर्व गावाला बोलावले. ते कोणाला वगळणार? गावचे कुलकर्णी होते ना ते! सर्व गावच त्यांचे होते आणि गावाचे तर एवढे प्रेम होते की, ज्याला निरोप पोहचू शकला नाही तो म्हणाला, ''बोलावणे कशाला हवे? ते आम्हाला बोलावणारच. आपण जायचे.'' खरेच आहे. जेथे शुद्ध प्रेम असते तेथे अपेक्षा, अहंकार, कुरकूर, मानापमान नसतातच मुळी. बारशाची जेवणे झाली. संध्याकाळी सर्व बायका ज्याच्या त्याच्या शक्यतेनुसार अंगडी, टोपडी, कुंची, दुपटी वगैरे बाळंतविडा घेऊन आल्या. खूपच गर्दी झाली. पाळणा सजविला. बाळाला तीट-काजळ लावले. नवीन कपडे घातले. तसेच जिवती, साखळी, वाळे, बिंदल्या, मनगट्या, गळ्यातील साखळी सर्व डाग घातले. बाळ फारच मोहक दिसत होता. 'कुणी गोविंद घ्या कुणी गोपाळ घ्या' करून झाले. बाळाला पाळण्यात घालण्यासाठी नीट गुंडाळून घेतले. गीतामाईला आपले उगाच वाटले की, 'या बायका बाळाला नीट धरतील ना?' अहो पाळण्याखालूनच घ्यायचे आहे. पण ती मातृप्रेमाची शंका होती. त्या बायका अनुभवी

होत्या. 'गोविंद घ्या, गोपाळ घ्या, मधुसूदन घ्या, त्रिविक्रम घ्या, माधव घ्या, मुकुंद घ्या' झाले आणि बाळाला पाळण्यात ठेवले. गीतामाईच्या जिवात जीव आला. राधाबाई म्हणाल्या, ''गीता, अग बाळाचं नाव ठेव.'' गीतामाय पुढे झाली. बाळाच्या हातात नथ दिली. कारण साक्षीला त्यात सोने, मोती, हिरा, पोवळे असते ना! आणि ठरल्याप्रमाणे 'गणपती' नाव ठेवले व कानात कुर्र केले. कुर्र म्हणजे काही नाही. लहान मुलांना 'वस्तू नाही' सांगताना पूर्वीच्या काळी 'कुर्र झाले' म्हणून सांगत असत. याचा अर्थ 'नाही-काही नाही.' बाळालासुद्धा आई हा पहिला धडा देते की, 'अरे, तुझे नाव गणपती ठेवले आहे म्हणजे ते देहाचे नाव आहे. देह नश्वर आहे. काही नाही. देह खोटा आहे.' हेच आई त्यातून सांगत असते. बायकांच्या सांगण्यावरून पाठीने झोका दिला. पाळणा म्हटला गेला. बायकांच्या ओट्या भरल्या. गीतामाय बाळाकडे टक लावून पाहत होती. तिला वाटत होते, 'माझीच दृष्ट तर लागणार नाही ना?' म्हणे, आईची दृष्ट कायम लागते. मनोमनी म्हणाली, 'जळो जळो माझी दृष्ट। मिठाचं ग झाले पाणी। बाळ माझा फुलावाणी। कोमेजला।।'

बाळ दिसामासांनी मोठा होत होता. सर्व घरावर बाळराजाची सत्ता होती. गीतामाय बाळाला पदराखाली घेण्याचे स्वर्गसौख्य अनुभवीत होती. अशीच एकदा बाळाला घेऊन बसली असता मन गतकाळाच्या गोड स्मृतीत हरवून गेले. तिला आठवले, आपण कलेढोणकर वाघमाऱ्यांकडून कशा येथे आलो. सर्वच जण आपले

लाड करीत होते. सासू-सासरे देवमाणसेच होती. रावजींना तर घराची-प्रपंचाची चिंताच नव्हती. घर अगदी सर्वार्थांनी भरलेले होते. कोणालाही काही द्यायला मना नव्हती. आपली हौस पुरत होती. आणि खरंच गडे आपल्याला जेव्हा मातृत्वाची चाहूल लागली, तेव्हा फारच बाई कसंतरी झालं. सर्वांनाच आनंद झाला. आपल्या मामंजींनी अतिशय प्रेमाने विचारले होते, "गीता, तुला काय करावंसं-खावंसं वाटतं?" आपण लाजतच उत्तर दिलं, "मला दासबोध विवरावा, ऐकावा असं वाटतं." माहेरून रामदासपंथाची दीक्षा होती. रामनाम मुखात होते ना! लगेच लिंगोपंतांनी एका ब्राह्मणास दासबोध वाचण्यास रोज येण्यास सांगितले. आपल्याला किती बरे वाटत असे. लिंगोपंतही बसत असत. आणि गंमत आहे- मला कसे नेहमी ध्यान करावे, रामाचे नाम घ्यावे असे वाटायचे आणि सदैव मारुतीचे दर्शन व्हायचे. आपण रावजींबरोबर संभाजी महाराजांचे (संतांचे) दर्शन घेण्यास कसे गेलो होतो. त्यांनी नारळ दिला होता आणि आपणास दिवस राहिले. सर्व भान विसरून चिंतन चालू होते. आणि वाटले, 'खरंच माझा बाळ मोठा संत होणार की काय?' असे म्हणतात ना की मुलाचे पाय पाळण्यात दिसतात. डोहाळ्यावरून बालवृत्तीची कल्पना येते. मनोमन खूप सुखावली; पण लगेच म्हणाली, संत फार मोठे असतात. ते कृपाळू, दयाळू, स्नेहाळू, परोपकारी असतात. फार मोठे असतात बाई संत. आणि मग संतांविषयी विचार सुरू झाले. जणू त्या सद्विचारांचेच दूध बाळाला पाजले जात होते. रामदास, ज्ञानोबा,

तुकाराम, एकनाथ, नामदेव या थोर संतांची आठवण झाली व त्या चिंतनात ती बुडून गेली.

खरेच संत ज्या देशात राहतात त्या देशाचा भाग्यकाळ आलेला असतो आणि त्या देशाचा भविष्यकाळ उज्ज्वल असतो. संत फार उदार, कृपाळू, दयाळू असतात. 'तोच म्हणावा जगी संत। जो जाणेल भगवंत।' दासबोधाची ओवी तिला आठवली. 'तृप्तीची निजतृप्ती। विश्रांतीची विश्रांती। भक्तिची फलश्रुती। ते हे संत।।' खरंच शांतीला, विश्रांतीला विचारले, "अग, तू सर्वांना विश्रांती देतेस, पण तू कुठे विश्रांती घेतेस?" तर ती म्हणेल, "संतांच्या ठिकाणी." देवापेक्षा संत थोर होत. 'घेसी तैसा देसी, ऐसा अससी तू उदार' असं नामदेव म्हणतात. देव घेतो तेव्हा देतो, पण संत देवालाच हातात देतात. एखाद्या झाडाची पाने-फुले हवी असतील, तर ती वेगवेगळी देण्यापेक्षा ते झाडच हातात दिले तर सर्व काही हातात येते. तसेच संत देवाची गाठ घालून देतात. 'माय बाप जन्म देती, संत चुकविती जन्ममरण'. आई-वडील जन्म देतात, या संसारात सोडतात; पण संत जन्ममरणाच्या फेऱ्यातूनच सोडवितात. 'क्षणभर होता संत संग। संत संगे होय भवभंग।।' वाल्या कोळ्याला नारद भेटले, त्याचा उद्धार झाला. संतसंगात विवेक उत्पन्न होतो. 'करू नका काही, संत संग धरा।' असं तुकाराम महाराज म्हणतात. जरी संताच्या घरी नुसते पडून राहिले तरी भगवत् विचारच कानावर पडतात. अन्न संताच्या घरचे मिळते, त्यामुळे मन घडायला त्याची मदत होते. मोठी गंमत असते.

पूर्वसुकृतावाचून संतसंग घडत नाही. शेजारी असेल तरी ओळखता येत नाही. 'बिनू संतसंग विवेक न होई। राम-कृपाबिन सुलभन होई।' संतसंगाशिवाय विवेक, ज्ञान, भक्ती करता येत नाही आणि राम-कृपेवाचून संतसंग लाभत नाही. संत अगदी कापसासारखे असतात. आपण त्रास सोसून दुसऱ्यांचे छिद्र झाकतात. कापसासारखे संसारामध्ये निरस वाटतात खरे. पण त्यागाने, सद्विचारांनी, उपदेशाने दुसऱ्याचे दुःख निवारून दुसऱ्याचे संसार सुखी करतात. त्यांना सांसारिक आसक्तीतून खुबीने सोडवतात. संतांची देहात्मबुद्धी गेलेली असते. ते देह सावलीसारखा मानतात. 'जगाच्या कल्याणा संताच्या विभूती.' त्यांना सागर म्हणावे तर सागर थोडा खारट असतो. त्यांना पवित्र गंगा म्हणावे, तर गंगेपाशी बुडण्याचे भय असते. त्यांना क्षीरसागर म्हणावे, तर तो कधीतरी नासेल. त्यांना हिमालय- मुक्ती देणारा पर्वत- म्हणावे तर मरणाचे भय तेथे असते. परंतु संत सर्वांगांनी सुंदर असतात. त्यांना एकच माहीत असते ते म्हणजे दुसऱ्याचे भले करणे. तुकाराम महाराज म्हणतात-

'बुडती हे जन न देखवे डोळा। म्हणूनी कळवळा येतो मज।।'

संतांचे केवढे मोठे उपकार आहेत. ते आपल्याला सोलीव आनंदाप्रत नेऊन सोडतात. देव, भक्त आणि नाम यांचा त्रिवेणीसंगम तेथे असतो. संत खरे तर वर्णनातीतच असतात. अशा संतांच्या विचारांच्या तंद्रीमध्ये आपल्या गीतामाईला जाग आली ती बाळाच्या हुंकारण्यानेच.

गीतामाईला वाटले, जणू बाळ तिच्या विचारांना अनुमोदन देतो आहे. ती मनात म्हणाली, 'बाळा, खरंच का तू संत होणार?' पण लगेच तिच्या मनात आले, 'हा जर संत झाला तर मला दुरावेल ना! मायेची पकड मनावर बसली. संतांना फारच त्रास असतो बाई. पण संत जगावर फारच उपकार करतात. तू संत होणार का?' पुन्हा सद्‌विचार बळावला. मग बाळाला उचलून जवळ घेतले. त्याचे चुंबन घेतले नि म्हणाली, 'तू आपला प्रापंचिक संतच हो!' हं. हा विचार तिला अगदी पटला. तिला वाटले, म्हणजे मुलगा आपल्याला दुरावणार नाही.

दिवस बाळाला खेळवण्यात, कौतुक करण्यात जात होते. क्रमाक्रमाने पालथे पडणे, पुढे सरकणे, रांगणे सुरू झाले. सर्वजण बाळाला प्रेमाने घेत होते. रावजींना तर त्याला नुसते बघितले तरी समाधान होत होते. लिंगोपंत त्याला कडेवर घेऊन नेहमी हिंडवत असत. बाळ रडायला लागले की, 'रामकृष्ण हरी' हे भजन ऐकून शांत होत असे.

एकदा तर रांगत जाऊन गणू बाळाने सगळे देवच खाली घेतले. राधाबाई त्याची आजी म्हणाली, "अरे, हे काय केलेस? याच्याकडे आता लक्षच ठेवायला हवे." गीतामाईला वाटले, "तू तर देवच हातात घेतलास." जणू हरिपाठात म्हटल्याप्रमाणे 'करतळी आवळे, तैसा हरी।' देवाला हातात गवसविणारा मोठा संत होणार का? मनोमनी सुखावली.

गणू पाच वर्षांचा झाला. त्याला भजन, कीर्तन फार आवडत असे. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात म्हणतात. नाही का? गणू लिंगोपंतांजवळ झोपत असे. ते त्याला भजन, अभंग म्हणत झोपवत असत. भजनात त्यांच्याबरोबर गणूही नाचत असे. सर्वांना कौतुक वाटत असे. एकदा गणू त्यांच्याशेजारी झोपला होता. मध्यरात्री पाहतात तो गणू अंथरुणावर नाही. लिंगोपंत घाबरले. घरात सगळीकडे शोधले. सगळे जण फार चिंतेत पडले. बाळ कुठे गेला असेल? सगळ्यांनी सर्वत्र शोध आरंभला. भूत-खेत, क्रूर श्वापदे, चोर नाना तऱ्हेचे विचार मनात येत होते. भीतीने जिवाचा थरकाप झाला. लोक सगळीकडे शोधत नदीकिनारी गेले तो तेथे स्वारी आसनमांडी घालून समाधी लावून बसली होती. बाळाला जेव्हा लोक घरी घेऊन आले तेव्हा घरातील सर्वांना हायसे वाटले. लिंगोपंत, रावजी मनी सुखावले की, हे काम काही न्यारेच आहे, बरं का! गीतामाई पण उमगली.

एकदा लिंगोपंतांनी गणूला विचारले, "तुला जर मोहरांनी भरलेला हंडा दिला तर तू काय करशील?" गणू म्हणाला, "मी सगळे धन अंध-पंगू यांना वाटून टाकीन." मग लिंगोपंत म्हणाले, "अरे समजा, तुला राजा केले तर काय करशील?" गणू बोलला, "सर्वांना सुखी करीन. राज्यातला एकही जण गरीब, भिकारी राहणार नाही असे करीन." हे ऐकून लिंगोपंतांना फार आनंद झाला.

गणू शाळेत जाऊ लागला. मौजीबंधन झाले. पवमान, रुद्र याचे

शिक्षण झाले. शाळेत शिक्षकांनी सांगितलेला सर्व अभ्यास झाल्यावर मुलांना घेऊन गणू शाळेबाहेर जाई. तीन दगड मांडी. आपण एक काठी घेऊन त्याची एकतारी करी व भजन म्हणत असे. तीन दगड म्हणजे राम, लक्ष्मण, सीता. बरोबरची मुलेही भजन करायची. "जय जय श्रीराम जय जय श्रीराम." वर्ग ओस पडायचा. एकदा शिक्षक रागावले. म्हणाले, "अरे माझी नोकरी जाईल ना. मी आपला जातोच कसा." या आणि चिंचा, बोरे पाडण्याच्या सगळ्या तक्रारी आजोबांकडे येऊ लागल्या. तेव्हा आजोबांनी गणूला गुरे राखण्यासाठी बाहेर पाठविले. आता तर रामनामाला पक्का जोर चढला. मनात भगवंताचे विचार चालूच होते. 'देव कसा असतो? तो केव्हा भेटेल? कसा भेटेल? कधी भेटेल? भेटतो का? कोणाला बरं भेटलेला आहे? असे सारखे चिंतन चालूच असे. थोडासा अंतर्मुख होत होता.

गणू ८-९ वर्षांचा झाला. चिंतन वाढतच होते. एकच ध्यास लागला होता. 'जगाचा नियंता देव कसा असेल? कसा भेटेल? काय सांगेल? याच्या शोधात' गणू होता. वाटत होते, 'भजनाने देव भेटतो का? यज्ञयाग करून भेटतो का? व्रत-वैकल्यांनी भेटतो का? की भगवे कपडे घातले म्हणजे भेटतो?' बालमनात अनंत प्रश्न उभे राहत होते. आणि एकदा एक रामदासी मारुती-मंदिरात उतरले होते. त्यांचे कपडे भगवे होते. दाढी वाढलेली होती. केसांच्या जटा होत्या. हातात कुबड्या होत्या. गळ्यात माळ होती. गणूला वाटले, यांना विचारावे. यांना देव भेटलाच असेल. म्हणून गणूने त्या बुवांना विचारले, "अहो,

एक प्रश्न विचारू का?'' बुवा 'हो' म्हणाल्यावर पुढे म्हणाला, ''तुम्हाला देव भेटला आहे का? या भगव्या कपड्यांनी देव भेटतो का?'' त्या लहान मुलाची कळकळ पाहून ते म्हणाले, ''नाही, रे बाबा. या कपड्यांनी, दाढी वाढविल्याने देव भेटत नाही रे. सद्‌गुरुशिवाय देवाचे ज्ञान होत नाही रे. सद्‌गुरु करावा लागतो.'' झालं. गणूला खूप बरे वाटले आणि गुरुचेच चिंतन सुरू झाले.

'गुरु कोठे शोधावा? कसे करावे? कोणाला विचारावे तर धड उत्तर देतील?' मग गणूचा एक चुलतभाऊ दामू आणि मित्र वामन यांच्याबरोबर गुरुशोधाची चर्चा चाले. गुरुंचा शोध आपण घेतला पाहिजे असे शेवटी ठरले आणि कोणालाही न सांगता गुरुशोधार्थ जायचे असे ठरविले.

गणूचे वय १० वर्षाचे होते. त्याच वयाचे ते दोघेही होते. घरी न सांगता अंगावरच्या कपड्यांनिशी तिघे गुरुशोधार्थ निघाले. काहीही खायचे, कुठेही झोपायचे, ऊन, पाऊस, वारा सर्वच बाबतीत होणारा त्रास सहन न होऊन दामू आणि वामन परतले. परंतु गणू तसाच पुढे गेला. मुखात रामनाम होते. कोल्हापूरला देवळात गणू बसला होता. त्याचे तेज पाहून लोक आपोआप त्याच्यापुढे मिठाई, खाद्यपदार्थ ठेवीत असत. एका जोडप्याने तर गणूला दत्तक घ्यायचे ठरविले. पण...

गोंदवल्याला सगळीकडे शोधाशोध सुरू झाली. गणूचा साधारण कल पाहून थोडा अंदाज येत होता. पण काळजीही वाटतच

होती. दिवस काळजी आणि चिंतेत जात होते. इतक्यात दामू आणि वामन तेथे पोचले आणि त्यांनी गणूचा पत्ता सांगितला. लगेच रावजी आणि इतर मंडळी जाऊन गणूला घेऊन आली.

आता घरच्यांना सारखी भीती असायची की हा निघून जातो की काय? मग सर्वानुमते त्याचे लग्न करून द्यावे असे ठरले व खातवळची गोडसे यांची कन्या मुक्रर करून त्याचे लग्न अगदी थाटात करून दिले. आता हा घरी रमेल आणि याचे गुरुचे वेड कमी होईल असे मोठ्यांना वाटत होते. पण ज्याचे एकदा ध्येय निश्चित झाले, त्याचा ध्यास लागला की त्याला दुसरे काही सुचत नाही. अगदी तसेच गणूचे झाले. रात्रंदिवस एकच विचार. आता बरोबर कोणालाही न घेता जायचे ठरले होते. गणू संधीची वाट पाहत होता. घरी मन रमतच नव्हते. एकच ध्यास- 'गुरुशोध.'

खरंच मानवाला वाटतं, आपण पूजा-अर्चा करतो. दानधर्म व्रत, नाम, स्तोत्रपठण करतो. कोणाचे वाईट करीत नाही. झाले- हाच परमार्थ. नाही का? देवाचे ज्ञान व्हायला गुरु हवेतच कशाला? पण सर्व ग्रंथात-अध्यात्मग्रंथात 'गुरुशिवाय आत्मज्ञान नाही आणि आत्मज्ञानाशिवाय मोक्ष, मुक्ती नाही' असे स्पष्ट बजावले आहे. नाथ भागवतात म्हटले आहे 'सद्‌गुरुविण ब्रह्मज्ञान, सर्वथा नव्हे नव्हेचि जाण.' दासबोधात सांगितले आहे 'ज्यासी वाटे मोक्ष व्हावा, तेणे सद्‌गुरु करावा.' तुकोबाराय म्हणतात, 'सद्‌गुरुवाचूनि सापडेना सोय, धरावे ते पाय आधी आधी.' हरिपाठात ज्ञानोबा म्हणतात, 'द्वैताची

झाडणी, गुरुविण ज्ञान, तया कैसे कीर्तन घडेल नामी' किंवा ज्ञानेश्वरीमध्ये सांगतात, 'म्हणोनी जाणतेनी गुरु भजीजे, तेणे कृतकार्या होईजे' किंवा 'गुरुविण कोण दाखविल वाट' हे प्रसिद्धच आहे. एवंच, या सर्व संतवचनावरून सद्‌गुरुशिवाय आत्मज्ञान नाही हे पक्के ठरते कारण आपला संतांवर विश्वास आहे. त्यांचे ग्रंथच अभंग राहिले आहेत. आजही ते साधकाला निखळ आनंद देतात.

मग प्रश्न असा पडतो की गुरु एकदा केल्यावर बदलता येतो का? कारण त्याचे काही पटते, काही पटत नाही. काय करावे? मोठा प्रश्न पडतो. बरे रामदास स्वामी तर म्हणतात, नव्हे, सर्वच संत म्हणतात, 'गुरु पारखून करावा. कारण गुरुला बदलता येत नाही.' आपण संतांना व्यवहारात खेचून पारखतो ते योग्य नाही. संतांनी गुरुच्या काही कसोट्या सांगितल्या आहेत. 'तोच म्हणावा संत (गुरु) जो जाणेल भगवंत' असे दासबोधात सांगितले आहे. पण त्यांनी भगवंत जाणला आहे हे तरी कळावे कसे? त्यासाठी इतर कसोट्या सांगितल्या आहेत. संताची देहात्मबुद्धी सुटलेली असते. त्यांना आसक्ती नसते. ते प्रपंचात रमत नाहीत. सदैव दुसऱ्याचे भले करीत असतात. स्वतः कष्टतात पण दुसऱ्याला आनंद देतात. त्यांच्या मुखात नेहमी नाम असते. आत्मस्थितीत ते नेहमी निमग्न असतात. त्यांनी सर्व काही रामावर सोपविलेले असते. ते कधीही काळजी करीत नाहीत. 'संत म्हणा त्याला, जो का ऐहिक सुखा विटला.' पैसा आणि प्रसिद्धी या गोष्टींचे संतांना वावडे असते. हे सर्व उमजले, कळले तरी

आपल्यामध्ये संतांना ओळखण्याची ताकद नसते. मग काय करावे? हं. एक मार्ग संत सांगतात तो असा- ज्याच्या सान्निध्यात गेल्यावर विनाकारण प्रसन्नता वाटते, जरा बसावेसे वाटते, ज्यांना नाम आवडते ते संत. म्हणून त्यांच्यापाशी बसून ते नामाविषयी काय बोलतात, त्यांना नाम आवडते का नाही हे पहावे. पण हे सगळे ढोबळ झाले हं.

मग सर्वात चांगला मार्ग म्हणजे जे गुरु देहात नाहीत, पण त्यांची समाधी आहे. त्याचे सामर्थ्य अजूनही आपण पाहतो त्यांचा अनुग्रह घ्यावा. ते संत देहात नसले, तरी तेवढेच काम करीत असतात. किंबहुना जास्तच करीत असतात. कारण कोठे जावयाचे असल्यास देहाने जावे लागते, पण देहात नसल्यावर ते कधीही, कोठेही, कोणाच्याही ह्रदयात सूक्ष्म रूपाने प्रवेश करू शकतात आणि आपले काम करतात. त्यामुळे देहात नसलेले गुरू महान होत आणि एकदा एका संताला गुरू मानल्यावर दुसऱ्यांना गुरू मानणे चुकीचे होईल. यासाठी श्रद्धा भक्कम पाहिजे. अनुग्रह घेणे म्हणजे आपण त्यांचे झालो हे मानणे, समजणे होय. आणि एकदा अनुग्रह घेतला की मग आपण दुसरीकडे वळत नाही आणि आपले साधन सोडत नाही. एका साधनानी जे साधते ते वेगवेगळी साधने करून कधीच साधावयाचे नाही. एका रस्त्याने चालूनच मुक्कामाला पोहोचता येते. दर वेळेला रस्ता बदलून तेथून परत येत गेलो तर मुक्काम कधी यायचाच नाही. अनुग्रह घेण्याचा फायदा हा असतो क़ी आपण सतरा साधनांमागे लागत नाही. श्रद्धा एकावरच राहते. शिवाय आपण अनुग्रह घेतला

म्हणजे सर्व जबाबदारी आपले गुरुच घेतात. 'मी कर्ता' हा भाव कमी होतो. आपण त्यांच्यावर आपला भार सोपवून निवांत राहतो.

सद्गुरु फार मोठे असतात. ते शिष्याला मार्गावर आणण्याचे काम करीत असतात. त्याचे रक्षण करीत असतात. कुंभारासारखे वरून थापटी देतात, पण आत आधाराचा हात असतो. ते शिष्याला सर्वतोपरी सांभाळतात. संत-सद्गुरु असे सांगतात की, एकदा शिष्य माझा झाला की जास्तीत जास्त सात जन्मांत त्याचा उद्धार झालाच पाहिजे. त्यांचे संरक्षण शिष्याला अखंड लाभते. शिष्याला भोग भोगावे लागतात, पण सवडीने भोग भोगून संपविण्याची सवलत मिळते. फार मोठा आधार लाभतो.

गुरुः ब्रह्मा गुरुःविष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।

गुरुःसाक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः।।

गुरु हे ब्रह्मदेवासारखे होत. ब्रह्मदेव निर्माण करतो त्याप्रमाणे सद्गुरु ब्रह्मभाव निर्माण करतात. ते विष्णुसारखे असल्याने त्या ब्रह्मभावाचे पालन करतात आणि शंकर ज्याप्रमाणे संहार करतो त्याप्रमाणे ते जीवभावाचा संहार करतात. म्हणूनच गुरु साक्षात् परब्रह्म होत. नाथ म्हणतात, 'गुरु-ब्रह्म मानी दोन, तो परमार्थी नागवला पूर्ण। गुरुहुनी देव मोठा, म्हणेल तो करंटा।' कबीर म्हणतात, 'गुरु गोविंद दोऊ खडे, काके लागो पाय। बलीहारी गुरू आपकी, गोविंद दिजो बताय।' गुरू आणि देव दोन्ही जर समोर आले, तर मी आधी गुरूंनाच

वंदन करीन, कारण गुरूंनीच मला भगवंत दाखविला आहे. गुरू साक्षात् परब्रह्म ही गोष्ट खरीच, गुरूशिवाय आत्मज्ञान नाहीच. हे मर्म गणूला कळले होते. पुर्वसुकृत जोरदार होते म्हणून एकटाच पुन्हा कोणालाही न सांगता गुरुशोधार्थ- नराचा नारायण होण्यासाठी- तो निघाला.

रस्त्याने चालताना काय मिळेल ते खावे. एखादे मारुतीमंदिर पाहून तेथे झोपावे. अखंड रामनाम घ्यावे. मनात ध्यास मात्र सद्गुरूंचा. तो सांगलीजवळ हरिपूरला गेला. तेथे राधाबाई नावाच्या एक साध्वी रामभक्त होत्या. त्या भजन करू लागल्या की, राममूर्ती डोलत असे. त्यांना भेटून तो मिरजेला अण्णाबुवांचेकडे गेला. पण अण्णाबुवा नेहमी चिंतनात असत. मग नाशिकला देव मामलेदार यांचेकडे गेला. त्यांनी सांगितले, ''माझेकडे तुझे काम होणार नाही.'' पुढे काशीला तैलंगस्वामींना भेटला. अक्कलकोटला आला. स्वामी वाटच पहात होते. म्हणाले, ''बाळा, माझेकडे तुझे काम होणार नाही.'' त्यांनी ताटभर डाळींबाचे दाणे दिले. गणूने ते दाणे सर्वांना वाटून टाकले. हुमणाबादला माणिकप्रभूंना भेटला. रामकृष्ण परमहंसाकडे गेला. ते म्हणाले, ''आपलेपणाचा खून करावा लागतो'' अशा तऱ्हेने गुरुशोधार्थ खूप ठिकाणी गेला. खूप थकून गेला होता. निराशा येऊ लागली होती. देवाची आळवणी सुरू होती. तोच, तो एके जागी बसला असताना त्याला रामदासीपंथाचे 'रामकृष्ण' नावाचे साधक भेटले. त्यांना त्याने आपली व्यथा सांगितली. ते म्हणाले, ''बाळा,

औरंगाबाद-जालना-नांदेडहून येहेळ गावी जा. तेथे तुकाराम महाराज राहातात. त्यांना लोक 'तुकामाई' म्हणतात. तेथे जा. ते तुझे गुरू होत.''

आता थकलेल्या पायांना बळ आले. मनाला मोठी उभारी वाटली आणि उत्साह वाटला. गुरूंचा पत्ता लागला होता. गणू चालत, विचारत, झपाट्याने येहेळगावी येऊन पोहोचला. तेथे चौकशी करीता तुकामाई मोठे विचित्र असल्याचे कळले. ते कधी बांगड्या हातात भरायचे. कधी डोक्याला टोपी असायची. अंगावर कधी वस्त्र असायचे, कधी नसायचे. कधी कुत्रे बरोबर असायचे. कधी शिव्या देत असत, तर कधी जवळ करीत. हे सगळे कळले तरी गणू घाबरला नाही. त्यांच्या झोपडीबाहेर वाट पाहत बसला. तुकामाई बरेच वेळाने आले. आणि गणूला पाहून म्हणाले, ''कोण रे तू?'' गणूनी लगेच पाय धरले. तसे जोराने ओरडले, ''थांब, तुझा खूनच करतो'' त्यावर गणूही म्हणाला, ''मीही माझा जीव देतो.'' दोघांची दृष्टादृष्ट झाली. एकमेकांची ओळख पटली आणि तुकामाईंनी गणूला घट्ट पोटाशी धरले. परम-भाग्याची वेळ म्हणायची.

त्या दिवसापासून या विचित्र वागणाऱ्या गुरूंची सेवा सतत नऊ महिने केली. गुरूंनी अनंत परीक्षा पाहिल्या. याचा मानापमान गेला की नाही? लौकिकाची लाज गेली की नाही? अहंकार गेला की नाही? हे सारे पाहिले. गणू त्यांचे पाठीमागे सावलीसारखा असे. त्यांचे अंघोळीचे पाणी काढणे, खाण्याची व्यवस्था पाहणे, अंथरुण टाकणे,

पाय दाबणे, हे सर्व करून मग ते झोपल्यावर झोपत असे. काही वेळा ते दोन-दोन दिवस बाहेरच रानावनातून फिरत असत. कधी कधी खातही नसत. कधी झोपतच नसत. त्यांचेबरोबर गणू त्यांच्यासारखाच वागायचा. सर्व लोकांसमोर गणूने दिलेले फळ ते रागावून फेकून देत असत. लौकिकाची लाज गेली की नाही पाहण्यासाठी सर्वांसमोर त्याची निर्भत्सना करीत असत, किंवा गोडवेही गात असत. मानापमान गेला की नाही हे पाहण्यासाठी रानात उसाची मोळी करून गणूच्या डोक्यावर दिली. गावात आले आणि सर्व ऊस सगळीकडे फेकून दिले. आसक्ती गेली की नाही पाहण्यासाठी. गणू परीक्षेला उतरत होता. शेवटी देहात्मभाव गेला की नाही हे पाहण्यासाठी त्याला नदीकिनारी घेऊन गेले. आपण दूर बसले. २/३ मुले खेळत होती. त्यांना पाहून म्हणाले, ''अरे, ही पोरे दंगा करताहेत. खड्डा खणून यांना पुरुन टाक आणि वरती तू बैस.'' काहीही बोलू नकोस. गणूने तसेच केले. थोड्या वेळाने मुलांचे पालक शोधत आले. तुकामाईना विचारताच ते म्हणाले, ''या मुलाने (गणूने) तुमच्या मुलांना पुरले आहे.'' ते पालक घाबरले. गणूला विचारू लागले. तो काही बोलेना. त्याला गुरुंची आज्ञा पालन करायची होती ना! पालकांनी गणूला खूप मारले. तरीही गणू काही बोलेना. तेव्हा पुन्हा तुकामाईना शरण गेले. तुकामाई म्हणाले, ''जा, त्या खड्ड्यात मुले पुरली आहेत.'' पालकांनी खड्डा उकरला तो तीनही मुले जीवंत बाहेर निघाली. पालक अत्यानंदाने मुलांना घेऊन गेले. इकडे गणूला तुकामाईंनी पोटाशी

धरले. अश्रूंचा पूर वाहू लागला. म्हणाले, ''बाळा, मी तुला खूप त्रास दिला.'' असं म्हणून अंगावरून हात फिरविला आणि गणूचं दुःख दूर केलं.

रामनवमीच्या दिवशी दुपारी बारा वाजता अशोक वृक्षाखाली गणूला बसविले आणि अनुग्रह दिला. 'श्रीराम जयराम जय जय राम' हा मंत्र दिला. 'ब्रह्मचैतन्य' असे नाव ठेवले. आणि राममंदिरे बांधण्याची आज्ञा दिली. तसेच मध्यम स्थितीतल्या प्रापंचिक माणसांना हाताशी धरायला सांगितले. काही दिवस तेथेच राहिल्यावर तुकामाई म्हणाले, ''बाळा, आता बारा वर्षे सर्व देशभर हिंडावे. साधन सोडू नये. आपले गावीही जावे.'' आज्ञा गणूला अवघड वाटली. पण गुरूंची आज्ञा पालन करायलाच हवी होती. तुकामाईंनी गणूला उमरखेडला नेले आणि आपल्या गुरूंच्या पायावर घातले. नंतर गणूला निरोप देण्यासाठी ते वेशीपर्यंत गेले. गणूची परिस्थिती 'कन्या सासुराशी जाये, मागे परतोनी पाहे,' अशी झाली होती. फारच कठीण वाटत होते. पायांत मणा-मणाच्या बेड्या पडल्या होत्या जणू. मागे वळून वळून पाहत पाहतच पुढे चालला होता. अस्पष्ट होत जाणारी गुरुमूर्ती हृदयात साठवून घेत घेत पुढे चालला. आता गणू, गणू महाराज झाला.

पाणीदार डोळे, धारदार नाक, दाढी-जटा वाढलेल्या, पिळदार दंड, भरदार छाती, एका हातात रुद्राक्षाची माळ, दुसऱ्या हातात कुबडी, लहान वयाचा, कौपीन परिधान केलेला साधू चार बैराग्यांसह मारुती-

मंदिरात बसला होता. लोक दर्शनाला येत होते. गावातील सर्व लोक ओळखीचे होते. पण आपण कोण याचा पत्ता लागू द्यावयाचा नव्हता. सर्वांना समाधानकारक उत्तरे देणारे साधू म्हणजेच महाराज होते. गुरुआज्ञेप्रमाणे मातृभूमीला आले होते.

समोरुन एक बाई आणि पुरुष दर्शनाला येताना पाहिले मात्र आणि सारेच अवसान गळून गेले. मनोमन साष्टांग नमस्कार घातला. ती दोघे म्हणजे गीतामाय व रावजी होते. आईला पाहिले मात्र, डोळे भरून आले. वाटले, असेच उठावे आणि तिला कडकडून भेटावे. पण मर्यादा होत्या. प्रकट व्हावयाचे नव्हते. आई ही चीजच काही और आहे. तिची सरच कोणाला यावयाची नाही. नऊ महिने ओझे वाहणारी, डोळ्यांचा दिवा आणि हाताचा पाळणा करून वाढविणारी. वीट नाही. कंटाळा नाही. निव्वळ प्रेमच प्रेम. म्हणूनच कवींनी म्हटले आहे. 'स्वामी तिन्ही जगाचा, आई विना भिकारी.' जे लोक म्हाताऱ्या आई-वडिलांची सेवा करीत असतील ते धन्य होत. म्हातारपण सर्वांनाच यावयाचे असते, हे मानव विसरतो. असो.

महाराजांना वाटले, आईला कडकडून मिठी मारावी; पण गुरुआज्ञेला मोठेपण असते. त्या आज्ञेचा उपमर्द होऊ नये म्हणून त्यांनी स्वतःला आवरले. एवढ्यात गीतामाय पुढे झाली व हात जोडून म्हणाली, ''गोसावी बुवा, माझा मुलगा घरातून बाराव्या वर्षी बाहेर पडला आहे. अध्यात्माचं त्याला वेड आहे. बहुधा गुरुशोधार्थ निघाला असेल. तुम्ही गावोगावी, हिमालयात, अरण्यात हिंडता. माझा बाळ

कोठे पाहिला आहे का हो?'' हे ऐकून महाराजांच्या डोळ्यात पाणी आले. ते म्हणाले, ''माय, तो कसा आहे? दिसतो कसा? केवढा आहे?'' लगेच घाईघाईने उत्तर मिळाले, ''अहो ओळखायला अगदी सोपे आहे. तो अखंड रामनाम घेतो. दिसण्यात सुरेख आहे आणि मोठा चतुर आहे. असा कोणी पाहिला आहे का?'' यावर महाराज म्हणाले, ''माय, आपण रामनाम घ्यावं. एका वर्षानी तो परत येईल'' गीतामाईच्या दुःखी मनाला मोठा दिलासा मिळाला. जणू आपला बाळ भेटलाच अशा आनंदात रावजी, गीतामाय समाधानाने परतले.

क्षणभर महाराजांच्या डोळ्यासमोरून मागील चित्रपट भराभर सरकू लागला. आपण कसे कोणालाही न सांगता वयाच्या बाराव्या वर्षी एका वस्त्रानिशी बाहेर पडलो. मिरज, सांगली, अक्कलकोट, हुमणाबाद, कलकत्ता, सगळीकडे जाऊन शेवटी येहेळगावला तुकामाईच्या मठात आलो. तुकामाईकडे ज्ञान-भक्ती यांचा संगम होता. नऊ महिने अगदी मनापासून सेवा करून, कठीणतम परीक्षा दिल्यावर अनुग्रह घेऊन कसे कृतकृत्य झालो. नंतर तुकामाईंनी आपणाला उमरखेडला त्यांच्या गुरुंकडे-चिन्मयानंदांकडे कसे नेले. आजेगुरूंना नमस्कार करताना त्यांचे समाधीवरचा हार आपल्या गळ्यात कसा पडला? तुकामाईंना आनंद झाला. त्यांनी आपल्याला पोटाशी धरले. आणि साश्रू नयनांनी, कुरवाळत म्हटले, ''बाळा, तुला फार त्रास दिला, नाही का? जा, आता उत्तरेकडे भ्रमण कर. देश पालथा घाल. बाळा, ब्रह्मज्ञान झाले तरी ते मुरले पाहिजे. म्हणून तू आता जा.''

तुकामाईंना खूप अवघड वाटत होते. आपल्यालाही पाय पुढे टाकवत नव्हता. अशा सद्‌गुरुंना सोडून दूर जाणे फारच अवघड वाटत होते. तरी पण आज्ञापालन करायला हवेच होते. आपण कसे सारखे मागे मागे पाहत पुढे चालत होतो आणि गुरुचिंतनात महाराज अगदी बुडून गेले. क्षणभर आपण कोठे आहोत याचे भान राहिले नाही.

समोर लोक दर्शनाला येतच होते. रात्री गोसाव्याजवळ हिरवा तंबाखू मिळेल म्हणून पाटीलबुवा महाराजांपाशी आले. त्यांना साधूबद्दल संशय आला. 'गणू तर नसेल ना?' म्हणून कानाकडे पाहिले तर त्यांना महाराजांचा कान फाटका दिसला. त्याचे कारण असे- दहा वर्षाचे असताना महाराज, दामू, वामन, गुरुशोधार्थ बाहेर पडले होते. रस्त्यात एका भिकाऱ्याने महाराजांजवळ काही मागितले. महाराजांचे जवळ काहीच नव्हते. कानात फक्त भिकबाळी होती. ती खसकन ओढून त्यांनी भिकाऱ्याचे हातावर ठेवली होती. म्हणून कान फाटण्याची खूण राहिली होती. पाटलांना वाटले, उद्या सकाळी गीतामाईला सांगावे म्हणून ते तमाशाला निघून गेले.

महाराज प्रवासाला उत्तरेकडे गेले. ते कुठे कुठे गेले होते ते आपण आता पाहू या.

महाराजांनी अत्यंत जड अंतःकरणांनी श्री तुकामाईचा निरोप घेतला. दोघांच्याही डोळ्यात पाणी तरारले होते. हेच उत्कट प्रेमाचे प्रतीक होते. शेवटी धीर करून महाराज निघाले. ते उत्तरेकडे

उज्जैनपर्यंत गेले. पुढे दाट अरण्यात शिरले. तेथे एक निवांत गुहा होती. अगदी एकांतवास साधण्याजोगी. ते तेथे गुहेमध्ये राहायला लागले. अखंड नामाचे चिंतन असे. मुखात सतत नाम असे. मध्येच सद्गुरुंची आठवण येत असे. जो जो नाम घेत होते, तो तो त्याचा सहवास फारच आवडू लागला. खाण्या-पिण्याची कशाचीही पर्वा नव्हती. अंगावर फक्त एक लंगोटी असे. तरी थंडी, ऊन काहीच भासत नव्हते. धुंदी नामाची होती. सर्व संतांनी गाईलेला नाम-महिमा, नाम-उपाधीरहित केव्हाही कोठेही कसेही घ्यावे-आपले काम ते करणारच. नामाबरोबर भगवंताचे स्मरण राहिल्यास उत्तमच.

ज्ञानोबांनी एवढी ज्ञानेश्वरी लिहिली. पण सर्वांकरिता खुले असे नामच सांगितले. हरिपाठात ते वारंवार सांगतात, 'हरिमुखे म्हणा हरिमुखे म्हणा!' तुकोबांनी तर नामाशिवाय काही केलेच नाही. अगदी मनापासून प्रेमाने नाम घेतले. सर्व भार भगवंतावर सोपवून हृदयात त्याचे चिंतन केले. म्हणाले, 'ठाईच बैसोनी करा एकचित्त। आवडी अनंत आळवावा।।' नामाच्या जोरावरच ते म्हणू शकले, 'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा। इतरांनी वहावा भार माथा।।' वेदांनाही प्रारंभ करताना 'ॐ' म्हणावेच लागते. हेच नाम होय. एकनाथ तर ग्वाही देतात, 'आवडीने भावे हरी नाम घेसी। तुझी चिंता त्यासी सर्व आहे।।' जनाबाई तर कळसच करते. कुठेही शिकलेली नाही, वाचन नाही, नामदेवाच्या घरात राहिलेली, श्रमिक महिला. पण नामदेवांवर गाढा विश्वास. म्हणून त्यांनी सांगितल्याप्रमाणे सारखे, दळीता, कांडिता

नामच घेत होती. म्हणाली, 'नाम विठोबाचे घ्यावे। पुढे पाऊल टाकावे।।', झाडलोट करी जनी। केर काढी चक्रपाणी।।', 'जनी जाय पणियासी, मागे धावे ऋषिकेशी।' काय ताकद आहे पाहा. एका नामाच्या जोरावर हरीला आपलेसे करून घेतले. खरंच भगवंताला त्याचे नाम फारच आवडते. ज्ञानदेव म्हणतात, 'तयापाशी पांडवा। मी हरपला गिवसावा। जेथे नाम घोषू बरवा। करीती ते माझे।।' गोरोबा, चोखोबा, नरहरी सोनार, सावता माळी, बोधराज पाटील, सर्व संतांनी एक साधा सोपा सरळ उपाय, प्रपंचाच्या आड न येणारा मार्ग पत्करला आणि ते उद्धरुन गेले. आनंदी, समाधानी राहिले. दुःखाची जाणीवच राहिली नाही. मरणाची भीतीच नाही. काय होईल, कसं होईल? ही काळजी नाही. याच देही याच डोळा हे अनुभवले हो!

अखंड नाम घेतले की त्याचे- जगाच्या सूत्रधाराचं चिंतन होते. आठवण होते. चित्तातली विषयांची धार बोथट होते. पापाचा नाश होतो. नामामुळे माणसाला 'कर्ता मी नाही' याची जाणीव होते. अहंकार थोडा कमी होतो. मन अंतर्मुख होते. देवाला त्याच्या नामाने संतसंग होतो. कारण संत अखंड नामातच असतात. देवाचा संग तर असतोच. देवावर सर्व भार सोपविला जातो. नाम घेता घेता मनुष्य नामी होतो. म्हणजे त्याला हळूहळू मी देह नसून आत्मा आहे याचे ज्ञान होऊ लागते. देहात्मभाव कमी होतो. देहाचे जगाचे नश्वरत्व कळू लागते. आपल्या हातात काही नाही याची जाणीव व्हायला लागते. देव अखंड त्यापाशी असतो. रामदासांनी तर नामावर एक समासच लिहिला आहे.

नामाबद्दल कितीही सांगितले तरी अपुरेच आहे. शब्द थिटे आहेत. अशा नामाच्या चिंतनात महाराज त्या गुहेमध्ये दोन वर्षे होते. जो नाम घेतो, त्याची काळजी घेणे भगवंताला भाग पडते. रोज एक गाय गुहेच्या तोंडाशी येऊन उभी रहायची व आपला पान्हा सोडायची. महाराजांकडे भांडे नसल्याने ते दूध ओंजळीत घेऊन पीत असत. पाहा, देवाचे भक्ताकडे केवढे लक्ष असते! 'माझीया भक्ता। आणि संसाराची चिंता। काय समर्थांची कांता। कोरान्न मागे।।' हे काय उगीच म्हटले आहे? पण काही काळ तरी या नामाचा अभ्यासच करायला पाहिजे. तसा अभ्यास महाराजांचा चालू होता. पुढे दोन वर्षांनी ते फिरत फिरत नैमिषारण्यात गेले. तेथे दोन वर्षापूर्वी म्हणजे अनुग्रहापूर्वी ते गुहेत राहिले होते. ते तेथेच गेले. तेथे सहा योगी आसनावर बसले होते. त्यातले एक आळंदीचे नृसिंह सरस्वती होते. महाराज तेथील एका रिकाम्या आसनावर बसले. ते दोन-अडीच वर्षे तेथे राहिले.

शेवटचे नानासाहेब पेशवे तेथेच गुहेमध्ये राहत असत. एक विश्वासू नोकर त्यांना सर्व पुरवीत असे. ते फार दुःखी होते. पराभव झाला होता. पण महाराजांनी त्यांना अभय दिले. रामनाम घेण्यास सांगितले. ते वारंवार नैमिषारण्यात त्यांचे भेटीसाठी जात असत. त्यांचा अंतकाळ महाराजांनी साधला. पुढे ते काशीत गेले.

मुखात अखंड रामनाम, दाढी-जटा वाढलेल्या, पायांत खडावा, हाती माळ, कुबडी. करारी मुद्रा, लंगोटी परिधान केलेली, कोठेही मारुती मंदिरात राहावे, माधुकरी मागावी. जगण्यापुरते खावे व

चिंतनात मग्न असावे. भूप्रदेश पालथा घालावा. प्रपंचाचे निरीक्षण करावे. एकटा जीव, सदाशिव! एकांत सेवन, भ्रमण, मनन, चिंतन, साधन या सर्व गोष्टींतच महाराजांचा काळ जात होता. येईल त्या परिस्थितीला भगवंतचिंतनात आनंदाने तोंड देणे एवढेच पाठ होते. निरनिराळे अनुभव येत होते. ध्येय पक्के होते. आता आणखी ५/६ साधू त्यांना येऊन मिळाले. अखंड चर्चाही चालायची. ज्याचे ध्येय एकदा पक्के ठरले तो मागे हटत नाही. ध्येय पक्के ठरायला हवे. तसेच त्याबरोबर निश्चयही पक्का पाहिजे. तुकाराम म्हणतात, 'निष्ठावंत भाव, भक्तांचा स्वधर्म। निर्धार हे वर्म चुको नये।।' निश्चय, निर्धार हे ध्येयाचे वर्म आहे. बरेच वेळा आपण प्रारंभशूर असतो. मध्येच कंटाळतो आणि मग देतो सोडून. कधी साधन करायचे, कधी नाही अशाने हे जमत नसते. त्याला सातत्य लागते. ओढ लागते. ध्यास असावा लागतो. तरच ध्येयपूर्ती होणार ना! वाल्या 'राम-राम' म्हणायला बसला तो तेथून अजिबात उठला नाही. निष्ठा आणि निर्धार होता ना! त्याला काही कंटाळा आला नसेल का? त्याला उठावेसे वाटले नसेल का? अहो त्याचा तर धंदा अगदी तमोगुणी, विरोधी होता. पण झालेला पश्चात्ताप व सारे सुखाचे सांगाती आहेत हे पुरेपूर पटल्याने तो तेथे निश्चयाने बसू शकला. कोणतीही गोष्ट तडीस न्यायची असेल तर ध्येय पक्के असावे लागते. त्याकडे सारखी नजर असावी लागते. परमार्थातही आपण खरेच भगवंताचा मार्ग पत्करायचा का? आपल्याला खरेच भगवंताची ओढ, जिज्ञासा आहे का? आपला

संतांच्यावर पुरा विश्वास आहे ना? हे सर्व पडताळून, पूर्ण विचार करून मगच त्या मार्गाला लागले तर बरे नाही का? नाही तर चार लोक नाम घेतात म्हणून आपणही घ्यावे. लोक आपल्याला जरा बरे म्हणतील, प्रपंच जरा सुखाचा होईल. कुठेतरी वेळ घालवायला बरे पडेल. असा विचार करण्यात काही अर्थ नाही. तेव्हा विचार, ध्येय पक्के पाहिजेच. संसार काही सोडावा लागत नाही. तो आपोआप सुटत जातो. पण एकनाथ म्हणतात, 'सुख एक आहे हरी आठविता, इतर जपता दुःख बहू' हे अगदी खरे आहे.

'शिष्या एकांती बैसावे। स्वरूपी विश्रांतीस जावे' (दासबोध) याप्रमाणे महाराज कधी एकांतात तर कधी लोकांतात वावरत असत. भ्रमण चालू असता ते अयोध्येला आले. बरोबर चार-सहा बैरागी होतेच. एका मारुती-मंदिरात उतरले. नित्याचा कार्यक्रम, निरुपण वगैरे चालू होते. करारी मुद्रा, गळ्यात माळा, साधनेचे तेज, पिळदार दंड, भरदार छाती, सुघटित मांड्या, चटकन तेजस्वी पुरुष म्हणून महाराजांची ओळख पटे. एकदा एक शास्त्रीबुवा त्यांच्याकडे येऊन बसले. त्यांचे नाव रामशास्त्री होते ते महान पंडित होते. त्यांचा वेदांचा अभ्यास फार दांडगा होता. ते त्यात पारंगत होते. त्यांची व महाराजांची नेहमी चर्चा व्हायची. महाराज नामाचे महत्त्व पटवून देत असत. नामात केवढी मोठी शक्ती आहे! त्यामुळे भगवंताचे अखंड स्मरण कसे होते. 'कर्ता मी नाही' याची जाणीव ते कसे करून देते, जीवनामध्ये निखळ आनंद नामामुळे कसा मिळतो, मोठ्या मोठ्या संतांनी नाम कसे घेतले;

तुकोबा, नामदेव, जनाबाई, चोखोबा, गोरोबा काका, असे कितीतरी संत नामाच्याच जोरावर कसे पुढे गेले व प्रापंचिक माणसाला साधे सोपे नामच कसे परवडते वगैरे वगैरे ते नेहमी सांगत असत. रामशास्त्र्यांना हे काही पटत नसे. ते म्हणत, ''अहो, ज्ञानेची मोक्ष! आत्मज्ञान झाल्याशिवाय कसा बरं परमार्थ साधेल? विचारांनी, विवेकाने, आत्मज्ञानाने, 'ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या' हे कळेल तेव्हाच मी कोण आहे-खरा मी कोण हे समजेल ना! उगीच माळा हातात फिरवून काय लाभ होणार? गोसावी बुवा, तुम्ही या नामाच्या भ्रमात आहात आणि वर लोकांना भ्रमात का ठेवता?'' रामशास्त्र्यांना नामस्मरण, सगुणाची उपासना, पूजा वगैरे काही पटत नसे. त्यामुळे बरीच चर्चा व्हायची. एकदा महाराज म्हणाले, ''हे पहा शास्त्रीबुवा, मला जरी भ्रम झाला असला तरी नामाचा-देवाचाच आहे. कुटुंबाचा, प्रपंचाचा नाही. तेव्हा आता लांब कशाला? आपण रामाच्याच नगरीत रहात आहोत. तेव्हा रामच काय तो निर्णय देईल.'' इतके बोलणे झाल्यावर शास्त्रीबुवा घरी गेले. संध्याकाळी ते व त्यांच्या पत्नी शरयू नदीवर फिरायला गेले. तेथे एक टरबूज त्या दोघांनी खाल्ले. रात्री शास्त्रीबुवांचे मंडळींना जुलाब होऊ लागले. रामशास्त्र्यांनी एक दोन वैद्य बोलावून आणले आणि औषध दिले. पण काही उपयोग झाला नाही. साधारण रात्री दोनचे सुमारास त्यांची अवस्था फारच कठीण झाली. शास्त्रीबुवांना आता काय करावे काहीच समजेना. मग त्यांना महाराजांची आठवण झाली व त्यांना त्यांचे एक वाक्य आठवले. महाराज म्हणत असत 'अहो,

नामाने भवरोग बरा होतो. तर साधा रोग का बरा होणार नाही?' मग ते लगेच उठले आणि बायकोजवळ जाऊन नामस्मरण करीत बसले. काही वेळाने तिचा डोळा लागला आणि सकाळी तिला चांगले बरे वाटले.

शास्त्रीबुवांना नामाचा महिमा पटला. ते सकाळी नदीवर आंघोळ करायला गेले. संध्या वगैरे उरकून लगेच महाराजांकडे आले. त्यांना कधी एकदा महाराजांना भेटतो असे झाले होते. महाराजांकडे जाऊन त्यांनी महाराजांना साष्टांग दंडवत घातला. महाराज म्हणाले, "अहो, हे काय भलतेच करता?" शास्त्रीबुवांनी रात्रीची हकीगत सांगितली व म्हणाले, "महाराज, मी शरण आलो आहे. मला क्षमा करा. मला नामाचा महिमा पटला." महाराजांनी त्यांना पोटाशी धरले. सांत्वन केले. घरी जाऊन त्यांच्या बायकोला औषधपाणी केले आणि दोघांनाही अनुग्रह म्हणजे नाम दिले. आता शास्त्रीबुवांची दृष्टीच बदलली होती. ते अतिशय नम्रपणे वागत असत. त्यांची मुले काशीला असल्याने ते महाराजांना काशीला घेऊन गेले. एकनाथी भागवतात एक ओवी आहे.

'जरी जाहला वेदशास्त्रसंपन्न। तरी तिही केले पाहिजे नामस्मरण।।'

काशीला गेल्यावर २/४ दिवस रामशास्त्र्यांकडे राहून महाराज अन्य ठिकाणी राहायला गेले. मागील आठवणी जागृत होत होत्या. तैलंग स्वामी येथेच भेटले होते. काशी म्हणजे धर्मपुरी, संस्कृतचे विद्यापीठ.

काशीमध्ये एक कोट्याधीश रहात होता. तसा लहान ३० वर्षाचा होता. त्याला आजी-आजोबा, आई-वडील, भाऊ-बहीण सर्व नातेवाईक होते. एवढे सर्व वैभव असूनही तो फार उदार होता. तडी-तापसी, ब्रह्मचारी, अपंग कोणीही त्याच्याकडे आला तर रिक्त हस्ताने परत जात नसे. त्याच्या घरी अन्नछत्र होते. तो खूप जणांचा पोशिंदा आधार होता. त्याचे लग्न झालेले होते. एक दीड वर्षाचा मुलगाही होता आणि अचानक तो धनिक वारला. सगळीकडे हाहाःकार झाला. सगळ्यांचा आधार तुटला. त्या बाईवर तर जणू आभाळच कोसळून पडले. काळ काय कुणाकरिता थांबला आहे का? मृत्युला कोण रोखू शकणार? पुढची सर्व तयारी होऊन त्याचे प्रेत मनकर्णिका घाटावर आले. त्याची बायको सती जायला निघाली होती. सर्व धार्मिक विधी पुरे होऊन आता सरणावर ठेवणार इतक्यात रामशास्त्री गर्दीतून वाट काढीत पुढे आले आणि म्हणाले, "माय, एवढ्या सर्वांना नमस्कार करते आहेस. तर एका साधूलाही कर." असं म्हणून त्यांनी तिला महाराजांकडे आणले आणि सर्व हकीगत सांगितली. महाराज म्हणाले, "अरे! एवढा पुण्यवान प्राणी आहे. मला एकदा पाहू द्या तरी!" म्हणून ते धावतच प्रेताजवळ आले आणि म्हणाले, "अरे हा तर जीवंत आहे. माय, विनाकारण का सती जातेस?" असं म्हणून त्यांनी गंगेचे पाणी आणले आणि तिनदा 'श्रीराम श्रीराम श्रीराम' म्हणून ते त्या धनिकाच्या तोंडात घातले. सर्व जमलेले लोक प्राण डोळ्यात आणून पाहत होते. आणि काय आश्चर्य! तो धनिक झोपेतून जागा व्हावा तसा उठून

बसला. इकडे तिकडे पाहू लागला. सगळीकडे आनंदीआनंद झाला. घरच्या परिवाराचा आनंद तर गगनात मावेना. जे दुःखित होऊन मनकर्णिका घाटावर आले होते ते क्षणार्धात आनंदी होऊन त्या धनिकासह घरी परतत होते. जवळ जवळ सर्वच जण महाराजांचे पाय धरण्याकरिता धावू लागले. महाराजांनी गंमतच केली. धावत जाऊन धपकन गंगेत उडी घेतली आणि दिसेनासे झाले. प्रसिद्धी नकोच होती. त्या व्यापाऱ्याला मात्र आपल्याला वाचविणाऱ्याचा थांगपत्ता शेवटपर्यंत कळू शकला नाही आणि भेटही होऊ शकली नाही.

एकनाथी भागवतात म्हटले आहे. 'जेवढी नामाची शक्ति। तेवढे पाप नाही त्रिजगती।।' पाप आणि त्याचा नाश करणारे नाम यांची स्पर्धा लागली तर सर्व पापांचा नाश करून नाम शिल्लकच राहील. नामापुढे पापे भस्मसात होतील. ''तृण अग्निमेळे समरस झाले। तैसे नामे केले जपता हरी।।' असे हरिपाठात म्हटले आहे. नामाचा अनुभव महाराजांनी स्वतः घेतला होता. घेत होते आणि जगाला पटवून देत देत लोकांना नामाला लावत होते. गुरुआज्ञेचे पालन अगदी तंतोतंत करीत होते.

पुढे महाराज प्रयागला गेले. काही दिवस तेथे राहून पुढे निघाले. सगळी पायी यात्रा असे. प्रयागला एक साधूंचा जथा होता. त्याला कोणी महंत नव्हता. महाराजांची साधना, तेज, बोलण्याची त्यांची पद्धत, ज्ञान वगैरे पाहून त्यांनी महाराजांनाच आपला महंत केले. अगदी राजासारखी त्यांची बडदास्त ठेवू लागले. महाराजांवर त्याचा काही

परिणाम नव्हता. ते जणू तुकाराम महाराजांची ओळ आठवीत होते. 'प्रारब्धेची वाढे मान, प्रारब्धेची जोडे धन। वृथा सोस करीसी वाया, भज मना पंढरी राया।।' जे प्रारब्धात आहे ते कधी चुकायचे नाही. 'लल्लाटरेखा कधी पालटेना' खरंच आहे. नशिबात पैसा नसेल तर वेळेला तो मिळतच नाही. आणि मिळाला तर त्याचे प्रारब्धाचे भोग कसे भोगणार? 'मला मान द्या, मला मान द्या' म्हणून कधीच मान मिळत नाही. तो न मागता आपसूक येत असतो. पण नशिबात असला तर. पण हे लक्षात यायला आपण जरा अंतर्मुख होऊन आपल्याच जीवनाकडे पाहिले पाहिजे. थोडक्यात सांगण्याचा मुद्दा काय तर महाराजांचे नशिबी प्रमुख बनण्याचा मान होताच. नंतर तो जथा, महाराज सगळे मिळून मथुरा, वृंदावन करीत कलकत्त्याला पोहोचले.

मागे काशीला असताना तेथील जमिनदाराची आई महाराजांना भेटली होती व आपल्याला नातू नसल्याचे सांगत होती. दुःखी होती. मुलाने तीन लग्ने करूनही मूल नाही असे सांगत होती. महाराज. म्हणाले, ''बाई, आपल्या मोठ्या सुनेला व मुलाला बोलवावे.'' तिने त्याप्रमाणे केले. सून-मुलगा पाया पडले तेव्हा महाराजांनी सुनेच्या ओटीत नारळ घातला व म्हणाले, ''माय, पुढच्या वर्षी मुलगा होईल. बारशाला हा नारळ फोडावा व प्रसाद म्हणून सर्वांनी खावा.'' तो जमिनदार कलकत्त्याला राहात असे. त्याला मुलगा झाला व तो आता वर्षाचा झाला. तो जमिनदार त्या साधूच्या शोधात होताच. महाराजांची व त्याची गाठ पडली. तो म्हणे, ''मी आपली काय सेवा करू?''

महाराज म्हणत, ''आपण रामाला आठवावे. बस.'' पण त्याच्या आईला ते पटत नसे. म्हणून अतिशय आग्रहाची विनंती तिने केल्यावर महाराज म्हणाले, ''आपण हरिहाट भरवू या.''

हरिहाट म्हणजे सर्व पारमार्थिक साधनांचा बाजार असतो. सर्व साधना तेथे चालू असतात. प्रवचन, कीर्तन, पूजा, पारायण, योग, ध्यान हे असतेच. शिवाय यज्ञ, जप, भजन, पुराणवाचन, पंचाग्निसाधन, शास्त्राध्ययन, ब्रह्मकर्म, अनुष्ठान, देवतार्चन, सत्संग, गुरुसेवा, मौनसेवन, वाममार्ग, तंत्रक्रिया इत्यादीही करतात. पंडित लोकांचा योग्य सन्मान केला जातो. तसेच मुक्तद्वार असते. या सर्वांसाठी खर्च फार येतो. पण जमिनदाराने तो कबूल केला व मोठाच्या मोठा मांडव घालून सर्व व्यवस्था अगदी चोख ठेवली होती. सात दिवस हा हाट भरला होता. मोठा आनंदाचा, उत्साहाचा समारंभ झाला सर्वांना अगदी समाधान झाले. सहसा हरिहाट कोणी करीत नसे.

हरिहाट सुरु झाला तेव्हा महाराजांची हत्तीवरून मिरवणूक काढली होती. त्यांना बसण्यासाठी एक सिंहासन उच्चस्थानी ठेवले होते. महाराज त्यावर एखाद्या राजासारखे शोभून दिसत होते. सतत नामस्मरण व अन्नदान चालले आहे की नाही हे जातीने पहात असत. आठवे दिवशी सांगतेला जमिनदाराने महाराजांची महापूजा करून त्यांना भरजरी वस्त्र व चांदीचे ताटात हजार रुपये भरून दिले. महाराजांनी चांदीचे ताट जमिनदाराचे आईला दिले व रुपये पंडितांना वाटून टाकले. त्याकाळी या कार्यक्रमाला पंचवीस हजाराचे वर खर्च

आला होता. हरिहाट संपल्यावर महाराज चार-सहा दिवस तेथे राहिले, पण दर्शनाला लोकांची गर्दी जमू लागली. आता आपले काम झाले म्हणून महाराजांनी बरोबरीच्या बैराग्यांना अमरकंटक येथे जाण्याची आज्ञा केली. ते गेल्यावर एक दिवस कोणालाही न सांगता महाराज निघाले. काही दिवसांनी फिरत फिरत सातपुडा पर्वतापाशी आले. नर्मदेच्या काठाकाठाने त्यांचा प्रवास चालू होता. अंतर्मुख होतेच. वाटेत एक तरुण मुलगा भेटला. तो घरी न सांगताच पळून आलेला होता. तो महाराजांच्याबरोबर राहू लागला. तो इंदूरचा होता. त्याच्याबरोबर महाराज इंदूरला आले. त्यावेळची त्यांची अवस्था फार अवघड होती. बोलता बोलता त्यांना समाधी लागत असे. अंग अगदी लाकडासारखे ताठ होत असे व ते खूप वेळ भानावर येत नसत. इंदूरला गावाबाहेर रान होते. गाई वगैरे चरत असत. जवळच एक डबके सुद्धा होते. महाराज त्या मुलाशी बोलत होते. एवढ्यात त्यांना समाधी लागली व बोलणे बंद झाले. अंग लाकडासारखे झाले. त्या मुलाला भीती वाटून तो पळून गेला. महाराज भानावरच नव्हते. देहाला कोण सांभाळणार? भोवताली चिखल, डबके अशा अवस्थेत ते दिवसभर बसून राहिले. संध्याकाळी तिकडून एक गवळी चालला होता. त्याला यांना समाधी लागली आहे हे कळले. त्याने त्यांना उचलून जवळच्या मारुती-मंदिरात आणून ठेवले. अंग पुसून स्वच्छ केले व तो निघून गेला. ते उन्मनी अवस्थेत होते असे म्हणतात.

'ब्रह्मानंदी लागली टाळी। कोण देहाते सांभाळी।।'

इंदूरमध्ये एक श्रीमंत इनामदार नावाचे गृहस्थ होते. त्यांचा नित्य नियम गावाबाहेर फिरायला जाण्याचा होता व येता येता ते मारुती मंदिरात मारुतीचे दर्शन घेऊन येत असत. मोठे भाविक होते. त्यांनी दुसरे दिवशी महाराजांना पाहिले व मुखावरचे तेज आणि एकूण सर्व डौल पाहून हे कोणीतरी सिद्ध पुरुष असावेत असा त्यांनी तर्क केला. ते म्हणाले, "अहो, येथे राहण्यापेक्षा आमच्या बागेत येऊन राहता का? तुम्हाला बरे वाटेल. साधनाही चांगली होईल." महाराज लगेच त्यांच्याकडे बागेत गेले. तेथे रोज एक गवळी महाराजांना गाईचे धारोष्ण दूध आणून देत असे. अगदी निष्ठावान भक्त होता. हा महाराजांचा इंदूरमधला पहिला शिष्य, बरं का. महाराज खरे कोणाचे घरी जाऊन न राहणारे. पण कोणाची उद्धाराची वेळ जवळ आली असेल तर आपल्याला काय माहीत? 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती, देह कष्टविती उपकारे,' 'आम्ही वैकुंठवासी, आलो याच कारणासी'- (तुकाराम) इनामदारांना मोठे बरे वाटले. संत पुरुष आपल्या बागेत, परिसरात राहिल्याचा तो आनंद होता. आता रोज सकाळ-संध्याकाळ दर्शन होईल. काही संतसेवा घडेल व पारमार्थिक चर्चा, मार्गदर्शन मिळेल, असे त्यांना अगदी मनापासून वाटत होते.

इनामदार रात्री घरी आल्यावर आपल्या पत्नीला म्हणाले, "हे बघ, बागेत एक साधू आले आहेत. त्यांचे दर्शनाला तू जा व नमस्कार कर." त्यांच्या पत्नीचे नाव जीजीबाई होते. मोठी कडक शिस्तीची बाई होती. थोडी चमत्कारिकच. सर्व नोकर-चाकर, गडीमाणसे, नातेवाईक

त्यांना जरा वचकूनच असायची. फार कशाला स्वतः इनामदार पण जरा घाबरुनच असायचे. ती म्हणाली, ''कशाला त्या बैराग्याला बागेत आणलेत? हे बैरागी मेले ढोंगी असतात. मी त्यांना तशी नमस्कार करणार नाही. त्यांचे लक्षण एकदा पाहते. म्हणजे काय आहे ते समजेल.''

दुसरे दिवशी नुसतीच बागेत जाऊन महाराजांना पाहून आली, नमस्कार केला नाही. हे खरे म्हटले तर 'नमस्कार करावा फुकाचा। आशीर्वाद घ्यावा लाखाचा.' अगदी नमस्कार करायला खरे तर काय हरकत आहे? अहो, तो कसाही असला तरी आत ब्रह्मच आहे ना? त्याला नाही का नमस्कार पोहचत? भूतमात्री परमेश्वर आहेच ना? पण असो, तिने काही नमस्कार केला नाही.

दुसरे दिवशी तिने लाल तिखटाचे लाडू केले आणि ती महाराजांकडे गेली. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर ती म्हणाली, ''साधु बुवा, हे पाहा मी तुमच्याकरिता लाडू आणले आहेत.'' महाराजांनी हात पुढे केला. तिने एक लाडू त्यांच्या हातावर ठेवला. तो महाराजांनी खाऊन टाकला व पुन्हा हात पुढे केला. सर्व लाडू अशा प्रकारे त्यांनी खाल्ले व म्हणाले, ''माय, लाडू चांगले लागतात. आणखी असले तर दे थोडे'' ती चकीतच झाली व म्हणाली, ''अहो, आजचा खाऊ संपला. उद्या आणखी नवा आणीन.''

ती घरी जाऊन विचार करू लागली की त्यांना तिखट खाण्याची

सवयच असेल. उद्या काय बरे करावे? तिच्या नोकराने थंडी असल्याने शेगडी पेटवून शेकायला आणून ठेवली. तिच्या डोक्यात कल्पना आली की बस उद्या हेच त्यांना खायला घालावे. सकाळी उठली. शेगडी निखाऱ्यांसह घेतली व बागेत गेली. म्हणाली, ''चला साधुबुवा, आजचा नवीन पदार्थ आणला आहे बरं का'' असं म्हणून निखारे झगझगीत पेटवून परातीत घालून त्यांना खायला दिले. महाराजांनी तेही चिमट्याने तोंडात टाकून दिले व खाल्ले. म्हणाले, ''माय, बरे लागतात. आणखी थोडे असले तर द्यावे.''

जीजीच्या तोंडचे पाणीच पळाले. तिची बोबडी वळली व डोळ्यातून पाणी यायला लागले. आता हा सिद्धपुरुष आपले काय करील याची भीती वाटली. पण तिला संतसंग लाभला होता आणि क्षणभर होता संतसंग, संतसंगे होय भवभंग'' ह्या एकनाथांच्या उक्तीप्रमाणे तिच्यात एकदम फरक पडला व तिने महाराजांचे पाय घट्ट पकडले. म्हणाली, ''महाराज, आपण माझे मायबाप आहात. आपण मला क्षमा करा. मी आपल्याला शरण आहे.'' महाराजांनी एक ढेकर दिली व म्हणाले, ''बाळ, कोण मनुष्य कसा आहे हे आपल्याला बाहेरून कळत नाही, म्हणून अशा रीतीने आपण कोणाची परीक्षा करू नये. संतपरीक्षा अशा रीतीने करावयाची नसते. बरे, झाले ते होऊन गेले. आता ते सर्व विसरून जा आणि आजपासून 'नामस्मरणाला' आरंभ कर पाहू. राम तुझे कल्याण करील, हे पक्के समज.''

नंतर जीजीने महाराजांना मोठ्या आग्रहाने ठेवून घेतले व राजासारखी बडदास्त ठेवली. जीजीबाई महाराजांची उत्तम शिष्या बनली.

'संत दयेचे सागर। संतापोटी क्षमा अपार।।' आणि 'दया क्षमा शांती, तेथे देवाची वसती.' संतांपाशी भगवंताचा अखंड वास असतोच. संत फार क्षमाशील असतात. त्यांना आत्मज्ञान झाले असल्याने 'जे जे देखीजे भूत, ते ते मानीजे भगवंत' अशी त्यांची धारणा झालेली असते. जीजीबाईच्या वागण्याप्रमाणे विचित्र वागण्याचा त्यांना राग येत नाही. ते समजलेले असतात की हा अज्ञानी प्राणी आहे. ह्याला काय कळणार? अज्ञानामुळे ह्याची वागणूक अहंभावाने भरलेली असायचीच. पण आपण कोणावर रागवायचे? 'तुका म्हणे एका देहाचे अवयव।' अशी संतांची दृष्टी झालेली असल्याने ह्या अज्ञानी लोकांचा उद्धार कसा होईल हेच संत पाहतात. तुकाराम पुढे म्हणतात, 'काय सांगू मी या संतांचे उपकार। मज निरंतर जागविती।।' संताना एकच कार्य करायचे माहीत असते ते म्हणजे जगदोद्धार. त्यामुळे त्यांचे जवळ 'अक्रोधेविण क्षमा' असते. सगळेच लोक त्यांना आपलेसे वाटतात. 'परांतरा न लावावा ढका'- (दासबोध) ह्या तत्त्वाप्रमाणे ते चालत असतात. पुन्हा त्या कृतीचा अहंभाव, खेद, खंत, वा संतोष- काहीच नाही. त्याचा आठवही नाही. 'आनंदाचे डोही आनंद तरंग' अशी अवस्था.

एक साधू पुढे पळतो आहे व मुले त्याच्या पाठीमागे लागली

आहेत. अहो हे तर महाराजांचेच चित्र आहे. जीजीबाईच्या घरी दर्शनाला खूप गर्दी व्हायला लागली की महाराज रस्त्यावरून पळत सुटत. त्यांच्यामागे मुले 'अहो गुंडोजी बुवा' म्हणून ओरडत जात असत. महाराज पळत पळत दूरवर जायचे. मुलेही त्यांचे पाठोपाठ जायची. मग महाराज सर्व मुलांना घेऊन खेळायचे आणि त्यांचे करवी रामनाम घ्यायचे. सर्वजण मुखाने खूप नाम घेत, गात नाचत असत. मुले फारच त्रास द्यायला लागली की महाराज एखाद्या झुडपामध्ये जाऊन लपून बसत. मुलांचा मग नाइलाज होई. ती म्हणत, ''गुंडोजी बुवा बाहेर या. आम्ही तुम्हाला त्रास देणार नाही.'' मुले मोठी निरागस असतात नाही का? कसल्या विकारांचा, द्वेष-मत्सर, यांचा प्रादुर्भाव झालेलाच नसतो. मनात येईल ते अगदी सरळ, मोकळेपणाने बोलतात.

एकदा इंदूरचे राजे होळकर महाराजांचे दर्शनाला येत आहेत असे महाराजांना कळले. त्यांना राजाला भेटायचे नव्हते. मग महाराजांनी काय केले. एका मोलकरणीचे लुगडे डोक्यावरून पदर घेऊन नेसले.जीजीला हाक मारली आणि झटकन जात्यावर बसले. ओव्याही म्हणू लागले. राजे आले. त्यांनी इनामदारांना विचारले, ''तुमच्याकडे ते सत्पुरुष आले आहेत ना? मला त्यांना भेटावयाचे आहे.'' आधीच पढवून ठेवल्याप्रमाणे इनामदार म्हणाले, ''अहो, ते आता घरात नाहीत. ते कुठेतरी बाहेर गेले आहेत. ते परत कधी येतील हे अगदी सांगता येत नाही.'' राजे 'बरे' म्हणून निघाले. म्हणाले, ''त्यांना मी

दर्शनाला आलो होतो म्हणून सांगावे.'' राजे महाराजांसमोरुनच गेले पण त्यांना काही ओळखता आले नाही. जीजीबाईला मात्र सारखे हसू येत होते. खरेच हे संत मोठे गमतीदार असतात. ज्यांना आस्था, श्रद्धा असेल, त्यांचीच भेट घेतात.

जीजीबाईची मुलगी सहासात वर्षाची होती. तिला महाराजांचा फारच लळा लागला होता. ती महाराजांचे शिवाय रहात नसे. महाराजही तिच्याबरोबर खेळत असत. सागरगोटे खेळायचे. गोष्टी सांगायचे, एके दिवशी एक बैरागी महाराजांकडे येत होता. त्याने पाहिले की महाराज एका मुलीशी-ताईशी-खेळत आहेत. तो मनोमनी रागावला, काही तरी पुटपुटत परत जाऊ लागला. महाराजांनी मोठ्या प्रेमाने त्याला बोलावून घेतले, त्याचा गौरव केला आणि प्रेमाने म्हणाले, ''आपले काय काम होते?'' तो म्हणाला, ''मला लहान-पणापासून योगाची आवड आहे. माझी बायको वारली. संसाराचा सारा भार मुलांवर सोपवून मी हिमालयात गेलो. तेथे एक सत्पुरुष मला भेटले. मी त्यांचे जवळ पाच-सहा वर्षे योग शिकलो. मला काही अडचणी आहेत. माझे गुरु म्हणाले, ''इंदूरमध्ये अशा अशा ठिकाणी जा. म्हणून त्यांनी मला आपणाकडे पाठविले. आपल्याला काही माहित असावे असे दिसत नाही. म्हणून मी परत चाललो. आपण संसारी दिसता.'' महाराज म्हणाले, ''अहो मी माझ्या गुरुंकडे नुसता पडून राहात असे. माझे गुरू योगामध्ये निष्णात आहेत. त्यांचेकडे राहिल्याने काही गोष्टी माझे कानावर आहेत. पहा आपणास काही

फायदा होतो का?" असं म्हणून त्यांनी ताईच्या पाठीवर एक थाप मारली. म्हणाले, "ताई, पद्मासन घाल व समाधी लाव." ताईने परकराचा काचा मारुन आसन घातले व समाधी लावली. पंधरा मिनिटांनी महाराज म्हणाले, "ताई ऊठ." ती जागी झाली. त्या बैराग्याला म्हणाले "आता हिला तुमचे प्रश्न विचारा. ही उत्तर देईल." आणि खरेच त्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. बैरागी महाराजांना शरण गेला. म्हणाला, "मला क्षमा करा. ही एवढीशी मुलगी इतकी उत्तरे देते, तेव्हा तुमचे ज्ञान किती असेल!" नंतर महाराजांनी त्याला काही मुद्रा, आसने करून दाखविली. त्याच्या अडचणी सोडविल्या. तो आनंदाने, समाधानाने परत गेला.

इंदूरमध्ये महाराज येऊन सहा महिने झाले होते. महाराज 'जातो' म्हणत व इनामदार आग्रहाने ठेवून घेत असत. एकदा एक गवळी रात्री महाराजांना भेटावयास आला. महाराज नुकतेच पडले होते. जीजी म्हणाल्या, "गवळीबुवा, उद्या आलात तर नाही का चालणार?" तो 'बरे' म्हणाला व निघून गेला. दुसर दिवशी सकाळी दर्शनाला आला. महाराज म्हणाले, "अरे काल का नाही आलास? मी तुझी खूप वाट पाहिली." झालेली हकीगत गवळ्याने अगदी सहज सांगितली. बस्, हेच निमित्त महाराजांना पुरे झाले. लगेच आकांड तांडव सुरू केले. "मला येथे कोणाला भेटू देत नाहीत. कोणाशी बोलू देत नाहीत. माझा अगदी कोंडमारा झाला आहे. मी आता क्षणभरही येथे थांबणार नाही. इत्यादी. इनामदारांना कळेना की महाराजांना काय झाले. ते हात जोडून

विनंती करू लागले. जीजीबाई व ताई आल्या व महाराजांच्या पाया पडून न जाण्याबद्दल विनवू लागल्या. इनामदार म्हणाले, ''आमचे काही चुकले का? आम्हाला क्षमा करा. आपण जाऊ नका.'' महाराज अगदी शांतपणे म्हणाले, ''मला आता जायला पाहिजे. मी लवकरच परत येईन.'' असे म्हणून सर्वांचा प्रेमाने निरोप घेतला व इंदूर सोडले.

इंदूर सोडल्यावर ते तीर्थे करत करत गोंदवल्याला आले. आई-वडील यांचे दर्शन झाले. पण ओळख दिली नाही. दाजी पाटलाने ओळखले व उद्या सकाळी गीतामाईला सांगू म्हणून तो तमाशाला गेला, ही हकीगत मागे सांगितलीच आहे. पहाट होताच महाराज सासुरवाडी खातवळला निघून गेले.

तेथेही मुक्काम गावाबाहेरच होता. लोक दर्शनाला येत असत. चेहऱ्यावरचे तेज, प्रसन्न मुद्रा, हातात कुबडी, माळ, दाढी वाढलेली. ऋषिमुनींसारख्या जटा. लोक तर त्यांना त्रिकालज्ञ म्हणू लागले. कोणाला व्याधीवर औषध सांग, कोणाला तोडगा वगैरे गोष्टी सांगून, ते सर्वांचे समाधान करीत असत. महाराजांच्या पत्नीचे नाव 'सरस्वती' होते. तिच्या आईला पण कोणीसे सांगितले की त्या सत्पुरुषाला जाऊन भेट. सरस्वतीने उपास-तापास, व्रत-वैकल्य, पिंपळाला प्रदक्षिणा घातल्या होत्या. बायका म्हणत की सगळ्या गोष्टी फळाला येतील. सरस्वती आता सतरा-अठरा वर्षांची झाली होती. महाराज निघून गेले (गुरुशोधार्थ) तेव्हा ती लहान होती. काही दिवस सासरी राहून मग ती माहेरी खातवळला राहायला गेली होती. एकच आशा होती-यजमान

कधीतरी भेटतील, परत येतील. सरस्वतीची आई तिला घेऊन त्या सत्पुरुषाला भेटावयास आली. बरीच गर्दी होती. जरा गर्दी ओसरल्यावर त्या पुढे झाल्या. म्हणाल्या, "गोसावीबुवा, हिच्या लग्नाला आठ-नऊ वर्षे झाली. जावई कोठे परागंदा झाले आहेत. ते केव्हा परत येतील? हिने खूप व्रतवैकल्य केली आहेत." हे ऐकताच महाराज थोडे हसले. म्हणाले, "माय, काळजी करू नये. एका वर्षाने परत येतील. हिचा संसार चांगला होईल. राम कृपा करील. पण अखंड नामस्मरण करावे." त्या साधुकडे पाहून दोघींना मोठा आपलेपणा वाटत होता. सरस्वतीला तर काही वेगळाच आनंद वाटत होता. तिने मनोमनी अगदी अखंड नाम घ्यायचे ठरविले. सरस्वतीने नाम घेण्याचा अगदी सपाटा चालविला. तिला अखंड नाम घेण्याची युक्ती साधली. तिला वाटत होते की आपले यजमान पण नामच घेत होते. मनोमनी ती महाराजांचीच मानसपूजा करी. कालक्रमणा चालली होती.

महाराज तेथून उठले ते डांबेवाडीला चुलत बहीण भीमाताई हिचेकडे आले. दारावर 'जयजय रघुवीर समर्थ'चा गजर केला. भीमाताई म्हणून हाक मारली. भीमाताई बाहेर आली. आणि संभ्रमात पडली. महाराज म्हणाले, "अग, सासरी एवढी रमलीस की माहेरची माणसे सुद्धा विसरलीस का?" तेव्हा तिने ओळखले व 'गणू' म्हणून हंबरडा फोडला. म्हणाली, "अरे, तू बैरागी झालास. काकूला किती काळजी वाटत होती. त्रास होत होता. बैरागी बनून काय साधलेस?" महाराज म्हणाले, "अग, काय साधले नाही? बरे आता मी लवकरच

परत येईन. मात्र मी आलो होतो म्हणून कोठे सांगू नकोस." असे म्हणून पुढचा शब्द ऐकण्यास तेथे उभे राहिलेच नाहीत. पुन्हा प्रवास सुरू झाला. वाटेत त्यांना एक साध्वी, साधक बाई भेटली. तिला दिव्य दृष्टी आली होती. महाराज रस्त्याने चालले असताना तिने दिव्यदृष्टीने ओळखले व त्यांना नोकराकरवी बोलावून घेतले. नमस्कार केला. महाराजांनीही तिला नमस्कार केला. महाराज म्हणाले, "ती मोठी अधिकारी बाई होती. मला पाहून तिला पान्हा फुटला. तिला मूल नव्हते. माझ्या गुरुकडून मी अर्धेच शिकलो. बाईला मला पाहून पान्हा फुटला पण मी लहान बाळ होऊन स्तनपान करू शकलो नाही. माझ्या गुरुंना ते पण जमत असे."

तेथून महाराज निघाले ते रामेश्वर करून येहेळगावला आले. तेथे तुकामाईंची भेट घेतली. सर्व वृत्तांत कथन केला. दोघांनाही खूप आनंद झाला. पुढील कार्यासाठी महाराजांनी सद्गुरुचा आशीर्वाद घेतला आणि जड पावलांनी निरोप घेतला. तेथून जे निघाले ते थेट गोंदवल्याला आले. मारुतीमंदिरात राहिले. घरी जाऊन "जय जय रघुवीर समर्थ" म्हणाले. गीतामाई भिक्षा घेऊन आल्या व महाराजांना आपल्या मुलाविषयी विचारू लागल्या, "गोसावीबुवा, माझा मुलगा पण गोसावीच झाला असेल. अगदी तुमच्या एवढाच आहे. त्याला नामाचा व परमार्थाचा फार नाद होता. तुम्ही इतके हिंडता फिरता. पाहिला का हो माझ्या बाळाला?" महाराज म्हणाले, "माय, तुमचा मुलगा उद्या सकाळी येईल." तिच्या आशा-निराशेचा खेळ सुरू

झाला. पण या शब्दांनी सुखावली मात्र खास.

महाराज त्या रात्री मारुतीमंदिरात राहिले. सकाळी चिंतुबुवा बहिर्दिशेला जात होते. त्यांना हाक मारली. चिंतुबुवांना वाटले, 'हा बैरागी मला कसा ओळखतो?' नंतर खुणेच्या दोन गोष्टी सांगितल्यावर पटले. 'अरे! हा तर आपला गणू.' बहिर्दिशेहून आल्यावर गीतामाईला सांगावे असे म्हणून ते गेले. तो सकाळी महाराज घरी आले व पुन्हा तीच गर्जना केली. गीतामाई भिक्षा घेऊन आल्या. महाराज म्हणाले, ''मला ही भिक्षा नको. उतरंडीवर ठेवलेले, दगडीत विरजलेले घट्ट दही मला दे.'' महाराजांना घट्ट दही फार आवडत असे म्हणून त्या रोज त्या दगडीत दूध विरजत असत. त्यांनी ते दही आणले आणि दगडी समोर ठेवली. महाराज फक्त हसले आणि मग गीतामाईंनी ओळखलेच. ''अरे गणू, किती दिवसांनी भेटलास!'' असे म्हणून गळामिठीच घातली. महाराज आत आले. त्यांनी आता प्रकट व्हायचे ठरविले होते. गावात सगळीकडे ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. 'आपला गणू परत आला.' असं म्हणून ओळखीचे लोक, नातेवाईक, मित्र सर्वजण भेटायला आले.

रोज लोकांना प्रवासातल्या गमती-जमती महाराज सांगत. अगदी रात्ररात्रही ते बोलत बसत आणि नाम घ्यायलाही सांगत असत. हळूहळू सगळीकडे त्यांची कीर्ती गेली. तालुका-जिल्ह्याचे अधिकारी सुद्धा दर्शनाला येऊ लागले. रावजींच्या समोर आपल्या पाया पडलेले महाराजांना आवडत नसे म्हणून त्यांनी आपला मुक्काम विठ्ठल

मंदिरात हलविला. सर्वांचे समाधान महाराज करीत असत. नाम घ्यायला सांगत असत.

काही लोकांना ह्याचे वैषम्य वाटे. ते म्हणत, ''ह्याची दाढी, जटा पाहून लोक भुलतात. हा बैरागी आहे ना! म्हणून लोक येतात.'' लोक म्हणाले, ''गणू, ही दाढी, जटा सगळे आता काढून टाक. याच्यामुळेच लोक तुला मान देतात.'' महाराज म्हणाले, ''अहो, हे काढण्यासाठी पुष्कळ अन्नसंतर्पण, होम-हवन करावे लागेल. पैसा लागेल.'' लोक म्हणाले, ''तो खर्च आम्ही करू.''

दरम्यान महाराजांचे सासरे तेथे आले व मुलीला पोहचविण्याच्या गोष्टी करू लागले. महाराज म्हणाले, ''मी स्वतः येऊन तिला घेऊन येईन.'' ठरल्याप्रमाणे दाढी-जटा निघाल्या. महाराज फारच छान तेजस्वी दिसायला लागले. गीतामाईने एकदा महाराजांशी सूनबाईला आणण्याची गोष्ट काढली. महाराज म्हणाले, ''उद्याच जातो'' व त्याप्रमाणे ते खातवळला गेले. त्यांना पाहून सर्वांना आनंद झाला. महाराजांच्या सासूबाईंना लाज वाटू लागली की ह्याच गोसाव्याला आपण विचारले होते. सरस्वतीला फारच आनंद झाला. एकतर पतिभेट झाली व दुसरे म्हणजे ते स्वतः आपल्याला न्यायला आले याचा (अभिमान) गौरव वाटला. सरस्वती घरी आली.

महाराजांचा रोजचा कार्यक्रम सुरू झाला. पहाटे ५/५।। ला उठावे. प्रातर्विधी उरकून ६ वाजता काकडा करावा. मग भजन करावे.

दासबोधावर थोडे निरूपण करावे. थोडे लोक येत असत. नंतर ८ वाजता स्नानसंध्या उरकून ११ वाजेपर्यंत लोकांच्या अडचणी असतील तर त्या सोडवाव्यात. मग पूजा, जेवण, वामकुक्षी, सायंकाळी एकनाथी भागवतावर प्रवचन, नामस्मरण, आरती असा साधारण कार्यक्रम चाले.

दिवस सुखाचे आनंदाचे समाधानाचे चालले होते. आईला मुलगा भेटला. त्याने गृहस्थाश्रम स्वीकारला व संसारात कामकाजात लक्ष घालायला सुरुवात केली, म्हणून आईला आनंद झाला. तसेच सरस्वतीला आपले सौभाग्य मिळाले, पती आपल्याशी खूप चांगले वागतात याचा आनंद होता. पण दोघींच्याही मनात कुठेतरी कोपऱ्यात एक भीती होती की 'हे पुन्हा निघून तर जाणार नाहीत ना?' म्हणून त्या सारख्या लक्ष ठेवत असत.

एक दिवस गीतामाय म्हणाली, "आता तू मोठा झालास. त्यांच्याच्यानी कामाचा व्याप आता होत नाही. तेव्हा हे कुलकर्णीपद आता तू सांभाळ." लगेच महाराज आईला 'हो' म्हणाले. व त्यांनी हळूहळू कामे करायला सुरुवात केली. अगदी लक्ष देऊन कामे करीत असत. आईला आता खात्रीच वाटली, 'बरं बाई, हा प्रापंचिक झाला.'

सरस्वतीचा सारा दिवस तर कामात जाई. तिच्या कष्टांची महाराजांना जाणीव होती. घरात राबता जास्तच होता. शिवाय इतर लोक पण महाराजांना भेटायला येत असत. महाराजांनी सरस्वतीला

सारे काही शिकविले. वडील माणसांशी कसे वागावे, आल्या-गेल्याचे स्वागत कसे करावे, कोणाचे अंतःकरण दुखवू नये. दाराशी कोणी आले तर त्याला विन्मुख जाऊ देऊ नये, नाम कसे घ्यावे, अनुसंधान कसे टिकवावे, अखंड नाम कसे घ्यावे, भक्ती कशी करावी, भजन कसे करावे, हार कसा करावा, तूप कसे वाढावे, निंदा कशी टाळावी वगैरे बारीकसारीक गोष्टी सांगितल्या. तसेच वेळोवेळी ते मार्गदर्शन करीत असतच. तिची अगदी खात्री झाली की, महाराज खरंच मोठे साधू आहेत. घरी अन्न, वस्त्र, निवारा यांची पंचाईत नव्हती. महाराजांना घराचे मंदिर केलेले आवडत असे म्हणून त्यांना आवडणारे नामस्मरण, भजन, अन्नदान ती अगदी आनंदाने करीत असे.

तिला वाटत होते, सुख सुख ते काय आणखी वेगळे असते का? अनुकूल गोष्टी झाल्या की सुख, प्रतिकूल गोष्टी झाल्या की दुःख. पण हे सुख खरे सुख-चिरकाल आनंद देणारे आहे का? हे सारेच क्षणभंगुर आहे. आज ज्या गोष्टी सुखाच्या वाटतात त्याच उद्या दुःखाला कारणीभूत होतात. हा आनंद नेहमी राहतो का? आणि राहात असता तर जगातले सर्वच प्रपंचामध्ये सुखी झाले असते. मग प्रपंच सुखाचा नाही, हे संत कशाला म्हणतात. केवळ कल्पनेमुळे सुद्धा आपण किती सुखी किंवा दुःखी होतो. मग खरे सुख कशात आहे? संत सांगतात, ''सुख एक आहे हरी आठविता। इतर जपता दुःख बहू।।'' (एकनाथ.) खरंच परम सुख देणारे भगवतनाम आहे. परमार्थ आहे. प्रपंच नाही. प्रपंचात हाव जास्त आहे. आणखी काहीतरी हवंय, हे

संपतच नाही. मग ते मिळेपर्यंत चिंता. मनासारखे मिळाले तर आनंद, नाहीतर दुःख आणि मनासारखे मिळाले तर नवीन काहीतरी हवं असतं म्हणून चिंताच. खरंच, महाराज सांगतात ते बरोबर आहे. नामातच जर रंगून गेलो तर अगदी निव्वळ सुखच मिळतं. अशा विचारात ती बुडून जात असे व मनातील प्रश्न ती महाराजांना विचारायची. आणि त्यांचा संवाद मोठा गोड चाले. तिला नामाची महती, अनुसंधानाचे महत्त्व अगदी मनापासून पटत चालले होते. महाराजांची मर्जी आपण संपादन करावी, त्यांना आवडते ते करावे म्हणून ती खूप नाम घेत असे.

महाराजांनी कुलकर्णीपद अगदी उत्तम चालवले होते. जमिनीची वसुली, सरकारी कामे, तंटेबखेडे सोडविणे इ. पूर्ण व्यवहार महाराज पाहत असत. एक दिवस गीतामाईला ते म्हणाले, ''आई, मला या कामाचा अगदी कंटाळा आला आहे. मी जातो आणि गुरुभेट घेऊन येतो.'' आईला थोडीशी काळजी वाटली. आता पुन्हा हा नाहीसा होतो की काय?

भाऊसाहेब केतकर इंजिनिअर होते. त्यांच्या दिमतीला गडीमाणसे, टांगा वगैरे असायचा. सातारा, म्हसवडला ते जात असत. एकदा गोंदवल्याला मारुती-मंदिरात ते उतरले. बरोबर स्वयंपाकी होताच. महाराज तेथे गेले व म्हणाले, ''अहो, मी गावचा कुलकर्णी आहे. आपली विचारपूस करणे माझे कर्तव्य आहे. आपण माझ्याकडे जेवायला चलावे.''

त्याप्रमाणे भाऊसाहेब त्यांच्याकडे जेवायला आल्यावर त्यांच्या देवासंबंधीच्या खूप गप्पागोष्टी झाल्या. भाऊसाहेब रोज गीतेचा अध्याय वाचीत असत.

पुन्हा जेव्हा महिनाभराने भाऊसाहेब गोंदवल्याला आले, तेव्हा त्यांची चांगलीच ओळख झाली होती. ते तेथून पुढे म्हसवडला जाणार होते. महाराज म्हणाले, ''तुमच्या टांग्यात एकाला जागा आहे का?'' यावर भाऊसाहेब 'हो' म्हणाले. महाराज म्हणाले, ''अहो, माझी आई दारात उभी आहे. तिची तेवढी परवानगी काढता का?'' भाऊसाहेबांना नवलच वाटले. ते गीतामाईला विचारायला गेले. तो त्या कडाडल्याच. ''अहो याला नेऊन पुन्हा आणून सोडण्याची जबाबदारी घेत असाल तर न्या. अहो हा एकदा गेला तो नऊ वर्षांनी परत आला.'' भाऊसाहेबांनी महाराजांकडे अर्थपूर्ण नजरेने पाहिले. महाराज म्हणाले, ''नाही नाही, तसे होणार नाही. मी दोन-तीन दिवसांत परत येईन.'' महाराजांच्या डोक्यात पुन्हा घरातून निघून जाण्याचे वेड आहे असे वाटून आईला थोडी अस्वस्थता आली होती. भाऊसाहेबांबरोबर म्हसवडला गेले व पंढरपूर करून घरी परत आले.

परंतु त्यांच्या डोक्यात गुरुकडे जाण्याचे होते. ते आईला म्हणाले, ''आई, मी माझ्या सद्गुरुंकडे जाऊन येतो.'' आई म्हणाली, ''बाबा रे, कुंठेही जा पण तुझ्या बायकोला बरोबर घेऊन जा.'' सरस्वतीनेही तुकामाईंच्या गोष्टी ऐकल्या होत्या. तिलाही त्यांना भेटण्याची ओढ होतीच. ती महाराजांना म्हणाली, ''मी पण येणार.''

महाराज म्हणाले, "फार अवघड वाट आहे. त्रास होईल." तरीसुद्धा ती ऐकेना. मग एक दिवस मध्यरात्री उठून जायला निघाले. सरस्वतीने ते ओळखून तीही बरोबर निघाली. 'तू येऊ नको.' असे ते म्हणाले होते. पण तिने ऐकले नाही. महाराज जंगलातून पळत सुटले तशी तीही त्यांचे मागे पळत होती. महाराजांनी पायाने खडे उडवायला सुरुवात केली. तरीही ती तशीच पुढे जात राहिली. एवढे झाल्यावर महाराज म्हणाले, "तू गुरुंच्या दर्शनायोग्य आहेस." आणि मग ते सावकाश मजल दरमजल करीत येहेळगावी येऊन पोहोचले.

त्यांना पाहून तुकामाईंना फारच आनंद झाला. दोघांनीही त्यांना नमस्कार केला. तुकामाईंनी दोघांच्याही तोंडात साखर घातली. आठ दिवस दोघांना ठेवून घेतले. सूनबाईचे कोडकौतुक केले. घरी यायला निघायचे म्हणून दोघेही नमस्कार करायला गेले. तुकामाई सरस्वतीला म्हणाले, "माय, तुला काय पाहिजे? माग." सरस्वती म्हणाली, "मला यांच्यासारखा मुलगा व्हावा." तुकामाई 'तथास्तु' म्हणाले. पण गुरुशिष्य एकमेकांकडे बघून हसले. तेव्हा सरस्वतीला वाटले, आपले काही तरी चुकले. दोघेही निरोप घेऊन बाहेर पडली. सरस्वतीने विचारले, "आपण दोघे का हसलात?" महाराज म्हणाले, "अग, ते काहीही देऊ शकले असते. तू हे काय मागितलेस? नश्वराने कधी सुख लाभले आहे का? तुला मुलगा होईल पण तो अल्पायुषी ठरेल." तिला खूप वाईट वाटले. पण आता काय उपयोग? ती म्हणाली, "महाराज, माझ्या स्त्री-बुद्धीने मला फसविले. पण आता या देहाचे

धनी आपण आहात. मला कल्याणाचा मार्ग दाखवावा.'' हे ऐकून तिला योगदीक्षा द्यावयाचे महाराजांनी ठरविले व ते तिला नाशिकला घेऊन गेले. अर्थात् तिची योग्यताही तशीच होती.

खरेच प्रारब्ध ही काही और चीज आहे. प्रयत्न बलवत्तर आहे, असे एक प्रकरण योगवाशिष्ठात आहे. पण खूप प्रयत्न करूनही जिथे तो थिटा पडतो तेव्हा त्याला प्रारब्ध म्हणतात. योग-वाशिष्ठात प्रारब्धाला 'पंचम पुरुषार्थ' म्हटले आहे. एखाद्या माणसाला खूप प्रयत्न करूनही जे मिळत नाही ते दुसऱ्याला सहजसाध्य होते. एखाद्याच्या नशिबात पैसा असेल तर तो काहीही करून येतोच तर एखाद्याला खूप कष्ट घेऊनही दिडकी मिळत नाही. यालाच 'पूर्वकर्मविपाक' म्हणायचा. तुकोबांचा एक अभंग आहे. 'प्रारब्धेची जोडे धन। प्रारब्धेची वाढे मान।। प्रारब्धेची जोडे सुख। प्रारब्धेची जोडे दुःख।। प्रारब्धेची भरे पोट। तुका करीना बोभाट।।'

खरेच, हे सर्व जर प्रारब्धावर अवलंबून आहे, तर प्रश्न असा पडतो की प्रयत्न करायचा का नाही? रामदास तर प्रयत्नावर भरच देतात. त्याचे असे आहे की एकाच तऱ्हेचे भोग हे सतत राहत नाहीत. त्यांचाही काही काळ असतो. एकीकडे भोग व एकीकडे प्रयत्न असे चालते. काही कालांतराने भोग संपतो. आपण प्रयत्न चालूच ठेवले तर भोग संपल्यामुळे ते फळाला येतात. शिवाय आपण काही अगदी स्वस्थ बसत नाही. मग योग्य मार्गाने प्रयत्न करणे बरे नाही का? महाराज म्हणत असत, 'प्रयत्न अंती परमेश्वर' म्हणजे प्रयत्न आपण

करावे व फळ भगवंतावर सोपवावे. पण जगात बरेचदा असे दिसून येते की, 'होणारे न टळे कदापि जरी ये ब्रह्मा तया आडवा' किंवा 'लल्लाटरेखा कधी पालटेना.' जर काम होणार असेल तर प्रयत्न योग्य दिशेनेच होतात. अगदी रामकालापासून प्रारब्ध कुणी टाळू शकलेले नाही. जे घडायचे ते तसे त्या वेळेला घडतेच. असो.

महाराजांनी सरस्वतीला नाशिकला नेले व राम मंदिरात दोघे राहू लागली. हे मंदिर नदीकिनारी होते. महाराजांनी तिला जोगीण बनवायचे ठरविले. वडाचा चीक लावून तिच्या केसांच्या जटा वळल्या. हातातील बांगड्या काढून तुळशीच्या माळा घातल्या. मंगळसूत्राऐवजी गळ्यातही तुळशीच्या माळाच घातल्या. पांढरी पातळे नेसावयास दिली. मूळची सुरेख तरतरीत असल्याने सरस्वती फारच तेजस्वी दिसू लागली. एका कोपऱ्यात तिला बसवत व दुसऱ्या कोपऱ्यात ते बसत. तिला महाराजांनी पद्मासन घालणे, श्वासावर नाम घेणे, हे शिकवले. शिवाय मानसपूजा, ध्यान, धारणा, काही योगमुद्रा या गोष्टीही शिकवल्या. तिने अगदी मनापासून अभ्यास केला. ती समाधी अवस्थेपर्यंत गेली.

एक पोलीस अधिकारी तेथे रोज येत असे. बुवाबरोबर बाई ही काहीतरी भानगड दिसते आहे असे समजून तो सरस्वतीशी सलगी करू पाही. दोन तीन दिवस तिने हे सहन केले. पण नंतर तो महाराजांना काही तरी बोलू लागला, तेव्हा ही नागिणीसारखी चवताळून म्हणाली, ''मेल्या, खबरदार पुढे बोलशील तर. जा येथून. पुन्हा येथे पाऊल

टाकशील तर तुझे वाटोळे करीन.'' हे झणझणीत शब्द ऐकताच तो गर्भगळीत होऊन तेथून निघून गेला.

योगाचा व इतर अभ्यास साधारण सहा महिने चालला होता. नंतर महाराजांनी एका शिष्याला तिला घरी पोहोचविण्यास सांगून ते उत्तरेकडे गेले.

शिष्यांनी अत्यंत प्रेमाने गुरुपत्नीला घरी आणले. नमस्कार केला. त्यांच्या बायकांनी सरस्वतीला न्हायला घातले. बांगड्या भरल्या. मंगळसूत्र बांधले. कपाळी कुंकू लावले. पातळ-चोळी नेसविली आणि नात्यापोत्याला तिच्या बहिणीकडे पोहोचविले. सर्व माहेरच्यांना हा प्रकार बरा वाटला नाही. त्यांना वाटले हिचा छळ झाला. पण ती आई-वडिलांना म्हणे, ''तुमचे भाग्य थोर म्हणून तुम्हाला असा जावई मिळाला. त्यांनी माझे कल्याण केले. माझे दिवस खूप आनंदात गेले.'' नंतर काही दिवसांनी ती गोंदवल्यास गेली. काम करताना व इतर वेळीही तिचे अखंड नामस्मरण चाले.

साधारण आठ दहा महिन्यांनी महाराज गोंदवल्यास परत आले. ते दोन-चार वर्षे मात्र कुठे बाहेर गेले नाहीत. लोक महाराजांना भेटायला, दर्शनाला, मुक्कामाला येत. महाराज लोकांच्या अडचणी सोडवीत असत. त्यांना नाम घ्यायला सांगत. प्रत्येक मनुष्य समाधान पावूनच घरी जात असे. महाराजांचे बोलणे मोठे गोड असे.

काही दिवसांनी सरस्वतीला मातृत्वाची चाहूल लागली. आणि

याचा सर्वांत मोठा आनंद गीतामाईला झाला. तिने सर्व तऱ्हेची डोहाळेजेवणे केली. सरस्वतीला मुलगा झाला. सर्वांनाच फार आनंद झाला. बारसे मोठे थाटात करायचे बेत गीतामाई आखत होती. पण महाराजांनी ते टाळले. सरस्वतीला हे माहीत होते. वर्षाच्या आतच तो मुलगा देवाघरी गेला. त्याच्या पाठोपाठ सरस्वतीला ताप येऊ लागला. महाराजांनी मोठ्या खुबीनें तिला आता जायची वेळ आली असल्याचे सांगितले. तिने सिद्धासन घालून नाम घेता घेता प्राण सोडला. तिच्या पाठोपाठ रावजींचेही देहावसान झाले.

रावजी गेले तेव्हा महाराज इंदूरला होते. पण बरोबर दहाव्या दिवशी ते गोंदवल्याला आले व पुढील क्रियाकर्मांतर त्यांनी केले. गीतामाईला दुःख झालेच होते. पण महाराज असल्यामुळे तिला थोडा आधार वाटला.

सरस्वती गेल्यावर काही दिवसांत लोक मुली सांगून येऊ लागले. महाराजांचे वय त्या वेळी तीस-बत्तीस वर्षांचे झाले होते. आई म्हणाली, "गणू, तू लग्न कर. अरे, माझ्यासाठी तरी कर." महाराज म्हणाले, "करीन, पण मुलगी माझ्या पसंतीची राहील." आईने 'बरे' म्हणताच महाराज तेथून जे उठले ते आटपाडीला देशपांडे यांच्याकडे गेले. त्यांना पाच मुली होत्या. महाराज म्हणाले, "माझ्या एका मित्राला लग्न करायचे आहे. आपली मुलगी दाखवता का?" त्यांनी तीनही मुली समोर उभ्या केल्या. महाराजांनी विचारले. "आपणाला एक आंधळी मुलगी आहे ना?" देशपांडे यांनी तिला बोलावून घेतले.

महाराज म्हणाले, "मला पसंत आहे" व शेवटी "मीच लग्न करतो" आहे असे सांगितले. देशपांडे यांना खूप आनंद झाला. नाही तरी त्या आंधळ्या मुलीची त्यांना काळजी होतीच. त्यांनी होकार दिला. पुढे काही दिवसांनी एकटेच जाऊन लग्न करून आले व दोघे आईच्या पाया पडले. महाराज म्हणाले, "आई, अशी सून आणली आहे की ती डोळे वर करून सुद्धा पाहणार नाही." आईने पाहिले तो ही आंधळी. मग म्हणाल्या, "गणू, तू काय करशील ते खरं. आता असू दे. चांगली आहे." तिचेही नाव 'सरस्वती'च ठेवले.

पुढे काही दिवसांनी महाराजांचा भाऊ अण्णा वारला. तसेच त्यांची बहीण मुक्ताबाई जी खातवळला दिली होती, तीही वारली. गीताबाईला फार दुःख झाले. पण काय करणार? 'होणारे न चुके कदापि, जरी ये ब्रह्मा तया आडवा.'

महाराज मधूनमधून नैमिषारण्य, अयोध्या, इंदूर, जालना वगैरे ठिकाणी जाऊन येत. मनात आले की ते निघायचे. तसेच एकदा पंढरपूरला गेले असताना अलिबागचे सदुभाऊ लेले यांची गाठ पडली. त्यांनी महाराजांना अलिबागला येण्याविषयी निमंत्रण दिले. सहज फिरतफिरत महाराज रात्री १२ वाजता पोचले व सदुभाऊंचे घरी गेले. नेमके सदुभाऊ घरी नव्हते व त्यांची म्हातारी आई एकटीच घरी होती. महाराजांनी दार वाजविले तेव्हा तिने "कोण आहे?" म्हणून विचारले. महाराजांनी उत्तर दिले, "मी तुमच्या मुलाचा-सदुभाऊचा गुरु आहे." म्हातारीने झरोक्यातून पाहिले. हा दाढीवाला बैरागी

दिसतो. म्हणून म्हणाली, "मी तुम्हाला ओळखत नाही. मुलगा बाहेर गेला आहे. तो येईतोवर बसा बाहेरच. मी दार उघडणार नाही." महाराज तसेच बसून राहिले. सदुभाऊ आल्यावर म्हणाले, "अहो, हे काय? आपण बाहेर का बसलात?" महाराज म्हणाले, "अहो, तुमच्या म्हातारीने आत घेतले नाही." सदुभाऊबरोबर महाराज घरात गेले. सदुभाऊ आईला काही तरी म्हणणार तोच महाराज म्हणाले, "अहो, तिने अगदी बरोबर केले. रात्री-अपरात्री एखाद्या अनोळखी माणसाला दार उघडणे बरे नाही."

नंतर म्हातारीने, तिला खूप वाईट वाटून, क्षमा मागितली. महाराज दोन-चार दिवस तेथेच होते. एकदा बोलताना म्हातारी म्हणाली, "महाराज, माझे वय आता पंचाहत्तर वर्षांचे झाले. माझा मुलगा सर्व गोष्टी ऐकतो. सर्व काही चांगले आहे. आपल्या मांडीवर डोके ठेवून मरावेसे वाटते." महाराज म्हणाले, "माय, हे खरे ना? मग वेळ कशाला. आताच चला ना." म्हातारी व मुलगा दोघेही चमकली. म्हातारी म्हणाली, "अहो, आताच काही घाई नाही. मनात आले ते सांगितले झाले." सर्वच जण हसू लागले. महाराज म्हणाले, "आजपासून सतत नाम घ्यावे. अंतकाळची काळजी करू नये. प्रत्यक्ष मारुतीराया तुम्हाला न्यायला येतील."

तेथून महाराज निघाले ते थेट उत्तरेला गेले. अबूच्या जंगलातून ते चालले होते. एका भिल्लाच्या टोळीने पाहिले. पिळदार शरीर, तेजस्वी चेहरा पाहून त्यांना वाटले हा आपल्यासारखाच लबाड बैरागी

दिसतो आहे. तेव्हा त्यांना त्या सर्व भिल्लांनी घेरले व आपल्या वस्तीकडे घेऊन जाऊ लागले. महाराज निमूटमणे जात होते. कोणी त्यांची टिंगल करीत होते. कोणी धक्के मारीत होते. पण हे गप्पच होते. त्यातला एक म्हातारा मनुष्य मांत्रिक होता. तो म्हणाला, ''अरे, याला काही मंत्रबिंत्र येत असतील.'' ते सरळ त्यांना वस्तीकडे घेऊन गेले. काही जण भात वगैरे शिजवायला लागले. तो म्हातारा महाराजांना म्हणाला, ''तुम्ही काय खाता?'' महाराज म्हणाले, ''मी दूध पितो.'' तेव्हा म्हाताऱ्याने काही तरूणांना त्यांना दूध देण्यास सांगितले. तरुण खोडसाळ होते. त्यांनी एका वांझ गाईला महाराजांसमोर बांधले व म्हणाले, '' बैरागी बुवा, पोटभर दूध प्या.'' आणि महाराज काय करतात म्हणून गंमत पाहत बसले. महाराजांनी गाईच्या पाठीवर प्रेमाने थाप मारली व अगदी प्रेमाने म्हणाले, ''माय, मला भूक लागली आहे. तेवढेच दूध दे.'' ती गाय त्यांना चाटू लागली व लगेच तिच्या आचळातून दुधाच्या धारा लागल्या. महाराजांनी ते भांड्यात साठवून पोटभर प्यायले. हा चमत्कार पाहून ते भिल्ल भयभीत झाले व पटापटा महाराजांच्या पाया पडले. महाराज म्हणाले, ''हा धंदा खोटा आहे. तो सोडून द्यावा.'' आणि सर्वांना अनुग्रह देऊन रामनाम दिले. त्यांचा उद्धार केला. महाराजांना गाईंविषयी, एकूण प्राण्यांविषयी फारच प्रेम होते. प्रेम ही काही और चीज आहे. 'प्रेम न ये दाविता, बोलता, सांगता, अनुभवे चित्ता चित्त जाणे.'

कितीतरी गाई म्हसवडच्या, दहीवडीच्या बाजारात विकायला

येत असत. भाकड गाई कत्तलखान्यात दिल्या जात. महाराज त्या गाईंना पैसे भरून सोडवून कोणाला तरी पाळायला देत असत, अगर गोठ्यात ठेवत असत. एकदा असे झाले की कसाई लोक म्हणाले, ''आम्ही तुम्हाला गाई देणार नाही.'' महाराज म्हणाले, ''मी तुम्हाला पैसे देतो ना!'' तरीही ते कबूल होईनात. मग फक्त म्हणाले, ''इतके जर गाईचे प्रेम आहे तर गाईंना तुम्ही हाका मारा. गाई जर तुमच्याकडे आल्या तर आम्ही त्या तुम्हाला देऊ.'' महाराज 'हो' म्हणाले व अत्यंत प्रेमाने गाईंना हाका मारू लागले. ''गंगे ये, गोदे ये, यमुने ये, कृष्णे ये.'' आणि काय आश्चर्य! सर्व गायी महाराजांकडे ओळख नसतानाही आल्या. त्यांनाही आपल्याला कसायला कोण देणार व कोण प्रेमाने पाळणार हे कळत होते. प्रेम ही आंतरिक ओढ, समज आहे. महाराजांकडे एक लंगडी गाय होती. जर महाराजांनी तिच्या पाठीवरून हात फिरविला नाही आणि प्रेमाने हाक मारली नाही तर ती व्याकुळ होत असे. महाराजांना पाहून तिच्या डोळ्यांत पाणी येत असे. तसाच बत्ताशा नावाचा एक घोडा होता. त्यावरून महाराज एक रपेट मारून आले की त्याला बरे वाटायचे. केवढे हे भूतमात्री प्रेम. प्रेम हे बांधून ठेवत असते. म्हणून तर जनाबाई म्हणते, 'धरिला पंढरीचा चोर, प्रेमे बांधूनिया दोर। हृदय बंदिवान केला। आत विठ्ठल कोंडीला।।' असो.

अबूच्या जंगलातून महाराज पुढे नर्मदेच्या कडेकडेने महेश्वर गावात आले. महाराजांचा अधिकार जाणून सर्व लोक त्यांना मान देत असत. मेवा-मिठाई समोर आणून ठेवीत असत. तो सर्व थाटमाट

पाहून तेथील दोघा मांत्रिकांना वाटले की त्यांना काही मंत्रसिद्धी आहे. ती जर आपण शिकलो तर आपलेही महत्त्व वाढेल. म्हणून ते महाराजांना म्हणाले, ''अहो बुवा, आपला मंत्र आम्हालाही शिकवा.'' महाराज म्हणाले, ''माझ्याकडे एकच तेरा अक्षरी मंत्र आहे.'' त्यांना ते खोटे वाटले. आता नुसते सांगून हे मंत्र देत नाहीत ही खात्री झाल्यावर त्यांनी बोलतबोलत महाराजांना डोंगरावर नेले. तेथे ते महाराजांना म्हणाले, ''बऱ्या बोलाने मंत्र सांगा. नाही तर कठीण वेळ येईल.'' महाराज गप्पच होते. तेव्हा त्यांनी आपल्या मंत्राने नाग उत्पन्न केले व सर्व बाजूंनी नागांनी महाराजांना बांधून टाकले. महाराज तीन दिवस तसेच बसले होते. चवथे दिवशी मांत्रिक म्हणाले, ''बुवा, आता तरी खरे सांगा. फुकट प्राण गमवावे लागतील.'' महाराज म्हणाले, ''माझे रक्षण करायला राम समर्थ आहे. पण आता तुम्हाला मात्र आपल्या मंत्राला मुकावे लागेल. तेव्हा आपला मंत्र आवरा.'' त्यांना वाटले हा बुवा उगाच गप्पा मारतो आहे. थोड्या वेळाने महाराजांनी 'जय जय रघुवीर समर्थ' म्हणून खाली उडी मारली. सर्व सर्प मरून गेले व त्यांची विद्या निष्फळ ठरली. तेव्हा ते दोघे महाराजांना शरण आले. महाराजांनी त्यांना अनुग्रह दिला व रामनाम मंत्र दिला. एकाला नर्मदाकाठी १२ वर्षे तपश्चर्या करण्यास सांगितले व दुसऱ्याला त्यांनी आपल्या बरोबर घेतले.

नंतर काही दिवसांनी महाराज उज्जैनीला आले. तेथे एक समर्थ भक्त सरकारी अधिकारी होता. महाराजांना त्यांनी दोनतीन वेळा

जवळून पाहिले होते. पण एकदम विश्वास कसा ठेवावा? काही परीक्षा पहावी म्हणून विचार करू लागले. त्याचा मुलगा आजारी पडला व विषमज्वर झाल्याचे कळले. पाचव्या दिवशी त्याचे जास्त झाले. नाडी सुटत चालली. त्याला एक कल्पना सुचली. तो तडक महाराजांकडे गेला व म्हणाला, ''महाराज उद्या आपण मजकडे प्रसादाला यावे.'' हो-नाही करता यायचे ठरले. बरोबर ५०-५५ माणसे होती. रात्री मुलाची नाडी सुटली व मध्यरात्रीला तो गेला. प्रेत तसेच झाकून ठेवले. सकाळी अकरा-साडेअकराला महाराज आले. सर्व लोक पानावर बसले. आता संकल्प सोडणार तेव्हा त्याची बायको मुलाला घेऊन आली व महाराजांना म्हणाली, ''आपण याला सोडून जेवणार कसे? हा तर रात्रीच गेला.''

महाराजांनी त्याला मांडीवर घेतले. छातीवर हात ठेवला व म्हणाले, ''हा जिवंत आहे. अंग गरम लागत आहे. मात्रा आणावी. देवाचे तीर्थ व अंगारा आणावा.'' मात्रा चाटवली. तीर्थ, अंगारा दिला आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे तो हालचाल करू लागला. आतापर्यंत इतका वेळ महान गंभीर बनलेले वातावरण एकदम आनंदित झाले. अधिकाऱ्याने महाराजांना साष्टांग नमस्कार केला आणि क्षमा मागितली. महाराजांनी त्यांना दासनवमीला सज्जनगडावर जाण्यास सांगितले व नाम घेण्यास सांगितले.

महाराज नेहमी म्हणत असत. कोणीही बुवा होण्याच्या फंदात पडू नये. खरेच आहे. किती कडू प्रसंग महाराजांवर आले, परीक्षेचे

प्रसंग, नाव जाण्याचे प्रसंग, निष्ठेचे प्रसंग आले पण त्यातून सहीसलामत पार पडले महाराज! नव्हे नव्हे हे संत फारच मोठे अधिकारी असतात. त्यांचे भगवंत कर्ता, रामकर्ता, जगाचा सूत्रधार कोणी वेगळा आहे, हे पक्के ठरलेले असते. मनावर पक्के ठसलेले असते. त्यामुळे त्यांना कसलीही काळजी वाटत नाही. राम करण्यास समर्थ आहे म्हणून ते अगदी निश्चित असतात. देहबुद्धी गेली असल्यामुळे लोकेषणेविषयी काहीही वाटत नाही. काही हवंय हा भागच नसतो अगदी स्वानंदात मग्न असतात. एकच ध्यास असतो, 'बुडती हे जन, न देखवे डोळा। म्हणूनी कळवळा येतो मज।।'-(संत तुकाराम). त्यांना दुसऱ्याचं दुःख पाहवत नाही. म्हणून अखंड जागृत करीत असतात. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती'. अशाच आणखी काही गोष्टी आपण पाहू या. महाराजांची दृष्टी सूक्ष्म झाल्याने त्यांना पुढचे-मागचे कळत असे. क्षमा हा तर त्यांचा महान गुण. शिवाय नाम म्हटले की ते सर्व भान विसरत असत.

इंदूरला राजा तुकोजी होळकर यांची गाठ पडत असे. तो पहिल्यांदा आला तेव्हा वेष पालटून आला. मनात ठरविले होते की यांनी मला ओळखले तर हा खरा साधू. भय्यासाहेब मोडक यांना घेऊन जीजाबाईंकडे माहाराजांना भेटण्यास गेले. महाराजांनी तुकोजींना हाताला धरून जवळ बसविले आणि म्हणाले, ''सरकारी कामासाठी सरकारने येण्याची काय जरूरी? सरकार जेव्हा मोठ्या सरकारला विसरते तेव्हा प्रश्न निर्माण होतात. त्याला आठवावे व त्याचे नाम

घ्यावे.'' राजा समजला. ओळखलेले दिसतेय.

भोग हा भोगूनच संपवावा लागतो. म्हणून कित्येकांचे भोग महाराज स्वतः भोगून संपवत.

साताऱ्याहून पंढरपूरला जाताना मध्ये गोंदवले लागते. त्यामुळे पुष्कळ लोक गोंदवल्यात मुक्काम करायचे. जेवण्याची, पाण्याची व्यवस्था होत असे. तसेच काही लोक दर्शनासाठी, राहण्यासाठीसुद्धा येत असत. वारकरी लोक तेथेच मुक्काम करीत. विसावा घेत. या सर्व लोकांची व्यवस्था महाराज करीत असत. मारुतीमंदिर त्यासाठी लहान पडत असे. तसेच त्यांचे घरही पुरे पडेना. म्हणून महाराजांनी मंदिर बांधायचे ठरविले. नकाशा त्यांनी स्वतःच काढला. गवंडी, सुतार वगैरे लोक गावातून आणले. पैसा फारसा जवळ नव्हता. पण दर्शनाला येणारे लोक पैसे ठेवायचे त्यात मंदिराचे बांधकाम चालले होते. एकदा गावजेवण घातल्याने महाराजांजवळ पैसाच उरला नाही आणि आठवड्याची मजुरी द्यावयाची होती. महाराजांनी कफनी झटकून दाखविली. म्हणाले, ''पहा रे बाबांनो, माझ्याजवळ पैसा नाही. दिवस आठवड्याच्या बाजाराचा आहे. तुम्ही आज इथेच जेवा. पाहू या राम काय करतो ते. जर मंदिर त्याचे आहे तर त्याने काळजी करावी.'' आणि दुपारी माने नावाचे गृहस्थ आले. उसाचे पीक चांगले झाल्याने रामाजवळ पैसे ठेवून गेले. मजुरी दिली गेली. शिवाय काही सामानही आणता आले.

मंदिर बांधून तयार होत होते. लोक विचारत, 'मूर्ती कुठे आहेत?' महाराज म्हणत. "मी कशाला काळजी करू? त्याचे मंदिर आहे. तोच येईल." इकडे तडवळे गावी कुलकर्णी यांनी मंदिर बांधण्यासाठी राम, लक्ष्मण, सीता यांच्या मूर्ती आणल्या व वाड्यात ठेवल्या आणि मंदिरासाठी पैसा जमवीत होते. एकदा वाड्याला आग लागली व मूर्तींनाही त्याची झळ लागली. कुलकर्णींच्या स्वप्नात येऊन मूर्ती म्हणाली, "आम्हाला इथे किती दिवस कोंडून ठेवणार आहेस? मला गोंदवल्याला ब्रह्मचैतन्याकडे जायचे आहे, तेथे पोचवा."

त्या दिवशी रविवार होता. महाराज म्हणाले, "आज कुणीतरी मोठे पाहुणे येणार आहेत. आपण उपवास करू या. भजन करू या. नामस्मरण करू या." थोडी दाण्याची उसळ व रताळ्याच्या फोडी सर्वांना देऊन महाराज दुपारी एक वाजता भजनाला उभे राहिले. दोन तासांनी त्यांनी दोन जणांना रस्त्यावर उभे केले. दोन गाड्यातून मूर्ती आल्या आहेत हे समजल्यावर महाराज सामोरे गेले व भाकरी ओवाळून टाकली. नामाचा जयघोष करीत सर्व जण रामरायाला आदराने घेऊन आले.

सात दिवस अगोदर महाराजांनी देवापुढे नारळ ठेवून अखंड नामस्मरण, भजन असा कार्यक्रम ठरविला. सिंहासन तयार करून घेतले. वाई, सातारा, कोल्हापूर, पंढरपूर, सर्व गावांहून लोक येत होते. कीर्तन, प्रवचन, अन्नदानाला बहर आला होता. रोज लोक दर्शन घेण्यासाठी येऊन जात असत. तो दिवस रामरायाच्या मूर्तींच्या

स्थापनेचा होता शके १८१३ (म्हणजे सन १८९१) महाराज हेच सर्वांचे श्रद्धेचे केंद्र होते. खूप मंडळी जमली होती. महाराज सगळ्यांची प्रेमाने विचारपूस करीत होते. गळ्यात नवी माळ, जरीची कफनी, खडावा घालून महाराज फारच तेजस्वी दिसत होते. रामरायाकडे अतिशय प्रेमाने पाहत होते. आईला बोलाविण्यासाठी महाराज गेले. मातेने येऊन रामरायाला डोळाभर पाहिले. वंदन केले आणि वात्सल्यप्रेमाने महाराजांवरूनही मीठ-मोहऱ्या उतरून टाकल्या.

महाराजांनी सर्वांना प्रसाद म्हणून काही ना काही दिले. विद्वान पंडितांना रेशमी वस्त्र व एक होन, कामगाराला धोतर, मुंडासे, पाच रुपये, सुवासिनींच्या ओट्या भरल्या. भरपूर अन्नदान केले.

'छत्रसिंहासनी, अयोध्येचा राजा' हे भजन झाले. वातावरण रामनामाने भरून गेले. भजन झाल्यावर रामरायाकडे अत्यंत प्रेमाने पाहिले. महाराजांचे डोळे डबडबले होते. 'श्री रामचंद्रा करुणा-समुद्रा' म्हणताच महाराजांच्या ओंजळीत रामरायाच्या गळ्यातील गुलाबाची फुले पडली. ती फुले प्रसाद म्हणून वाटली. महाराज 'ती मूर्ती नसून प्रत्यक्ष रामरायाच आहे' असे समजत असत. 'भाव तसा देव'. खरोखर आपली निष्ठाच कमी पडते.

एकदा महाराज लोकांशी सहज गप्पा मारत बसले होते. म्हणाले "लोक काळजी का करतात? काळजी करून काय होते. कर्ता राम हा भाव पक्का हवा. गोपाळराव, तुम्हाला कसली काळजी आहे?"

गोपाळराव म्हणाले, ''अहो, मुलीचे लग्न जमत नाही. काळजी नाही का वाटणार?'' दुसरे एक जण म्हणाले, ''मला मुलगा नाही. म्हातारपणी कोण सांभाळणार?'' तिसरे म्हणाले, ''माझ्याजवळ पैसा नाही.'' चौथे म्हणाले, ''माझी बायको दिवसभर गावात हिंडते.'' पाचवे म्हणाले, ''आमचे कुटुंब फार वाढले हो. फार हाल होतात.'' सहावे म्हणाले, ''माझ्याकडे सगळ्या गोष्टी आहेत. पण हे असेच राहील की नाही अशी शंका वाटते.'' महाराज म्हणाले, ''तुम्हा सर्वांची स्थिती अगदी काळजी करण्यासारखीच आहे. पण माझ्या नशिबी काही काळजी दिसत नाही. मला मुलगी नाही. बायको आंधळी, मुलगा नाही. पैसा तर नाहीच नाही. तरीपण मला काळजी लागेल असे काही आपल्याला सुचते का?'' एक गृहस्थ म्हणाले, ''अहो, आपण अन्नदानासाठी प्रसिद्ध आहात. आज स्वयंपाकघरात मीठ-तिखटाशिवाय काहीही नाही.'' महाराज म्हणाले, ''बरं मग?'' त्यावर ते गृहस्थ म्हणाले, ''उद्या शंभर जोडप्यांना भोजनास सांगावे.'' 'बरं' म्हणाले. बोलावणी गेली. दुसरे दिवशी काहीच काम नसल्याने सगळी माणसे, भजनाला, कीर्तनाला बसली. महाराजांनी अभंग घेतला. 'आम्ही काय कुणाचे खातो, तो राम आम्हाला देतो रे।' सुरुवातीला निरूपण चांगले रंगले. पण मग सर्वांची चुळबुळ सुरू झाली. कोणी म्हणे ''म्हातारी माणसे, मुले-बाळे यांना भात तरी हवा होता.'' दुपारी १२ वाजून गेले. सारे शांत होते. एक मुलगा आईजवळ जेवण मागू लागला. ती म्हणाली, 'जा महाराजांना सांग.'' मुलानी महाराजांच्या

कमरेला विळखा घातला व म्हणाला, ''मला भूक लागली आहे. भात हवाय.'' महाराज म्हणाले, 'जा रामरायाला सांग.'' त्याने तसेच केले आणि काय आश्चर्य ! सामानाने भरलेली एक गाडी आली. स्वयंपाकाची सगळी तयारी होती. अगदी भाजीसुद्धा निवडलेली होती. तो मालक महाराजांजवळ आला व म्हणाला, 'महाराज, मला मुलगा झाल्यावर दोनशे मंडळी जेवायला घालीन असे ती (बायको) म्हणाली होती. आज महिना झाला. तेव्हा कृपया या सामानाचा स्वीकार व्हावा.'' महाराजांनी 'जानकीजीवन स्मरण जय जय राम' म्हणत रामरायाला दंडवत घातला व लगेच स्वयंपाकाची तयारी सुरू झाली. सुंदर स्वयंपाक होऊन नैवेद्य व जेवणे झाली. महाराज म्हणाले, ''आपण थोडा धीर धरावा. खऱ्या अर्थाने, शुद्ध मनाने, निष्ठापूर्वक रामावर भार टाकला तर तो पोटभर देतो. आपली निष्ठाच कमी पडते. रामराय मात्र अगदी बेमालूम काम करतो.''

सकाळी महाराज भजनाला उभे राहिले व एकदम अभंगाला सुरूवात केली. 'त्रेपन्न वर्षे भूमीभार । आता पाहू आपले घर ।। देह मर्यादा सरली। मागे भक्ति करा भली।। दीनदास आनंदला। राम बोलावितो मला।। 'आता मी नैमिषारण्यात जातो' असे महाराज म्हणाले व सर्व लोक दचकले. भजन झाले. दुपारी बाराचा सुमार होता. महाराजांनी टांगा तयार करण्यास सांगितले. लोकांना काही सुचेना. गयावया करून ते न जाण्याविषयी सांगत होते. कोणी म्हणे, ''आमचे काही चुकले का? आमचा कंटाळा आला का? पण छे. ऐकतो कोण?

सर्व लोक - साश्रु नयनांनी पाया पडले. महाराज टांग्यात बसून पुढे गेले सुद्धा. एवढ्यात पुजाऱ्यांनी रामाकडे पाहिले, तर त्यांचे डोळ्यांतून अश्रू येत होते. तो लगेच टांग्यापाठोपाठ 'महाराज महाराज' करीत धावत सुटला. महाराजांनी टांगा थांबविला तेव्हा त्यांना हे कळले. तेव्हा त्यांनी टांगा परतविण्यास सांगितले. महाराज मंदिरात आले तोपर्यंत रामाचे कपडेही ओले झाले होते. सोवळ्याची लंगोटी नेसून महाराज रामाजवळ गेले. रामाकडे अतिशय प्रेमाने पहात त्याचे अश्रू पुसत म्हणाले, 'रामा, मी जाऊ नये असे तुला वाटते का? मग राहिले. मी जात नाही, आता तू रडायचा थांब बरं'' आणि खरंच अश्रू येण्याचे थांबले. महाराज राहणार म्हणून सर्वांना आनंद झाला. रामावर दुधाचा अभिषेक केला. खूप अन्नदान केले. तीन दिवस भजन झाले. एकादशीला रात्रीचे भजन फारच रंगले. नाचत नाचत महाराज रामासमोर गेले. भजन आणि आरती झाल्यावर महाराज म्हणाले, ''चैतन्य सगळीकडे भरलेले आहे. ते कोठेही प्रकट होते. भावना जर शुद्ध शंभर नंबरी असेल तर दगडाची मूर्ती देखील देव बनते. १८९७ सालची ही गोष्ट आहे. ही गोष्ट कुठे बोलू नका'' म्हणून महाराजांनी सांगितले तरी ती सर्वांना कळलीच.''

महाराजांना तीन गोष्टी प्रिय होत्या. रामनाम, अन्नदान आणि सगुणभक्ती. सगुणभक्ती कशी करावी हे त्यांनी प्रत्यक्षच दाखविले. ते म्हणत की घरात असलेला राम म्हणजे कोणी मोठा मनुष्यच हजर आहे हे समजावे. त्याला दगडाची मूर्ती मानू नये. अंधार झाला की त्याला

काळोखात बसायला लागू नये म्हणून दिवा लावावा. पूजेच्या वेळी डोळ्यांत, नाका-तोंडात हळदीकुंकू जाणार नाही असे पाहावे. तसे झाले तर त्यांना त्रास होईल असे समजावे. दुपारी त्यांच्या आवडीचे पदार्थ करून जेवावयास घालावे. उशीर करू नये. आंघोळ अगदी सावकाश घालावी. खसाखसा चोळू नये. स्वच्छ अंग पुसावे. गंध कोरीव लावावे. कपडे छान घालावेत. हार, फुले फार जड होतील असे करू नये. कोणतीही महत्त्वाची गोष्ट करावयाच्या आधी त्यांना सांगावे. कोणताही नवीन पदार्थ आधी रामाला अर्पण करावा. बाहेर जाताना त्यांना कशासाठी बाहेर जात आहोत ते सांगावे. अशाने सगुणाचा फार प्रेमा येतो आणि मूर्तीला उपासनेने सजीवता येते.

एकदा अंतरंगातील चार पाच माणसांसोबत महाराज बसले होते. म्हणाले "राम प्रगट झाले तर काय मागाल?" सर्व गप्प राहिले, तेव्हा स्वतः म्हणाले, "मीपणाची जाणीव कमी कर, असे मी मागेन. कारण परमार्थाला ती जाणीव फार घातक आहे."

एकदा कर्नाटकातील एक दशग्रंथी ब्राह्मण महाराजांचे नाव ऐकून आले. त्यांना भयंकर पोटशूळ होता. अन्नाशी जणू अगदी वैर होते. दुपारी दोनचे सुमारास ते आले. त्या दिवशी रामाला नैवेद्य होता म्हणून उशीर झाला. महाराज त्यांना म्हणाले, "बरे झाले, आपण वेळेवर आलात. आता स्नान उरकून प्रसाद घ्यावा." ते म्हणाले, "अहो, मी चार-आठ दिवसांनी थोडे अन्न खातो. अन्न खाल्ले असता मला फारच त्रास होतो." महाराज म्हणाले, "रामाचा प्रसाद बाधेल अशी

शंका तुमच्या मनात येतेच कशी? आज अगदी पोटभर जेवा.'' त्यांनाही वाटले. जेवावे झाले. समजा मृत्यू आलाच तर साधूजवळ येईल. म्हणून ते पोटभर जेवले व पोट दुखण्याची वाट पहात होते पण पोट दुखलेच नाही आणि त्या दिवसापासून पोटशूलही गेला.

आपला मुलगा चांगला वागतो, लोक त्याला मान देतात, तोही लोकांशी प्रेमाने वागतो हे पाहून गीतामाई तृप्त झाल्या. महाराज मातृसेवक होते. एकदा रात्री आईचे पाय चेपत असताना म्हणाले, ''आता तुझे वय झाले, तुझी काय इच्छा आहे ते सांग.'' आई म्हणाली, ''इतर काही नको. पण एकदा मला काशीयात्रा करावयाची आहे.'' महाराज म्हणाले, ''अग, मग वेळ कशाला? उद्या जाऊ.'' ती म्हणाली, '' अरे घराची व्यवस्था करायला नको का? लोक एक वासा देखील शिल्लक ठेवणार नाहीत.'' त्यावर महाराज बोलले, ''त्याची काळजी नको. मी सर्व व्यवस्था करतो.'' या वेळेस सगळ्यांना पत्र पाठवून काशीयात्रेला बोलावून घेतले. नंतर निघायचा दिवस जवळ आला. कोरेगावकरिता गाड्या जुंपल्या. गीतामाई लोकांना म्हणाल्या, ''अरे, जरा घराकडे लक्ष असू द्या. बरं का!'' लगेच महाराजांनी चिंतुबुवांना बोलाविले व मंत्र म्हणून घरावर तुळशीपत्र ठेवले व सर्व घर लुटविले. पंधरा मिनिटांत घर स्वच्छ झाले. मग महाराज आईला म्हणाले, ''आई, आता काळजी आहे का काही मागे? मागे लक्ष राहायला नको. काय माहीत पुढे काळ कसा येणार आहे!'' आई म्हणाल्या, ''अरे गणू मला वाटले होते, तू शहाणा झालास. पण तू

आहेस तसा बैरागी आहेस.'' सर्वजण प्रयागला गेले. तेथे तीन दिवस राहिले. खूप दानधर्म केला. मग काशीला आले. तेथे एक महिनाभर राहिले. तेथेही घाटावर आईच्या हाताने खूप दानधर्म करविला. गाव जेवणे, भिकारी जेवणे, सहस्त्रभोजने घातली. मग गयेला जाऊन अयोध्येला आले. आईची प्रकृती खालावत चालली होती. महाराजांनी शरयूतीरावर एका गादीवर तिला बसवून म्हटले, ''आई, गादीखाली रुपये आहेत. तू सर्वांना हवे तेवढे दे.'' आई सर्वांना मुठी भरभरून देत होती. पण पैसे काही संपले नाहीत. आई म्हणाली, ''अरे गणू, एवढे पैसे आणलेस तरी कुठून?'' त्यावर महाराज म्हणाले, '' अग, तुझ्या गादीखाली पैशाची गंगा वाहते आहे. ''आई म्हणाली, ''हे आधी मला समजले नाही.'' महाराज म्हणाले, ''त्याचा उपयोग आपल्यासाठी करायचा नसतो.''

आईने मनसोक्त दान केल्यावर महाराजांनी तिला उचलून घरी आणले. रामाला प्रसाद केला आणि आईला खाऊ घातला. म्हणाले, ''आई, आणखी तुझी काय इच्छा आहे?'' आई म्हणाली. ''आता अगदी मुळीच काहीही इच्छा नाही. तुझ्या मांडीवर डोके ठेवून मरण यावे म्हणजे झाले. त्याच दिवशी गीतामाईनी 'राम राम' म्हणत महाराजांच्या मांडीवर डोके ठेवून प्राण सोडले.

महाराज एवढे धैर्याचे खरे पण आई गेल्यावर ते म्हणाले, ''आई, तू गेलीस ना!'' बाराव्या वर्षी घर सोडणाऱ्या महाराजांचे

रामरायाच्या खालोखाल आईवर प्रेम होते. त्यांच्या डोळ्यांत पाणी तरारले. सहज अभंग स्फुरला.

दया करी राम सीता । सांभाळावी माझी माता ।।
दया करी शरयू बाई। मुक्त करी माझी आई ।।
आईचे दोष, माझे माथा । एवढी ऐकावी विनंती ।।
आता कोठे राहू , कोठे जाऊ । आई तुला कोठे पाहू ।।

सर्व लोक भराभर जमले. नामाच्या गजराने सर्व आसमंत दुम-दुमले. आईला अग्नी देऊन महाराज परतले. दिवस, वार सारे व्यवस्थित केले. भरपूर अन्नदान व वस्त्रदान केले.

महाराजांनी खूप जणांचा अंतकाल साधला. ते नाम घेणाऱ्यांवर फार प्रेम करायचे. मोरगिरीचे वामनराव पेंढारकर यांना पुष्कळ वर्षांनी मोठेपणी एका मुलगा झाला. तो नेहमी सारखा आजारी पडे. मोठा झाला तरी आजारी असायचा. काळजी वाटून ते त्याला घेऊन गोंदवल्यास आले. महाराज म्हणाले, "ही ठेव रामरायांनी दिली आहे. तिचे काय करायचे ते रामावरच सोपवू." महाराज त्यांना भक्तीबद्दल, जगाच्या नश्वरतेबद्दल सांगत असत. मुलाचा अंतकाळ जवळ आला तेव्हा रामासमोर मुलाला आपल्या मांडीवर घेतले. तोंडात रामाचे तीर्थ, गंगा घातली, कानात तुळशीपत्र ठेवले आणि म्हणाले "बाळ, आनंदाने जा बरे" असे म्हणून निरोप दिला. त्यानेही मान होकारार्थी हलविली. त्याला रामासमोर ठेवले. सर्वांनी भजन

केले. तो गेल्यावर ब्रह्मानंदांनी त्याला अग्नी दिला. त्याचे आई-वडील हे सर्व शांतपणाने पाहत होते. सत्संगाने व नामाने हे साधते. त्या मुलाचे केवढे भाग्य नाही का?

पंढरपूरला बाळकोबा परिचारक नावाचा एक माणूस राहत असे. सदाचरणी होता. पण संतावर विश्वास नव्हता. तो महाराजांची तोंडावर निंदा करी. महाराज त्याच्याशी फार प्रेमाने वागत. महाराज एकदा म्हणाले, ''बाळकोबा. काळवेळ सांगून येत नाही. रोज थोडे रामनाम घेत जा.'' तो हसून म्हणाला, मी असा उगीच जप करीत बसणार नाही.माझे काम लवकर झाले पाहिजे. नाहीतर तुमचा उपयोग काय? वरून विरोध असूनही महाराजांनी त्याच्या हृदयांत नामरूपाने प्रवेश केला होता. पुढे त्याला क्षय झाला. तो सरळ गोंदवल्याला आला व म्हणाला, ''महाराज, आपल्या मांडीवर डोके ठेवून मरायला मी आलो आहे.'' महाराज रोज रामाचे तीर्थ, अंगारा देत असत. एक दिवस त्याला घेऊन ते ओढ्याकडे गेले. तेथे त्या दोघांचे काय बोलणे झाले माहीत नाही. पण बाळकोबा त्या दिवसापासून नामाच्या तंद्रीत दिसे. शेवटच्या दिवशी त्याला बाहेरून शुद्ध नव्हती. पण नामाचा उच्चार मात्र सारखा ऐकू येत होता. प्राणोत्क्रमण झाले तेव्हा त्याचे डोके खाली ठेवत महाराज म्हणाले, ''माणसाचे पूर्वचरित्र काही का असेना, त्याने थोडे पण मनापासून नाम घेतले तर ते मोठे काम करते. अंतकाल समयी नामाची आठवण होणे हे भगवंताच्या प्रेमाचे द्योतक आहे. बाळकोबाला चांगली गती मिळाली.

महाराज एकदा कागवाडला गेले होते. राममंदिराचे आवार झाडण्याचे काम एक बाई करीत होती. ती रोज पुजाऱ्यांना विचारी की महाराज कधी येतील. गणूबुवा म्हणून तेथील पुजाऱ्यांनी तिला विचारले, "संते, महाराजांजवळ काय मागशील? त्यावर ती म्हणाली, की मी मुक्ती व मरण मागेन. तिने थोडे पैसे जमवून शेजाऱ्याकडे शेवटच्या कार्यासाठी देऊन ठेवले होते. ती जेव्हा महाराजांचे दर्शनाला आली तेव्हा महाराजांनी तिला विचारले, "माय, तुला काय पाहिजे?" ती म्हणाली, "मायबाप, आता मला सोडवा. मी खूप भोगले. उरलेले तीर्थप्रसादाने जातील. एवढी कृपा करा." महाराजांनी आपल्या हाताने तिला तीर्थप्रसाद दिला आणि डोक्यावर हात ठेवला. म्हणाले "आता तू लवकर घरी जा." तिने पुन्हा पुन्हा नमस्कार केला. म्हणाली, "आता मी येते" घरी गेली. इतरांचा निरोप घेतला. तीनदा 'राम राम राम' म्हणत प्राण सोडला. महाराज म्हणाले, ती मोठी अधिकारी बाई होती." तिच्या क्रियाकर्मासाठी पन्नास रुपये महाराजांनी दिले आणि तिच्या नावाने अन्नदान केले.

अंतकाल साधणे, अंतकाळी नामात असणे ही फार मोठी भाग्याची गोष्ट आहे. अंती मति। तैसी गति।। त्याकरिता नामाचा, साधनाचा अभ्यास लागतो. गुरूकृपा तर हवीच हवी. आपण अनुग्रह घेतो म्हणजे आपण त्यांचे होतो. आपली सर्व जबाबदारी गुरूच घेत असतात. पण कृपा होण्याकरिता साधन करायला नको का? कोणाची मर्जी संपादन करायची असेल तर त्याच्या मनासारखे वागायला

लागते. हे अनुभव सांगतो. मग फार मोठी अशी कृपा संपादण्यासाठी महाराजांना जे आवडते ते नको का करायला? त्यांना नाम सर्वांत जास्त आवडते. ते म्हणतात जो नाम घेतो त्याच्या दारात मी कुत्र्यासारखा पडून राहतो. आपले काम फक्त नाम घेण्याचे, त्यांची कृपा आहेच पण आपण विषयांत रममाण होऊन त्याला देहबुद्धीचा अडसर घालतो. नाम घेणे म्हणजे त्यांची मोठी सेवाच होय. नामात संत आणि भगवंत असतात. आपण त्यांचेवर उद्धाराची जबाबदारी सोपवायची व आपण मात्र विषयांत रममाण व्हायचे हे कसे काय? तरीही ते आपल्याला विषयातून बाहेर काढतील यात शंका नाही. कुंभारासारखा त्यांचा एक हात आधाराला असतो आणि दुसऱ्या हाताने थापटी मारून ते आपल्याला सारखे करीत असतात. संत फारच क्षमाशील, दयाळू, कृपाळू, कनवाळू असतात. तेव्हा त्यांना आवडणारे नाम घ्यावे. कृपा होईलच.

एक दिवस संध्याकाळी महाराज इतर मंडीळींसह फिरायला गेले व एका बारक्या पुलाच्या कट्ट्यावर बसले. कोरेगांव दिशेने एक शेतकरी व त्याची बायको येत होती. शेतकरी पुढे गेला. त्या बाईची व महाराजांची दृष्टादृष्ट झाली. तशी ती एकदम थांबली व मिशा पिळण्याचा आविर्भाव करीत म्हणाली, "मला तू कोण समजलास? मी असे पुष्कळ बुवा पाहिले आहेत. तू माझं काय करणार?" एकंदर सगळाच प्रकार नवीन होता. महाराज म्हणाले, "ए भटा, तू पुष्कळ बुवा पाहिलेस पण माझा झटका पाहिला नाहीस. बऱ्या बोलाने बाईला

सोड.'' लोकांना म्हणाले, ''जा रे, या गाढवाला मारुतीपाशी बांधा. रात्री त्याची व्यवस्था करू.'' हे ऐकून पिशाच्च नरम झाले. लोकांनी बाईला थोरल्या राममंदिरात नेऊन मारुतीच्या मागे बसविले. रात्री भजन संपेपर्यंत ती स्थिर होती. पण आरतीच्या वेळेला आरडाओरडा करू लागली. महाराजांनी तिला तिची हकीगत सांगण्याची आज्ञा केली. बऱ्याच वेळानंतर ती म्हणाली, ''मी वाखरीचा दामोदर भट आहे. मी म्हातारपणी चवथे लग्न केले. मग मी वारलो. माझी इच्छा राहिली. यात्रेच्या गर्दीत हे झाड सापडले.'' महाराज म्हणाले, ''बाबा, आता तुला तर काही शक्य नाही. पण या झाडाला (बाईला) नामस्मरण करू दे. तू मुक्त होशील.'' इतरांना म्हणाले, ''वासनेचा जोर मोठा विलक्षण असतो. वासनेचा त्रास होत असून सुद्धा तिला काढणे कठीण होऊन बसते. फक्त भगवंताचे नामच त्यातून बाहेर काढू शकते. नाम घेतल्याने वासना विरळ होतात. जगात मोठे नामवंत सुद्धा क्षुल्लक वासनेला बळी पडतात. म्हणून नामाने वासनेवर मात करावी.''

एका माणसाची बायको मरायला टेकली तेव्हा तो फार रडायला लागला. तेव्हा ती म्हणाली, 'तुमचे माझ्यावर खरे प्रेम आहे ना? मग मुलाला चांगले सांभाळा. दुसरे लग्न करू नका.' या माणसाने तिला तसे वचन दिले. पुढे काही दिवसांनी ती गेल्यावर ही गोष्ट लक्षात न राहून त्याने दुसरे लग्न केले. लगेच पहिलीने सवतीला पकडले. ही हकीगत त्या माणसाने महाराजांच्या कानावर घातली. तेव्हा महाराज

त्या बाईला म्हणाले, ''बाई, तुझे म्हणणे तरी काय आहे?'' ती म्हणाली, ''नवऱ्याने वचन मोडले. आता सर्व संपत्ती माझे मुलाचे नावावर करावी.'' तो माणूस म्हणाला, ''हे कसे शक्य आहे? बाकीच्यांना काय देऊ?'' महाराज म्हणाले, ''होय. हेही ठीकच आहे.'' हो नाही करता करता महाराज काय सांगतील ते ऐकायचे ठरले. महाराज म्हणाले, ''सर्व संपत्तीचे दोन भाग करायचे. एक भाग पिशाच्चाच्या मुलाला व दुसऱ्यात इतर सर्व'' असे ठरले. हे कबूल करून काही वेळाने पिशाच्च फिरले. ते म्हणाले, ''नाही हे जमणार नाही.'' पुष्कळ सांगून सुद्धा ती ऐकेना. महाराज म्हणाले, ''अरे, तुमची डोकी ठिकाणावर आहेत ना?'' त्यावर ते पिशाच्च म्हणाले, ''असल्या पुष्कळ बुवांना मी अक्कल शिकवीन.'' हे ऐकल्यावर महाराजांनी आपल्या पायातील खडाव काढून तिचे डोक्यावर फेकली. हा मार बसता क्षणीच ते पिशाच्च प्रसन्न झाले व म्हणाले, ''महाराज, माझे काम झाले. मी पावन झाले यासाठीच मी इतका वेळ हट्ट करीत होते.'' महाराज म्हणाले, ''पाहा, या पिशाच्च्याला जे कळते, ते जिवंत माणसांना कळत नाही.'' ती मुक्त झाली.

गोंदवल्याला एक नवीन शाळामास्तर आले होते. त्यांना महाराजांशी पिशाच्च्यांचा चाललेला संवाद पटत नसे. त्यांचा पिशाच्च्यावर विश्वास नव्हता. महाराज एका बाईच्या अंगात येणाऱ्या पिशाच्च्याशी बोलत होते. तेव्हा त्या मास्तराने एका मुलाजवळ खाजकुयलीची भुकटी पाठवून दिली व तिच्यावर फेकण्यास

सांगितली. तशी ती भुकटी फेकल्यावर महाराजांचे पायावर पडली. त्यांना खाज येऊ लागली. बाईचेही अंगाला खाज सुटली. महाराजांनी मास्तरांना बोलावून घेतले व त्यांची चांगली हजेरी घेतली. ते गयावया करू लागले. ''मनुष्याने शुद्ध हेतूने चिकित्सा करावी, त्यापासून दुसऱ्याला त्रास होता कामा नये. पिशाच्च्याचे अस्तित्व सूक्ष्म सृष्टीत असते. म्हणून त्याचे ज्ञान होण्यासाठी आपली दृष्टीही सूक्ष्म व्हावी लागते. ती नामाने होते. म्हणून तुम्ही नाम घ्यावे.'' महाराजांनी सर्वांना सांगितले.

रामाच्या डोळ्यांतून अश्रुपात झाल्यानंतर बराच काळ महाराज गोंदवल्याला राहू लागले. खूप माणसे राहायला, दर्शनाला, जेवायला असत. अडाणी, विद्वान, गरीब-श्रीमंत, सुष्ट, दुष्ट, अहंकारी, निरहंकारी, गरजू, अनेक तऱ्हेच्या - व्याधीने घेरलेली, दुःखी-सुखी माणसे तेथे राहात असत व समाधान पावून घरी परतत असत.

१९०५ साली एकदा महाराज काशीयात्रेला जाण्यासाठी निघाले. सुरुवातीला थोड्याच लोकांना बरोबर घ्यायचे ठरले होते पण वाढता वाढता दोनशेच्यावर माणसे झाली. महाराज कोरेगावहून निघून प्रयागला गेले व तेथे एका धर्मशाळेत उतरले. धार्मिक कृत्ये पार पडत होती. वेणीदानासाठी २०/२५ जोडपी तयार झाली. हास्यविनोदात सर्व चालू होते. नावेत बसून संगमावर जायचे होते. नावाड्याकडून नाव चांगली असल्याची ग्वाही घेतली. ही जोडपी, महाराज, सर्व जण

त्या होडीत बसले. अगदी आनंदाने होडी चालली होती. पण मध्येच होडीला छिद्र पडले. पाणी वाढतच होते. आता लोकांमध्ये घबराट सुरू झाली. शेवटी महाराजांनी त्या भोकावर आपली कफनी ठेवली व त्यावर पाय दाबून उभे राहिले आणि म्हणाले, ''आज गंगामैय्या प्रसन्न झाली असे वाटते. आपल्याला ती पोटात घेणार'' येथपर्यंत होडीने मार्ग सोडून ती धारेला लागली होती. कोणी म्हणाले, ''महाराजांसोबत मृत्यू आला तर काय वाईट?'' कोणी म्हणाले, ''महाराज काहीतरी करतीलच!'' काही लोक डोळे झाकून बसले. काहींनी घाबरून महाराजांना घट्ट धरले. महाराज म्हणाले, ''चला, आपण आता रामाचे भजन करू या.'' असं म्हणून जोरजोराने टाळ्या वाजवून ''जय जय श्रीराम'' म्हणायला लागले. किल्ल्यातून संकटाच्या वेळी उडविण्यात येणाऱ्या तोफांचे आवाज आले. मदतीकरता नावा येऊ लागल्या. या नावेत पाणी जास्त भरत होते. भजन चालू होते. किल्ल्यावरून ब्रिटिश लोक पहात होते. किनाऱ्यावरच्या लोकांचे धाबे दणाणले. तोच महाराजांनी नाव आडवी केली व गती कमी झाली. एक नाव तेथे पोहचली. महाराजांनी एक पाय त्या होडीत ठेवला व सर्वांना त्या होडीत जाण्यास सांगितले. सर्वजण आल्यावर पहिल्या होडीतला पाय महाराजांनी काढला. लगेच तिला जलसमाधी मिळाली. ब्रिटिश लोकांनी टाळ्या वाजविल्या. मोठे संकट टळले होते. संतांच्या संगतीत भवसागर तरून जाता येतो. मग एवढीशी लौकिकातील नदी तरून जाता येणार नाही का?

कऱ्हाडमध्ये एक विधवा बाई राहात होती. तिला एक मुलगा होता. बाप लवकर वारल्याने मुलाला कोणाचा धाक राहिला नव्हता. तो व्यसनी बनला. आईजवळ सारखे पैसे मागायचा. तो आईला फारच छळू लागला. एकदा तर त्याने आईला मारले सुद्धा! तिने महाराजांचे नाव ऐकले होते. ती त्याला घेऊन महाराजांकडे गेली. ते ओढ्यावर स्नानाला गेले होते. तेथे ती मुलाला घेऊन गेली. आपण येण्याचे कारण तिने महाराजांना सांगितले. महाराज मुलाला म्हणाले, "अरे, तुझ्या बापाला मी ओळखत होतो. मला तुझ्याविषयी प्रेम वाटते. तू माझे ऐकशील का? रोज आईच्या पाया पडायचे व ती सांगेल तसे वागण्याचा निश्चय कर." तो 'हो' म्हणाला. महाराजांच्या प्रेमळ बोलण्याचा परिणाम दिसू लागला. पुढे चार महिन्यांनी आईचा अंतकाळ आला. बाईने त्याला महाराजांचे पदरात घातले व त्यांनीही त्याला पोटच्या मुलाप्रमाणे सांभाळण्याचे आश्वासन दिले. एक दोन महिने तो चांगला वागला व पुन्हा बाहेर जाऊ लागला. हे महाराजांच्या लक्षात आले. तो जरा दिसला नाही की महाराज त्याचा तपास करीत व आपले जवळ बसवत. एकदा एकादशीला गिरवीची लोकं भजनाला आली. प्रथम हा मुलगा भजनात होता. भजन रंगात चालले. हा उठून रात्री बाहेर निघून गेला. आरती प्रसाद होण्यास रात्रीचे दोन वाजले. हा मुलगा महाराजांना दिसला नाही. सर्वकडे निजानीज झाल्यावर महाराजांनी काठीला चिंधी बांधून मशाल तयार केली व मुलाचे शोधार्थ निघाले. ओढ्याच्या बाजूने मंदिराकडे येण्यास निघाले तो

आडोशाला तो मुलगा व एक स्त्री निजलेली आढळली. महाराज 'अरेरे' एवढेच म्हणाले, थंडीचे दिवस होते. महाराजांनी आपली कफनी काढली व त्या दोघांना पांघरायला घातली. पहाटे त्या मुलाला जाग आली. कफनी पाहून त्याला सर्व समजले. दरदरून घाम फुटला. आपल्या आईला दिलेल्या शब्दाकरिता केवढी मोठी क्षमा महाराजांचे जवळ होती असे त्याला वाटले. तो ओढ्याकडे गेला. स्नान केले. कफनी घातली व महाराजांचे खोलीसमोर हात जोडून उभा राहिला. महाराजांना पाहिल्यावर साष्टांग नमस्कार घातला. महाराज म्हणाले, "जा बाळ! गिरनार पर्वतावर बारा वर्षे नामस्मरण कर. तुझे काम होईल." तो लगेच तेथे निघून गेला. केवढी ही क्षमा!

महाराजांकडे कितीतरी लोक कितीतरी प्रश्न घेऊन येत असत आणि महाराज योग्य त्या गोष्टी सांगून समाधान करीत असत व नामाला लावीत असत. रोजचाच नवीन प्रश्न असायचा. महाराजांचा 'राम कर्ता' यावर पूर्ण विश्वास होता. त्यामुळे ते अगदी निवांत, शांत असायचे. खूप अन्नदान चाले. भाऊसाहेब केतकर पेन्शन घेतल्यावर तेथेच सहकुटुंब आले. ते पेन्शनची रक्कम महाराजांचे जवळ देत असत. महाराज सांगतील तेच ते प्रमाण मानत असत. ब्रह्मानंद हे कर्नाटकातील महाराजांचे पट्टशिष्य. संकृतचा गाढा अभ्यास असूनही महाराजांनी सांगितल्यापासून ते फक्त नामच प्राणापलीकडे जपत असत.

आनंदसागर हे जालन्याचे महाराजांचे शिष्य. त्यांची भक्ती फार मोठी होती. त्यांनी नामाला स्वतःला वाहूनच घेतले होते. एकदा दासबोध वाचीत असताना त्यांना महाराज दिसले. मग त्यांनी शोध घेतला तर त्यांना महाराज गोंदवल्यास मिळाले. असे आणखी कितीतरी भक्त होते. पुष्कळांच्या शंकांचे निरसन त्यांनी केले. वैदिक ब्राह्मणांना नामाचे महत्त्व पटवून दिले. महाराज म्हणत, "वेदारंभी ॐ म्हणता म्हणजे नामाच घेता ना!" कितीतरी लोक त्यांना आडवेतिडवे प्रश्न विचारीत असत. ते न रागावता त्याला उत्तरे देत असत. महाराज म्हणत, 'व्यवहार व्यवहाराच्या रूपानेच ओळखून करावा. आपण फसू नये व दुसऱ्याला फसवू नये. प्रपंचात थोडे पैसे म्हातारपणाकरिता शिल्लक टाकावेत, पण आधार पैशाचा न वाटता नामाचा वाटावा. आपले सगळे पैसे, इस्टेट मुलाला देऊन टाकू नये. आपण मेल्यावर ते त्यांचेच आहेत. कोणाचेही मन दुखवू नये. अन्नदान करताना मागेपुढे पाहू नये. कोणी उसने पैसे मागायला आला तर सगळे नाही, पण थोडे द्यावे."

रामभट जोशी हे दत्तमंदिराचे पुजारी होते. त्यांच्या मुलाचे नाव बाळंभट. ते वेदपठण केलेले होते. भिक्षुकी करीत असत. प्रकृतीही मजबूत होती. तसाच आहारही. त्यांना दुर्दैवाने गांजाचे व्यसन लागले व तऱ्हेवाईकपणात भर पडली. महाराज म्हणत, "बाळंभट, आपण वैदिक ब्राह्मण आहात. मला पूज्य आहात. आपण नामस्मरण करावे. कल्याण होईल." बाळंभट म्हणाले, "माझे गांजाचे व्यसन पुरविले

तर वाटेल ती आज्ञा मी पाळीन.'' महाराजांनी त्यांना रोजचा जप नेमून दिला व एक आण्याचा गांजा पुरविण्याची सोय केली. काही दिवस गेले. एकदा गांजा आणला नाही म्हणून रात्री ते तरातरा महाराजांकडे गेले. तो मंदिरात महाराज काही मंडळींचे समाधान करीत होते. मोठे प्रेमळ बोलणे चालले होते. काही वेळ बाळंभट ऐकतच राहिले. गांजाबद्दल विसरले. इतक्यात महाराजांचे लक्ष त्यांचेकडे गेले. ते म्हणाले, ''अरे खरंच, आज गडबडीमध्ये विसर पडला. राग मानू नका. मी जातोय.'' असे म्हणून स्वतः बाजारात जायला निघाले. त्यांचा थोरपणा बाळंभट जाणून होते. आपल्यासाठी इतक्या रात्री महाराज जात असलेले पाहून त्यांच्या हृदयात पीळ पडला. ''महाराज'', असं म्हणून त्यांना थांबविले. महाराजांचे पाय घट्ट धरले. पुढे बोलले, ''आपण समर्थ आहात. मला या व्यसनातून सोडवा.'' महाराजांनी म्हटले, ''खरंच सुटायचे आहे ना? मग रामाच्या पायावर हात ठेवून शपथ घ्या. पुन्हा गांजा-अफूला शिवणार नाही म्हणून. आजपर्यंतच्या पापांची जबाबदारी माझी. तुम्ही नामस्मरण करावे. राम तुमच्या पाठीशी आहे.'' बाळंभटांनी तसे केले. त्यांचे व्यसन सुटले. काय ही उद्धाराची तळमळ!

परभणीचा एक जमीनदार महाराजांकडे आला. त्याला परमार्थाचे वेड होते. त्याला वाटे, आपण सर्व त्याग करून रामदासी बनावे. नाम घ्यावे. महाराज म्हणत, ''त्यागी असावे. पण वेळ आल्यावर.'' पुढे त्याची बायको गेली. मुलाचे लग्न होऊन तो सर्व पाहू लागला.

जमिनदाराने असे ऐकले होते की सर्वस्वाचे दान दिले तर राम आपलासा होतो. त्याने एका कागदावर सर्व संपत्तीची यादी करून मुलाच्या संमतीने महाराजांकडे दिली. ती यादी त्याचे मुलाला परत करून महाराज म्हणाले, ''हे असे देण्याचे कारण नाही. आहे हे त्याचे आहे हे सदा स्मरणात असावे.'' पुढे तीन-चार वर्षांनी जमिनदार आजारी पडला. तेव्हा महाराज त्याला भेटायला गेले व म्हणाले, ''काय समाधानात आहात ना?'' तेव्हा तो रडू लागला व म्हणाला, ''राग मानू नका. मी रामाला सर्व दिले पण तो माझा झाला नाही.'' महाराज म्हणाले, मी सुद्धा तुम्हाला खरे तेच सांगतो. सर्व दिले हे खरे, पण 'स्व' दिला नाही. भगवंताला सर्वांपेक्षा 'स्व' देता आला पाहिजे. 'स्व' दिल्यानंतर 'सर्व' नाही दिले तरी चालते. 'स्व' बरोबर सर्व येतेच. आपले काही राहतच नाही. भगवंताला स्व देणे म्हणजे 'मी त्याचा आहे' ही जाणीव रात्रंदिवस ठेवणे होय. तुम्ही काळजी करू नका. तर अनुसंधानात, समाधानात रहा.''

महाराज इंदूरहून परत आल्यानंतर गोदुबाईचे लग्न झाले होते. तिला मुलगाही झाला होता. त्याच्या मुंजीचे निमंत्रण महाराजांना केले होते. पण त्यांना जाणे शक्य नव्हते. मुंजीचा दिवस आला. गोदुबाईचे सारे लक्ष महाराजांकडे होते. मुंजीचे दिवशी पाने वाढली. पण तूप गावाहून आले नव्हते. तिला काळजी वाटून ती महाराजांचे तसबीरीसमोर बसली. तिच्या डोळात पाणी आले. तिला त्यांचे शब्द आठवले. ''गोदूमाय, मी येथून जातो. म्हणून दुःख करू नये. माझी

आठवण केलीस की मी तुझ्याजवळ उभा राहीन. नामस्मरण करावं, जिथे नाम आहे, त्याचे आसपास मी घोटाळत असतो.'' हे आठवून तिने 'महाराज' अशी कळवळून हाक मारली. महाराज तसबिरीतून बाहेर आले व म्हणाले, ''गोदे, तुपाचे भांडे दे.'' तिने तसे केले. जवळ जवळ तीनशे पानाला पुरून तूप शिल्लक उरले. खूप लोकांनी महाराजांचे दर्शन घेतले. महाराज म्हणाले, ''गोदे, रामाची भक्त म्हणवतेस आणि अशा प्रसंगाला घाबरतेस? त्याच्या नामाला विसरू नकोस. त्याच्या नामात फार मोठी शक्ति आहे. जो नामात स्वतःला विसरला त्याचे मागे मागे राम फिरला.'' असे म्हणून ते देवघरात गेले व नाहीसे झाले.

कुबेर नावाचे गृहस्थ महाराजांकडे आले व म्हणाले, ''मला काही तरी नियम सांगा.'' महाराज म्हणाले, ''रोज नाम घेणे हा सर्वोत्तम नियम आहे.'' कुबेर म्हणाले, ''आपण प्रपंचात नियम पाळतो तर परमार्थात का नको?'' महाराज म्हणाले, प्रापंचिक नियम देहबुद्धीचे असतात. ते पाळणे सोपे असते. पण परमार्थातले नियम पाळण्यास भगवत् कृपा लागते. मी नियम पाळीन असे म्हणून चालत नाही.'' पण कुबेर म्हणाले, ''मी नक्कीच नियम पाळून दाखवीन. मी खूप नियम पाळले आहेत.'' महाराज म्हणाले, ''बरे तर. रोज अन्नाला स्पर्श करण्यापूर्वी तीनदा 'श्रीराम' म्हणावे. हा नियम पाळल्यास राम दर्शन देईल.''कुबेर यांना वाटले हा तर फारच सोपा नियम आहे.

आठ-दहा दिवसांनी कुबेर पुन्हा गोंदवल्याला आले. नियमाचा अगदी स्वप्नात देखील विसर पडणार नाही असे म्हणाले. ते गोंदवल्याला असताना एकदा महाराजांनी दहा वाजताच रामाला नैवेद्य केला. सर्वजण पानांवर बसले. जेवायला सुरुवात करणार इतक्यात महाराजांनी काही तरी बोलणे काढून लक्ष वेधले. सर्व ऐकत होते. पाच-दहा मिनिटे गेल्यावर महाराजांनी एकदम घाई केली. म्हणाले, ''अरे अन्न केव्हाच वाढले आहे. गार होत आहे. बसा बसा.'' लगेच सगळ्या जणांनी जेवायला सुरुवात केली. त्यात कुबेरही होते. लगेच महाराज कुबेरांसमोर आले व हळूच म्हणाले, ''आता 'श्रीराम श्रीराम' रात्री करणार का?'' हे शब्द ऐकले मात्र, नियमाच्या आठवणीने कुबेरांच्या डोळ्यात पाणी आले. दुपारी ते नम्रपणे म्हणाले, ''महाराज, माझी जिरली. आपले म्हणणे खरे आहे. नियम पूर्ण होण्यास रामाची कृपा लागते.'' महाराज म्हणाले, ''प्रापंचिक नियम काही दिवसांनी अंगवळणी पडतो. परमार्थात तो अंगवळणी पडू नये. त्या नित्यनियमात-आचरणात भगवंताचे प्रेम व जिवंतपणा असावा. भगवंताचा नियम पाळताना त्याच्या कृपेची याचना मनापासून करावी. तेथे मीपणा नसावा. त्याचे नाम घ्यावे म्हणजे तो कृपा करतो.''

एका माणसाने ब्रह्मदर्शन व्हावे म्हणून पुष्कळ तीर्थयात्रा केल्या. पुष्कळ सत्पुरुषांच्या गाठी घेतल्या. पण त्याला ब्रह्म कोणी दाखविना. तो फिरत फिरत एकदा पंढरपूरला आला. तेथे तपकिरी बुवांनी त्याला महाराजांचे नाव सांगून गोंदवल्याला पाठविले. तो महाराजांना

म्हणाला, ''माझे एक काम आहे. मी पुष्कळ लोकांना भेटलो पण कोणी 'ब्रह्म दाखवितो' म्हणत नाही. माझा आपणावर विश्वास आहे.'' महाराज म्हणाले, ''काम जरा अवघड आहे. पण पाहू या. आपण आताच आला आहात. जरा प्रसाद वगैरे घेऊन एक दिवस विश्रांती घ्या. ब्रह्म कुठे जाणार नाही आणि येणार पण नाही. ते जागीच स्थिर आहे.''

दुसरे दिवशी प्रवचनात 'ब्रह्मदर्शन होण्याकरिता नित्यानित्य वस्तुविवेक केला पाहिजे, भोग वासना गेली पाहिजे, सहनशक्ति हवी, पैशाचे प्रेम नसले पाहिजे, स्त्री-पुरुष हा भेद गेला पाहिजे.' इत्यादी विषयांवर विवरण केले. प्रवचन झाल्यावर तो गृहस्थ म्हणाला, ''अहो, मला ब्रह्म दाखविता ना? 'महाराज म्हणाले, ''आता निरूपण ऐकले ना?'' तो म्हणाला, ''मला सारे अवगत आहे. मला सारासार काय ते कळले आहे. भोगवासना राहिली नाही. मला पैशाचा लोभ नाही. पाहा ना, एक पै जवळ नसताना मी एवढ्या यात्रा केल्या. स्त्री-पुरुष भेदही राहिला नाही.'' महाराज म्हणाले, ''शाब्बास! बरीच तयारी दिसते आहे. मग उद्या ब्रह्म दाखवितो.''

दुसरे दिवशी तो ओढ्यावरून स्नान करून येत होता. महाराज पटाईत मावशीला म्हणाले, ''मावशे, फेड त्याचे धोतर.'' मावशी आज्ञापालनात तरबेज होती. तिने पुढे जाऊन त्याच्या धोतराच्या निऱ्या ओढून अर्धे अधिक धोतर फेडले. एक विधवा बाई आपले धोतर फेडते आहे हे पाहून त्यांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. धोतर तसेच हातात धरून तो मंदिरात आला आणि म्हणाला, ''ही बाई आहे

की अवदसा? डाकीण आहे डाकीण.'' महाराज म्हणाले, ''हो. हो. काय झाले?'' तो म्हणाला, ''काय झाले काय? अहो या सटवीने माझे धोतर फेडले.'' महाराज शांतपणे म्हणाले, ''म्हणजे ती बाई तुम्हाला बाईच दिसते. वस्त्र फिटण्याची लाज वाटते. तुम्हाला भयंकर राग येतो म्हणजे काल तुम्ही बोललां तशी तुमची अवस्था नाही. तुम्हाला देह, वस्त्र, मानापमान याची शुद्ध आहे. आता तुम्हाला ब्रह्म कसे दाखवू?'' त्याने हे सर्व मान खाली घालून ऐकले. मग महाराजांनी त्याला नामस्मरण करण्यास सांगितले.

एकदा वाईच्या शास्त्री मंडळींनी एका हरदासाला महाराजांकडे पाठविले. तो बायकोसह तेथे गेला. रामाला वगैरे नमस्कार करताना म्हणाला, ''मी हरदास आहे. मी उद्या सकाळी कीर्तन करणार आहे.'' महाराजांनी त्याला खूप आदराने वागविले. स्वतः सगळ्यांना कीर्तनाला येण्याविषयी सांगितले. सकाळी नऊ वाजता कीर्तन सुरू झाले. त्याने कीर्तनासाठी अभंग घेतला, 'ऐसे संत झाले कळी, तोंडी तंबाखूची नळी.'' प्रथम जरा इकडचे तिकडचे बोलला, मग महाराजांचेवर तोंडसुख घेण्यास व यथेच्छ निंदा करण्यास सुरुवात केली. इतर लोक रागाने चुळबुळ करू लागले. पण महाराजांनी त्यांना गप्प राहण्यास खुणावले व आपण डोळे मिटून जप करीत बसले. कीर्तन झाल्यावर महाराज त्यांना म्हणाले, ''वा! कीर्तन फार चांगले झाले.'' त्यावर हरदास म्हणाले, ''तुम्ही कोठे ऐकले?'' महाराज म्हणाले, ''अहो हे पाहा. या दोन कागदावर मी सर्व उतरून ठेवले

आहे.'' असे म्हणून पाटाखालून दोन कागद काढून दिले ते म्हणाले, ''अहो नुसते लिहून काय चाटायचे आहे? टाकून द्या हा भोंदूपणा. उगीच लोकांना नादी लावून का बुडविता?'' महाराज लगेच उठले. खांद्यावरची कफनी टाकून दिली. म्हणाले, ''बुवा, तुमच्या उपदेशाने आज मला वैराग्य आले आहे. मी हिमालयात जातो तुम्ही पण माझे बरोबर चलावे.'' असे म्हणून त्यांना खेचू लागले. म्हणाले, ''कुणीही सांगावे मी कुणाला बुडविले आहे का?'' असे म्हणून ते त्या बुवांना घेऊन रस्त्याने चालू लागले. बारा-एकची वेळ होती. पाय अगदी भाजत होते. हरदासाला पुढे चालवेना. तो ओरडू लागला. भाऊसाहेब म्हणाले, ''महाराज जेवण तयार आहे.'' महाराज म्हणाले, ''हां, आलोच आता याला घेऊन.'' अवस्था मोठी कठीण झाली. त्याची बायको रडू लागली. गंगूबाई म्हणाली, ''महाराजांचे पाय धर.''

तिने तसे केल्यावर महाराज त्यांना घेऊन देवळात आले आणि हरदासाला चांदीचे ताट मांडून त्याचा थाट केला. नंतर त्याने महाराजांचा अनुग्रह घेतला.

गोंदवल्याला जणू नामाचा बाजारच भरला. असे कितीतरी लोक येत असत. दर्शन घेत असत. नाना प्रश्न, नाना चिंतावर उपाय मिळवून ते समाधानाने घरी जात असत. रोज पंक्तीला पन्नास-शंभर माणसे असायची. महाराजांची एक खुबी होती. ते सर्वांची दुःखे अगदी आपलेपणाने ऐकून घेत व आपण त्यातलेच आहोत असे दाखवीत.

विश्वास वाटला की मग हळूच म्हणत, ''यावर नामाचा उपाय आहे. आपण करून बघावा. आपण रोज थोडे नाम घ्यावे.''

आळशी असेल त्याला ते श्रमाची कामे सांगत. खादाड असेल त्याला उपवास सांगत. बैठा असेल त्याला हिंडायला सांगत. खूप फिरत असेल त्याला एका जागी बसायला सांगत. सर्व लोकांचे केंद्रस्थान महाराज असत.

एकदा ते गावाला गेले असताना एक मुलगा त्यांचे समोर येऊन उभा राहिला व संकोचाने म्हणाला, ''महाराज, आमच्याकडे जेवावयास याल का?'' तो अतिशय गरीब मुलगा होता. महाराज लगेच 'हो' म्हणाले, व दुसरे दिवशी कोणालाही न सांगता जेवावयास त्याचे घरी गेले. वडिलांनी दोन भाकरी व थोडी भाजी केली होती. त्याला फार आनंद झाला. महाराज पानावर बसणार तोच त्यांची चौकशी करीत एकजण आला. त्याचेही पान मांडण्यास महाराजांनी सांगितले. इतक्यात कोणी पादुका घेऊन, कोणी सोवळे घेऊन करीता करीता बरीच मंडळी आली. महाराज प्रत्येकाचे पान घेण्यास सांगत. मुलाला व वडिलांना चिंता पडली की काय करावे. भाकरी तर दोनच आहेत. महाराज पुढे झाले व म्हणाले, ''अहो, काळजी करू नका. राम समर्थ आहे.'' आणि काय आश्चर्य! त्या भाकरी ५/५० माणसांना पुरून पुन्हा दोन भाकरी शिल्लक राहिल्या. वडिलांनी महाराजांचे पाय धरले. मनातली इच्छा पूर्ण झाली होती. पण हा चमत्कार फक्त त्या दोघांनाच समजला.

दुसऱ्या एके वेळी एका माणसाने महाराजांना व इतर थोड्या माणसांना घरी बोलविले. दूध देण्याचा त्याचा बेत होता. महाराजांबरोबर शंभर-दीडशे माणसे होती. महाराज म्हणाले, ''दुधाची घागर माझेकडे दे. मी सर्वांना दूध देतो.'' त्याने तसे केले. दूध सर्वांना पुरुन उरले. अर्थात ही गोष्ट फक्त महाराज व तो यांनाच कळली.

कित्येक लोकांना मारुतीच्या रूपात महाराजांनी दर्शन दिले आहे. कित्येकांना रामाची सेवा करण्याकरिता ठेवून घेऊन त्यांचे दुःख दूर केले.

इंदूरमध्ये एक मोठा अधिकारी होता. तो सारी व्यसने बाळगून होता. तो महाराजांना तुच्छ मानीत असे. तो म्हणे, ''बुवा, हे काय ढोंग माजविले आहे? येथे काही चालणार नाही बरं का! येथे गाठ आमच्याशी आहे.'' महाराज हसले व म्हणाले, ''येथे कोणाचे चालते ते पाहू या.'' तो पोलिस अधिकारी गुर्मीने हवे ते बोलला. महाराज शांत होते. तो पुढे म्हणाला, ''तुम्ही एवढे साधू म्हणविता पण मला माझे भविष्य सांगाल तर मी साधू म्हणेन'' महाराज म्हणाले, ''अहो, आम्ही बोलून चालून रामदासी. आम्हाला काही येत नाही. आम्ही फक्त नाम जाणतो. पण तुमची इच्छा ही गोदू पुरी करील.'' असे म्हणून त्यांनी गोदूच्या पाठीवर थाप मारली. म्हणाले, ''गोदे, सांग यांना भविष्य'' ती म्हणाली, ''अरे, रावसाहेब ऐक. आजपासून आठवे दिवशी तुझी दोन्ही पोरे मरतील. पुन्हा पंधरा दिवसांनी तुझी बायको

मरेल. नंतर सरकारी रोष ओढवेल. महाराजांना शरण आलास तर ठीक होईल.''

तो अधिकारी मनात चरकला. परंतु 'असे कुठे खरे होते का?' असे त्याला वाटले. त्याची दोन्ही पोरे ओढ्याला अचानक पाणी आल्याने खेळताना मेली. त्याची बायको दुःखाने वेडी झाली व पंधरा दिवसांनी मेली. याच सुमारास त्याने पैसे खाल्याचे उघडकीस आले व तो बडतर्फ झाला. आता त्याचे डोळे उघडले. तो तात्काळ महाराजांकडे आला व पायावर डोके ठेवून रडू लागला. महाराजांनी त्याला पोटाशी धरले व प्रेमाने अंगावरून हात फिरविला. तो म्हणाला, ''महाराज, माझ्या अपराधासाठी आपण मला एवढी मोठी शिक्षा केली. हे काय?'' महाराज कळवळून म्हणाले, ''अरेरे, हे काय बोलतोस? मी शिक्षा करीन ही कल्पनाही मला सहन होत नाही. त्यावेळी मी तुला ये म्हटले, पण तू जवळ आला नाहीस. अरे, ज्या गोष्टी आतापर्यंत घडल्या त्या तुझ्या प्रारब्धाने घडणारच होत्या. तुझ्या भाग्याने त्या तुला आधी कळल्या इतकंच. जन्म-मृत्यु हे भगवंताचे हाती असतात. कोणी करू म्हणून ते घडत नसतात. दोष कुणाचाही नाही.'' तो म्हणाला, ''आता मी काय करू?'' त्याला पोटाशी धरून महाराज म्हणाले, ''प्रारब्धाचे क्षेत्र हे फार बलवत्तर असते. तेथे इलाज नसतो. झाले ते होऊन गेले. आता यापुढे आपले मन नामस्मरणात गुंतवावेस.'' त्याने तसे केले व तो भगत किसनराव झाला.

गोंदवल्याला महाराजांनी धाकटे राम मंदिर बांधले, दत्तमंदिर, औंधची यमाई तसेच गावचा फौजदार म्हणून शनिमंदिरही बांधले. महाराजांना खाजगी जीवन राहिलेच नव्हते. त्यांनी .केतीतरी राममंदिरांची स्थापना केली.

एकदा गोंदवल्याला दहा दिवसाचे रामनामाचे अनुष्ठान झाले. सांगता महाराजांना विचारून करायची ठरली. खर्चाकरिता प्रत्येकाने आपल्या जवळचे पैसे दिले. एकाने बायकोचा दागिना गहाण ठेवून पैसे दिले. महाराजांनी विचारले, ''हा पैसा कोठून आणला?'' त्यांनी वर्गणी केल्याचे सांगितले. महाराजांनी सर्वांना त्यांचे त्यांचे पैसे परत करण्यास सांगितले. म्हणाले, ''माझा राम भिकारी नाही.'' आणि मग रामापुढे ज्याने जेवढे पैसे ठेविले होते त्यातच समारंभ केला. ते म्हणत असत. ''भाव ठेवा रामापायी, कोणा मागू नका काही.''

एकदा लोक गावाला जायला निघाले. सुवासिनींची ओटी भरायला खण नव्हते. महाराजांनी गादीखालून खण काढून ओट्या भरल्या.

गोंदवल्यात कोणाची बारशी, डोहाळजेवणे, लग्ने, मुंजी अखंड होत असत. मोठ्या प्रेमाने महाराज सर्व गोष्टी करत असत. महाराजांचे सांगणे असे की ''प्रपंचातले काहीही सोडायला नको आणि सोडायचे काय हे पाहाण्यापेक्षा काय धरायचे ते पहावे. विकार सोडण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा नाम धरायचे पाहावे. मुखात नाम ठेवावे, हातात काम असावे व मनात अखंड राम कर्ता ही भावना ठेवावी.''

भोग हे भोगायला लागणारच पण नामामुळे ते सुसह्य होतील. कोणाचेही मन त्यांनी कधी दुखविले नाही. इतके की जेकबने त्यांच्यावर विषप्रयोग करण्यासाठी जेवायला बोलाविले व तो प्रयोग केला. त्याचे मन दुखेल म्हणून त्याचे निमंत्रण, त्यांनी त्याचा हेतू माहीत असतानाही, नाकारले नाही. पुढे त्या विषामुळे त्यांची खूप आग आग झाली व तेव्हापासून त्यांचा दमा बळावला.

महाराज काही जणांचे भोग स्वतः भोगून संपवत असत. औंधच्या राणीची पापे, काशीबाईचा ताप, इतर कितीकांचे कितीतरी भोग त्यांनी भोगले. अतिशय दारिद्र्यात असलेली त्यांची मावशी रोज त्यांना कमी तेलाच्या थालिपीठाचा नैवेद्य दाखवीत असे. ती गोंदवल्याला एकदा आली असताना महाराज म्हणाले, "मावशे, माझे पोट दुखते आहे." ती प्रेमाने म्हणाली, "अरे औषध देऊ का?" महाराज हसून म्हणाले, "नको. अग रोज कोरडे थालिपीठ खातो ना म्हणून दुखतंय." मावशीच्या डोळ्यात पाणी आले. ती म्हणाली, "मी तरी काय करू?"

मानस पूजेत अर्पण केलेले सर्व त्यांना पोहचत असे. त्याच्या किती म्हणून गोष्टी लिहाव्यात, सांगाव्यात? एकच तळमळ-भक्तांचा उद्धार-उद्धार-उद्धार. "जगाच्या कल्याणा संताच्या विभुती." महाराज म्हणत असत, "माणूस म्हणून जन्माला आला आहे ना? त्याचा आज ना उद्या उद्धार होणारच." त्यामुळेच वाटते, महाराज म्हणजे प्रेम-फक्त प्रेम.

आताशा महाराजांना दम्याचा त्रास वाटू लागला. पायावर सूज येई. लोकांची गर्दी वाढतच होती. सर्वांचे समाधान महाराज करीत असत. पण ते आताशा मनाशी म्हणत ''आता परत जायला हवे.'' व्याप फारच वाढला होता. कार्य बरेचसे घाईने संपवावे लागत होते. एकदा महाराज सगळीकडे जाऊन भेटी देऊन आले. कोणाकोणाला त्यांनी बोलावून घेतले.

पहाता पहाता १९१२ साल आले. त्यांनी सर्वांना पत्रं पाठवून मोठ्या आग्रहाने ''मला भेटावेसे वाटते आहे. कदाचित् मी नैमिषारण्यात जाणार आहे. तेव्हा जरूर यावे.'' असे कळवीत. कोणाला आवर्जून निरोप पाठवीत. कोणी आले तर त्याला चार दिवस जास्त ठेवून घेत. याआधी ते सर्वांना भेटून-गावोगावी जाऊन-आले होते. आपल्या जाण्याचे ते थोडेसे सुचवीत असत. पण बोलताना ते इतके सहज बोलत असत की कोणाच्या लक्षात त्यांच्या बोलण्याचे गांभीर्य म्हणावे तसे आले नाही. शिवाय त्यांचा स्वभावही थोडा विनोदी असल्याने कोणाला संशय आला नाही.

गोंदवल्याचा व्याप आता फारच वाढला होता. रोज साधारण पाचशे माणसे तरी असायची. कोणी गाड्या भरून येई. कोणी जाई तर कोणी मुक्कामाला थांबत असत. जागा खूपच कमी पडायला लागली. मग महाराजांनी बरीच नवीन बांधकामे करवून घेतली. दम्याचा त्रास होतच होता. तरी सुद्धा नवीन विहिरी खणल्या. ओढ्याला घाट बांधला. पाकशाळा मोठी केली. शनीचे मंदिर बांधले. काही शेती

विकत घेतली. आपली सर्व शेती मंदिराला देऊन टाकली. त्यांनी एक मृत्युपत्र केले. मंदिराचे एक संस्थान बनवून त्यावर पंच नेमले. सर्व व्यवस्था आखून दिली. ''आल्या-गेल्याला भाकरी द्यावी व सर्वांनी नाम घ्यावे,'' हे मुख्यतः सांगितले.

त्यांना नामाचे जबरदस्त प्रेम होते. ते म्हणत, ''जेथे नाम आहे तेथे मागेपुढे मी उभा आहे. गोंदवल्याला मी नामाचा बाजार मांडला. कल्पनेच्या बाहेर मला त्यात यश आले. नाम हेच जीवनाचे सार होय.'' ते नेहमी बजावत की, ''कोणती वेळ कशी येईल सांगता येणार नाही. तेव्हा सर्व शंका विचारून घ्याव्यात व नामाच्या मागे लागावे.'' जे लोक त्यांचेवर विसंबून आरामात राहात त्यांना ते म्हणायचे, ''पाहा रे बाबा, मी कधी पक्ष्यासारखा उडून जाईन सांगता येत नाही. आता काळ मोठा कठीण येणार आहे. नीतीचे आचरण होणार नाही. जो प्रामाणिकपणे नाम घेईल, त्याला मात्र भीती नाही. १९१३ साली रामनवमीला महाराजांनी साऱ्यांना बोलावून घेतले. प्रत्येक पत्रात 'मी कदाचित् नैमिषारण्यात जाईन.' हा मजकूर होताच.

जवळ जवळ बरेच जण गोंदवल्याला रामनवमीला आले. पाच हजार माणसे होती. उत्सव अत्यंत थाटाने दहा दिवस चालला. भरपूर अन्नदान, रामनाम चालत होते. रोज भजन, प्रवचन, कीर्तन, पुराण, अध्यात्मचर्चा असे चालायचे. रामनवमी झाल्यावर लोक जायला निघाले. महाराजांच्या पाया पडायला आले की महाराज अतिशय प्रेमाने त्यांचे पाठीवरून हात फिरवून सांगत होते, ''भगवंताने

आपल्याला ज्या स्थितीत ठेवले त्यात समाधानाने राहावे. अखंड नाम घ्यावे. विसर पडू देऊ नये. जो नाम घेईल त्याचे मागे राम उभा आहे. माझे सांगणे शेवटपर्यंत विसरू नका..''

त्या वर्षी तीन ठिकाणी रामजन्म करावा लागला. पाडव्याला गावजेवण झाले. दहा हजार पान झाले. रात्री रामरायाची मिरवणूक, पालखी सोहळा झाला. महाराजांना पुष्कळांनी कफनी, कुबडी, खडावा, अत्तर, माळ, उपरणे अशा वस्तू दिल्या. ह्या वस्तूंचा ढीग तयार झाला. महाराजांनी प्रसाद म्हणून त्या सर्व वस्तू वाटून टाकल्या.

गोंदवल्याला एक माणूस रहात होता. त्याला लोक ''वेडा आप्पा'' म्हणत असत. पण तो मोठा अधिकारी पुरुष होता. महाराजांचा थोर भक्त होता. तो नदीवर स्नान करीत होता. विश्वनाथ नावाच्या माणसाला तो म्हणाला, ''अरे मला गोंदवल्याच्या भोवती जाळ दिसत आहे. दादा (म्हणजे महाराज) आता फार दिवस राहाणार नाही.'' घाणेकर आले तर त्यांना तो म्हणाला, ''आता तुम्ही खूप दिवस राहा. दादाचा नेम नाही.'' बेळगावच्या काही बायका गोंदल्याच्या बाजारात फिरत होत्या. आप्पा एका टोकाला बसला होता. म्हणाला, ''घ्या. घ्या. अहो लुटा. गोंदवल्याचा बाजार उठण्याची आता वेळ झाली आहे.'' पण त्याचेकडे कुणीही लक्ष दिले नाही. एके दिवशी सकाळी ११ वाजता तो मंदिरात आला. महाराजांनी त्याला आपले शेजारी बसविले, तेव्हा महाराजांना म्हणाला, ''दादा, मी पुढे जातो. मला

परवानगी द्या.'' महाराज म्हणाले, ''रामाचा प्रसाद खाऊन जा.'' दुसरे दिवशी नदीकाठी त्याने देह ठेवला.

महाराज दिवसें दिवस फार थकत चालले होते. एके रात्री सर्वांना अंथरुण-पांघरुण मिळाले की नाही पाहून आले. बसले व म्हणाले, ''छे, थकलो बुवा. भाऊसाहेब, हे सगळे जण म्हणतात की आम्ही गुरुसेवा करायला आलो, पण मलाच या सर्वांची सेवा करायला लागते. भगवंताची सेवा एका परीने सोपी आहे पण गुरुसेवा करणे फार कठीण आहे. कल्याणानी खरी गुरुसेवा केली. देहबुद्धी गेल्याशिवाय पूर्ण गुरुसेवा घडत नाही आणि गुरुसेवेत देह झिजवल्याशिवाय देह-बुद्धी नष्ट होत नाही.

नंतर काही दिवसांनी बडव्यांच्या बोलवण्यावरून महाराज पंढरपूरला गेले. सर्व लोकांना त्यांनी नामाचाच उपदेश केला. आणि सांगितले की, ''काळ कोणालाच सांगून येत नाही. तेव्हा नाम घ्या.'' तुकाराम वल्हवणकर नेहमी पंढरपूरला येत असत. ते वेदान्तशास्त्र चांगले जाणत असत. त्यांना वाटे, नामापेक्षा रूप श्रेष्ठ आहे. त्याबद्दल त्यांनी महाराजांशी खूप वाद घातला. महाराज सांगत की, ''भगवंताचे सर्वस्व नामात साठविले आहे. रूपाची ओळख नामानेच होते. नाम चोवीस तास चालू शकते. भगवंताचे रूप पहात असताना त्याचे ध्यान करता येणार नाही. पण नाम मात्र चालू शकेल, राहू शकेल. नाम हे रूपापेक्षा जास्त व्यापक आहे. उपाधिरहित आहे. नामाबद्दलच्या

साऱ्या शंका नाम घेत गेल्याने आपोआप नाहीशा होतात. ह्या भगवंताच्या सत्तेने आपले जीवन चालते. हे खरेपणानी एकदा पटले की तो माणूस साधू होतो. नामाने या सत्तेचा बोध होतो. म्हणून आपण नाम चालू ठेविले की आपण निमित्तमात्र आहोत हे कळते.'' हे सर्व ऐकून त्या बुवांचे समाधान झाले. मात्र वाद बराच वेळ चालला होता.

पंढरपूरला चार महिने राहून महाराज परत आले. लोकांनी त्यांचे भव्य स्वागत केले. अलीकडे ते सर्वांना सांगत असत, ''सांभाळा रे सांभाळा. आता दिवस फार वाईट येणार आहेत. महागाई वाढेल, स्वार्थ बोकाळेल. अनीती वाढेल. रोगराई पसरेल. आपण आपले नाम घ्यावे.'' केसरी वर्तमानपत्र आले की महाराज विचारीत, 'लढाई सुरू झाली का?' आणि केसरी कुणाकडून तरी वाचून घेत असत.

महाराज वेळोवेळी सांगत की जगात चांगले-वाईट सर्व असते. उजेड तेथे अंधार, मंगल तेथे अमंगल. असे जर आहे तर दृष्य वस्तूमध्ये मंगल नाही तर सूक्ष्मात असले पाहिजे. रूप हे दृष्य तर नाम हे सूक्ष्म आहे. म्हणून भगवंताच्या नामाइतके पूर्णमंगल असे दुसरे कोणतेही नाही. खरे सुख मनाच्या अवस्थेवर अवलंबून असल्याने शोध कितीही लागले तरी कोणी पूर्ण सुखी होणार नाही.

१९१३ साली दिवसांमागून दिवस जात होते. महाराजांचा दमा वाढला होता. पायावर सूज होती. आडवे झोपता यायचे नाही. होता होता मार्गशीर्ष महिन्याची पौर्णिमा आली. दत्तजयंतीचा दिवस होता.

संध्याकाळी उत्सव होता. दिवसभर महाराजांना जोराचा दमा लागलेला होता. दत्तजन्माचे वेळी महाराज मंदिरात गेले व बाळंभट तीर्थ द्यायला आले तेव्हा ते म्हणाले, ''अशीच भगवंताची सेवा करीत जा. तुम्हाला काही कमी पडणार नाही.'' बाळंभट म्हणाले, ''आपण असल्यावर मला कसे कमी पडेल?'' महाराज म्हणाले, ''अरे, कोणास ठाऊक मी किती दिवस आहे? रामाने बोलाविले की मी जाणार.''

महाराजांची शक्ती रोज क्षीण होत होती. बारकाईने पहाणाऱ्यांच्या हे लक्षात यायचे. गोपाळराव जोशी यांनी त्यांची छाती तपासली होती. विलक्षण धडधड चालली होती. पण महाराज चार-आठ दिवसात जातील असे त्यांना वाटले नाही. महाराजांचे खाणे आधीच थोडे होते. त्यात आणखीनच कमी झाले. थोडी लापशी घेत असत. पायावर सूज असल्याने उभे राहणे त्यांना जड जाई.

पंढरपूरहून आल्यावर एक दिवस डॉ कूर्तकोटींशी ते बराच वेळ बोलत होते. आपल्या आयुष्याची रूपरेषा सांगत होते. आणि म्हणाले, ''पाहा राम किती दयाळू आहे. त्याचा नामाचा प्रसार व्हावा म्हणून मी हा बाजार मांडला. पहिल्याने माल खपण्याची काळजी वाटली, पण रामकृपा एवढी झाली की पुष्कळ लोक नामाला लागले. तुमचा नामा-वर भरवसा आहे. माझा नेम नाही. म्हणून माझ्यामागे येथे राहून लोकांना नामस्मरण करायला लावावे.'' हे ऐकून डॉ. कूर्तकोटी काहीच बोलले नाहीत.

दुसरे दिवशी गावाला जाताना नमस्कार करायला गेले, तेव्हा महाराज म्हणाले, ''नामाच्या आड सर्वच गोष्टी येतात. अगदी आपण सुद्धा.''

बुधवार १७ डिसेंबर १९१३ : त्या महिन्यात म्हसवडला नेहमीची नागोबाची यात्रा भरली होती. तेथे पुष्कळ गाई विकायला येत. महाराज म्हसवडला जायला निघाले, पण म्हणाले, ''हो, आता अखेरची सेवा.'' त्यावेळी त्यांनी पुष्कळ गाई कसायांकडून पैसे देऊन सोडविल्या. तेथे ते दिवाण साहेबांना भेटले. म्हणाले, ''तुमची आमची हीच अखेरची भेट आहे. नामाला विसरू नका. जेथे नाम तेथे मी आहे.''

गुरुवार १८ डिसेंबर : सकाळी रामाचे दर्शन घ्यायला निघाले. दम्यामुळे आख्खी रात्र उभे राहून काढल्याने पायावरची सूज वाढली होती. चालण्यास त्रास होत होता. रामाचे दर्शनानंतर सिंहासनावर बसले व बोलायला लागले. लगेच देऊळ भरले. सगळ्यांकडे एकदा नजर टाकली. हसले म्हणाले, ''बघा रे बाबा, आमची जागा फार दिवस रिकामी पडली आहे. म्हणून आता रामाची चिठ्ठी आली आहे. मला जाणे आहे. तुम्ही आनंदानी मला निरोप द्या. भगवंताच्या नामाला विसरू नका. हेच माझे अखेरचे सांगणे आहे.''

आज कित्येक दिवस महाराज मी नैमिषारण्यात जाणार आहे असे बोलत होते. तसेच ते इतके हसत-खेळत सर्व गोष्टी सांगत की

महाराज देह ठेवण्याबद्दल बोलत आहेत. ते इतक्या लवकर जातील हे कोणाला खरे वाटले नाही. बत्ताशा घोडा मस्ती करत होता. म्हणून निरोप आला तर महाराज म्हणाले, ''त्याला सांग मी येतो आहे.'' तेथे गेले. बत्ताशाच्या पाठीवर थाप मारली व परत निघाले. तेव्हा तो फार अस्वस्थ झाला. मग महाराजांनी त्याला बाहेर काढला. व चांगली पाच दहा मैलाची रपेट मारून आले. तेव्हा तो शांत झाला.

गुरुवारी सकाळी त्यांनी आपण लवकरच जाणार हे अगदी स्पष्टपणे सांगितले. ते म्हणाले, ''दृश्य आज ना उद्या नाश पावते. जे घडते ते भगवंताच्या इच्छेने घडते. आपण अनुसंधानात रहावे. नामाने ते साधते, चित्त नामात गुंतले की देह प्रारब्धाचे स्वाधीन करता येतो. सदाचरणाने वागावे. संत सांगतात त्याप्रमाणे मुखात सतत नाम ठेवावे.'' त्यादिवशी संध्याकाळी महाराज भाऊसाहेबांकडे गेले. बाईंना खूप आनंद झाला. महाराज म्हणाले, ''बाई, मला खूप भूक लागली आहे. काय असेल ते खायला दे.'' महाराजांनी कोणाही जवळ काहीही वस्तू 'मला हवी' असे मागितलेले नव्हते. तहान लागली तर कधी साधे पाणीही मागितले नव्हते. पण आज भाऊसाहेबांच्या पत्नीला म्हणाले, ''मला शिळी भाकरी-आमटी चालेल'' असे म्हणून बसले. त्यादिवशी मुलांकरिता मऊ भात टाकला होता. तव्यावर थोडे पिठले टाकले व तिने दोघांना (भाऊसाहेब व महाराज यांना) वाढले.

भाऊसाहेब म्हणाले, ''आपण थोडी विश्रांती घ्यावी.'' त्यावर महाराज म्हणाले, ''भाऊसाहेब, हे सगळे हिंगजिऱ्याचे गिऱ्हाईक आहेत. प्रत्येकाला प्रपंचाकरिता देव पाहिजे. देवासाठी देव मागणारा मनुष्य भेटणे कठीण म्हणून आपण सामान्यांना तयार करावे.''

शुक्रवार १९ डिसेंबर : शाळेचे इन्स्पेक्टर काळे, महाराजांना जेवावयास बोलवायला आले. महाराजांनी प्रकृती बरी नसल्याचे सांगितले. पण ते ऐकेनात. मग दुपारी १२ वाजता भाऊसाहेब व ते दोघेच त्यांचे घरी जेवावयास गेले. काही तरी आणण्यासाठी काळे आत गेले. दोघेजण पानावर बसले होते. तोच महाराज म्हणाले, ''भाऊसाहेब, मला आता जाणे जरूर आहे. मी सोमवारी जाणार!'' भाऊसाहेबांना धक्काच बसला. ते म्हणाले, आपल्या मांडीवर मरण यावे म्हणून मी येथे येऊन राहिलो आहे.'' महाराज म्हणाले, ''तसा योग दिसत नाही.'' भाऊसाहेब म्हणाले, ''आपण जाणारच म्हणता तर मग मी कुठे राहू?'' महाराज म्हणाले, ''तुम्ही बारा वर्षे येथेच रहा.'' हे बोलणे चालू असतानाच काळे बाहेर आले आणि बोलणे तेथेच थांबले. रात्री १ वाजेपर्यंत महाराजांनी कोणाचा तरी आधार घेऊन उभ्याने भजन केले.

शनिवार २० डिसेंबर : त्या दिवशी महाराजांचे चुलत्यांची पुण्यतिथी होती. रात्री १।। वाजेपर्यंत महाराजांनी भजन केले. त्यात देहाचे अशाश्वतपण, देवावर निष्ठा, नामाचे महत्त्व, सगुणाचे प्रेम, संताचे श्रेष्ठपण याच्यावर निरूपण केले.

रविवार २१ डिसेंबर : रविवारचा दिवस उजाडला. नित्याप्रमाणे सर्वांचे व्यवहार चालले होते. सकाळी दहा वाजता महाराजांनी आउताईला बोलाविले व सांगितले की "सगळ्यांना सांग की आता भात गावाला गेला. जी भाजी भाकरी मिळेल ती आनंदाने खाऊन नाम घ्यावे आणि काळ कंठावा." असे सांगून ते खोलीत गेले व आडवे झाले. तोच बाहेर अंताजीपंत व फडके यांची काही कुरबूर झाली. महाराजांनी दोघांना खोलीत बोलाविले व कारण विचारले. ते म्हणाले, "आपण नसलात की हे असे होते." त्यावर महाराज गमतीने म्हणाले, "अहो, पण उद्या सकाळी मी इथे कुठे आहे? आपण रामाच्या घरी आहोत. जे असेल ते गोड करून घ्यावे. रामाचा प्रसाद म्हणून खावे."

बापूसाहेब खऱ्यांची सून आजारी असल्याने गोठ्यावर होती. तिला पाहण्यासाठी संध्याकाळी महाराज तिथे गेले. गोठ्याकडे एकदा प्रेमाने पाहून ते अभ्यंकराच्या झोपडीकडे गेले. तेथील गवत साफ करण्यास सांगितले तेव्हा भवानरावांनी ती जागा स्वच्छ केली. सारवली, रांगोळी घातली, खुर्ची ठेवली. महाराज खुर्चीत बसले. नंतर म्हणाले, "ही जागा फार छान आहे. इथे कायमचे येऊन राहावे असे वाटते." असे म्हणून आपल्या खडावा अभ्यंकरांपाशी दिल्या व त्यांना म्हणाले, "मी इथे रहायला येईन तोपर्यंत सांभाळून ठेवा." महाराजांना गाईचे फार प्रेम होते. कधी कधी ते गोठ्यावरच स्वयंपाक करायला

सांगत असत. म्हणून लोकांना वाटले की महाराज तेथे राहावयास येणार आहेत.

अंधार पडताक्षणीच महाराज मंदिरात आले. महाराजांना आराम पडावा म्हणून करंदीकर उपोषण करीत होते. महाराज त्यांना म्हणाले, ''अरे, उपास करू नकोस. उद्या मला बरे वाटेल.'' त्याला महाराजांनी आग्रह करून जेवावयास घातले. रात्री भजनाला उभे राहिले. ९ वाजताच मंदिर भरले. सुरुवातीला ते मागे पुढे असे करीत होते. पण नंतर एकाच ठिकाणी उभे राहून भजन करू लागले. त्यांच्या आयुष्यातील ते शेवटचेच भजन-निरूपण होते. त्रास होत असतानाही महाराज भजनात अगदी रंगून गेले. नंतर निर्वाणीचे अभंग सांगितले.

श्रीरामा निरोप द्यावा। देई अखंडीत सेवा।।
ब्रीद राखी रघुराज। हेचि सांगतसे तुज।।
दीनदासाची विनवणी। आज्ञा द्यावी चक्रपाणी।।

भगवंताच्या नामाला विसरू नका हे सांगताना ते म्हणाले,

''आजवरी तुम्हा सांगितली मात।
नामाविण हीत समजू नका।।
मानू नका नाम साधन लहान।
तुम्हा माझी आण जीवे भावे।।
मानू नका सार संसार असार।
दृश्य जोजार मानू नका।।

सोडू नका नाम धरू नका काम।
नाही नाही नेम आयुष्याचा।।
दीनदास म्हणे सांगतो ते ऐका।।
अभ्यास वैखरी सोडू नका।।''

महाराजांच्या सांगण्याच्या भाषेमध्ये त्या दिवशी इतका भाव ओसंडत होता की ऐकणारांचे डोळे पाणावले होते. भजन होता होता रात्रीचा एक वाजला.

सरली आयुष्याची गणना। आता येणे नाही पुन्हा।।
तुझ्या पायी मन राही। हेचि सुख आम्हा देई।।
तुझ्या पायी पडली मिठी। आता जातो उठा उठी।।
दीनदास म्हणे रघुनाथा। आज्ञा दावी मज आता।।

हा अभंग म्हणून अतिशय प्रेमाने त्यांनी रामाकडे पाहिले. आणखी एक अभंग म्हणून 'आमचा राम राम घ्यावा' हे जणू स्पष्ट सुचविले. लोक अस्वस्थ झाले. लोकांना रडता येईना आणि दुःख मनात सामावेना. रात्रीचा १।। वाजला. महाराजांनी रामाकडे प्रेमाने पाहिले. नमस्कार केला व शेवटचा अभंग म्हटला,

भजनाचा शेवट झाला। एक वेळ राम बोला।।
अति पुण्य पर्वकाळ। पुन्हा नाही ऐसी वेळ।।
रामनाम वाचे बोला। आत्मसुखामाजी डोला।।
दीनदास सांगे निका। रामनाम स्वामी शिक्का।।

सोमवार २२ डिसेंबर : रविवार रात्रीचा १।। वाजून गेला. रामाची आरती झाली. सर्व लोकांना प्रसन्नतेने निरोप दिला. दर्शनासाठी एक बाई आली होती. तिचे डोळ्यात पाणी आले. महाराज म्हणाले, "माय असे का?" तिने उत्तर दिले, "महाराज, आपण आता जाणार आणि तेही एक दोन दिवसांतच हे नक्की समजले आहे." तिला पुढे बोलू न देता महाराज म्हणाले, "माय, देव ठेवील तसे रहावे. आणि बोलावणे येताच आनंदाने जावे." असे म्हणून महाराज खोलीत गेले. ३/४ मंडळी जागत होती. महाराज पलंगावर तक्क्याला टेकून बसले. नंतर थोड्या वेळाने आडवे झाले. ते उताणेच निजले होते. चेहरा शांत, प्रसन्न होता. चार वाजण्याच्या सुमारास ते डाव्या कुशीवर वळले आणि प्रेमाने 'श्रीराम श्रीराम' म्हणाले. पाच मिनिटांनी उठून बसले. महाराजांना बरे नाही म्हणून ४/५ मंडळी खोलीत जागत होती. महाराजांनी सिद्धासनावर बसून डोळे झाकले होते. ते योग्यासारखे दिसत होते. सव्वा पाच वाजता समाधी उतरली. ते म्हणाले, "वामनराव, शौचमुखमार्जन उरकून घेऊ." अंगात कफनी, डोक्याला उपरणे, पायांत वहाणा होत्या. पंधरा मिनिटांनी ते परत आले. हातपाय धुऊन त्यांनी रामाला साष्टांग नमस्कार घातला. रामाला म्हणाले, "माझ्या माणसांना सांभाळ." आणि अम्माला म्हणाले, "रामाची ही अखेरची सेवा, बरे का." खोलीत आल्यावर पुन्हा आसन घालून बसले. इतक्यात वामनरावांनी पायावर डोके

ठेविले. तेव्हा महाराजांनी आपला हात त्यांचे डोक्यावर ठेवला व प्रेमाने म्हणाले, ''जेथे नाम तेथे माझा प्राण। ही सांभाळावी खुण।।'' हे पाहून इतरांनीही त्यांच्या पायावर डोके ठेवले. त्यांच्या त्यांच्या डोक्यावर महाराजांनी हात ठेवला पण शब्द बोलले नाहीत. महाराजांनी डोळे झाकून घेतले. ती अमृतवेळा होती. त्यांचा श्वास जोराने बाहेर पडू लागला, म्हणून भाऊसाहेबांना बोलाविले. भाऊसाहेबांनी जोशींना बोलाविले, पण ते येण्याआधीच महाराजांनी आपली प्राणज्योत मालवून टाकली होती. अशा तऱ्हेने सहाला दहा मिनिटे कमी असताना गोंदवल्याचा हा अध्यात्मसूर्य मावळला आणि तो कायमचाच.

हा महापुरुष अनंतात विलीन झाला. महाराज जेथून आले होते तेथे परत गेले.

सोमवारचा दिवस कसा उजडणार ही कल्पना भाऊसाहेबांना होतीच. डॉक्टरांनी नाडी पाहिली आणि त्यांना पलंगावर नीट निजविले. सर्व मंडळी दुःखसागरात बुडून गेली.

कोणाला वाटले, ही महाराजांची समाधी असेल, पण ती 'महासमाधी' होती. नंतर त्यांना रामापुढे आणून निजविले. लगेच सगळीकडे ही वार्ता पसरली. सगळे लोक जमू लागले. सर्वांना फार वाईट वाटत होते. आपला मायबाप हरपला. अकारण अत्यंत प्रेम

करणारा हरपला. आपले सुखदुःख जिथे मोकळेपणाने सांगावे तोच हरपला. गोंदवले दुःखात बुडून गेले.

महाराजांचा चेहरा शांत दिसत होता. आता पुढचा विचार म्हणून भाऊसाहेबांनी तारा करण्यासाठी दहीवडीला मनुष्य पाठविला. बारा वाजून गेल्यावर मुक्ताबाईची समजूत घालून, भात-पिठले करवून आजारी माणसे आणि मुलांना दिले.

नागप्पा ब्रह्मानंदांना सांगण्यासाठी गेला तर ते वाटेतच भेटले. बातमी कळल्यावर ते मटकन खालीच बसले आणि मोठ्याने रडू लागले; ''नागप्पा, महाराज हे चालते बोलते ब्रह्म होते. दोन रुपयाचे तिकीट काढले की ते डोळ्यांना पाहायला मिळत होते.''

नंतर तीन दिवस ते कुठेतरी गुप्त राहिले. सोमवारचा दिवस त. गेलाच श्री ब्रह्मानंद येण्याचे चिन्ह दिसेना. मग मात्र भाऊसाहेब केतकरांनी पुढाकार घेऊन त्या दिवशी अंत्यसंस्कार करावयाचे ठरले. रविवार-संध्याकाळचे महाराजांचे शब्द आठवून गोठ्याच्या जवळ तेथेच दहन करावयाचे ठरविले. शोभिवंत विमान करून त्यात देह बसवून बुक्का लावला. गळ्यात मोठा तुळशीचा हार घातला. पूजा आरती केली आणि 'जानकी जीवन स्मरण जय जय राम' म्हणून विमान सर्वांनी मिळून उचलले. भजन अखंड चालूच होते. महाराजांच्या चुलत भावाने संस्कार केले. महाराजांचा कुत्रा चितेभोवती घिरट्या घालत होता. संध्याकाळी ७ वाजता चिता शांत झाली.

ज्यांनी कोणाचे मन कधीही दुखविले नाही, कोणाजवळ काही मागितले नाही, सर्वांवर अत्यंत प्रेम केले, ज्यांना दुसऱ्याचे दुःख पाहवले नाही, ते महाराज सर्वांना दुःखसागरात लोटून निघून गेले. नंतरची संस्थानची सर्व व्यवस्था ब्रह्मनंदांनी लावून दिली, ती तशीच आजतागायत चालू आहे. संतांचे सामर्थ्य त्यांचे समाधीजवळ जास्त प्रमाणात असते. त्या सामर्थ्यावरच अनेक अद्‌भुत गोष्टी होत असतात आणि सर्वांना शांतीपण मिळते.

।। श्रीराम ।।

महाराज म्हणतात :

१) शंकरशास्त्री म्हासूर्णेकर नावाचे महाराजांचे एक मोठे विद्वान भक्त होते. त्यांना महाराजांचे उपकार आठवून भरून आले. व काही सेवा व्हावी असे वाटले. त्यांना काव्य करता येत नव्हते. ध्यान करून ते झोपले. स्वप्नात महाराज सिंहासनावर बसलेले दिसले. त्यांनी पूजा केली. आणि सहा श्लोक सुचले. जाग आल्यावर त्यांनी ते लिहून ठेवले व अजून श्लोक केल्यास अष्टक होईल, असे वाटून कसेतरी करून दोन श्लोक केले. गोंदवल्याला गेल्यावर त्यांनी महाराजांना ते श्लोक दाखविले. महाराजांनी शेवटच्या दोन श्लोकांवर काट मारली व म्हणाले, ''राम देतो तेवढ्यावरच समाधान मानायला शिकावे. रामाचे देणेच तेवढे हिताचे असते. आपले देहबुद्धीचे लोढणे त्याच्याखाली जोडू नये.''

२) एकदा महाराज म्हणाले, ''जो पंत असेल तोच संत बनेल.'' कसे ते त्यांनी दाखविले. गुरूंच्या पुण्यतिथीला सर्वजण भिक्षेस निघाले. गावात भिक्षा मिळाली. मग ओढ्याच्या कडेला राहात असलेल्या रामदासी बुवाकडे सर्व गेले. त्याने नियमानुसार चार घरी भिक्षा मागून आणली होती. ती सर्व त्याने महाराजांच्या झोळीत रिती केली. आज त्याला उपवास घडणार होता. पण त्याची त्याला पर्वा नव्हती. तो साडेतीन कोटी जप करण्याकरता तेथे राहिला होता. महाराज म्हणाले, ''हा खरा पंत आहे. बाकीच्यांनी आपल्याला

शिल्लक ठेवूनच भिक्षा घातली. याचे तसे नाही. हा उदार मनुष्य आहे. हा भिक्षेकरी असला तरी पंत आहे.'' पुढे म्हणाले, ''प्रापंचिक माणसाने घरात असलेले सर्वच्या सर्व देऊन टाकू नये, ही गोष्ट खरी. पण प्रसंग पडला तर सर्व देण्याची तयारी पाहिजे हेही खरे. थोर मनाच्या माणसालाच परमार्थ साधतो.''

३) धाकट्या राममंदिराची स्थापना केली तेव्हा गायत्री पुरश्चरण व रुद्रस्वाहाकार करविला होता. पुष्कळ ठिकाणचे वैदिक विद्वान बोलविले होते. महाराज नामाचे महत्त्व सांगतच होते. एका वाईकर गुरुजींना ते न पटून त्यांनी लेले शास्त्री यांना पत्र लिहिले व परचुरेशास्त्री यांचेकडून महाराजांना पत्र पाठविले. त्यात लिहिले होते, ''वैदिक कर्म खरे महत्त्वाचे व पवित्र असताना रामनामाचे बंड वाढविणे हे अवैदिक व अशास्त्रीय आहे.'' नामाचे महत्त्व पटविण्याकरिता महाराजांनी एक सभा बोलविली. त्यात विद्वान पंडित म्हणाले, ''वेदांची आज्ञा ही देवाच्या शब्दापेक्षाही श्रेष्ठ आहे. वैदिक कर्म केल्यावाचून चित्तशुद्धी होत नाही. पण ज्यांना अधिकार नाही त्यांनी रामनाम घ्यावे.'' नंतर महाराज सर्वांना नमस्कार करून म्हणाले, ''वैदिक कर्माने चित्तशुद्धी होते हे मी मान्य करतो. परंतु ज्या भगवंताची प्राप्ती व्हावी म्हणून चित्तशुद्धी करावयाची त्या भगवंताचे अधिष्टान जर वैदिक कर्मांना नसेल तर कर्ममार्गाचे पर्यवसान कर्मठपणामध्ये होते. सध्या वैदिक कर्मे जशी व्हायला पाहिजेत तशी होत नाहीत. म्हणून आपण कर्ममार्गाने जात असता कर्माची पूर्तता होण्यास नामाची गरज आहे. 'एक रामनाम घेतले की सर्व धर्मबंधने माफ होतात' हा समज खरा नाही परंतु कर्माने चित्त शुद्ध होत असता नामाने भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव जागृत राहाते. इतकेच नव्हे, तर पूर्ण

चित्तशुद्धी होऊन कर्म गळून गेल्यावर फक्त नामच शिल्लक राहते. आणि भगवंताशी एकरूप झाल्यावर ते त्यामध्ये मुरून जाते.''

एक शास्त्री म्हणाले, रामनाम हा मुळी शास्त्रीय मंत्रच नाही. महाराज म्हणाले, ''रामनाम हा नुसता मंत्र नसून सिद्धमंत्र आहे. तो भगवंतापर्यंत नेतो. नव्हे नव्हे, त्याला खेचून आणतो हा माझा प्रत्यक्ष अनुभव आहे. वाटेल त्याने नामाच्या या सामर्थ्याचे प्रत्यंतर पहावे. रामनाम देहबुद्धी जाळणारा अग्नी आहे. रामनाम हे ओंकाराचेच स्वरूप होय. शंकरापासून रामदासापर्यंत सर्वांनी रामनाम कंठी धरिले. रामनामाचा साडेतीन कोटींचा जप त्याला देवाचा अनुभव येईल.''

४) महाराजांना शांती नावाची मुलगी होती. ती १।। वर्षाची होती. तिच्या मावशीने तिला तुळशीवृन्दावनाजवळ नेले. प्रदक्षिणा संपल्यावर आपल्या गळ्यातील पुतळ्याची माळ शांतीच्या गळ्यात घातली. महाराज म्हणाले, ''शांती, तुझ्या गळ्यातील माळ मला दे.'' तिने लगेच देण्यासाठी माळेला हिसका दिला. मावशीने माळ शांतीच्या हातात दिली. महाराज म्हणाले.''तुला माळ नको ना?'' लगेच तिने तुळशीपत्र तोडून माळेवर ठेवले. महाराज म्हणाले, ''शांते, भाग्याने लाभलेली संगती तुझे कल्याण करील.'' पुढे सहा महिन्यांनी ती मुलगी वारली.

महाराज म्हणाले, ''कोणाच्या पोटी कोण जन्म घेतो हे सामान्यांना कळणे शक्य नसते. फक्त सत्पुरुषांनाच ते कळते. पुष्कळ वेळा चांगले अधिकारी जीव एखाद्या लहानशा वासनेमुळे अडकून पडतात. मग ते अध्यात्मदृष्ट्या चांगल्या कुळात जन्म घेतात. तेथे त्यांची वासना लवकर तृप्त होते. म्हणून लहानपणीच ते जग सोडून

जातात. त्यांच्या मृत्यूचे दुःख करणे बरोबर नाही. वासना केव्हा आपला घात करेल याचा नेम नसतो. त्यासाठी सामान्य माणसाने भगवंताला शरण जावे व नामाचा आधार घट्ट धरावा. म्हणजे वासनेचे आपोआप तळपट होते.

मंदिराजवळ आले. दोन वाटसरू झोपले होते. त्यांना म्हणाले, ''बाहेर पाऊस पडत आहे. रात्री एखादेवेळी भिंत वगैरे पडेल. तुम्ही मंदिरात चलावे.'' एक वाटसरू मुकाट्याने उठला व मंदिरात आला. दुसरा एक रात्र तर काढायची आहे म्हणून तिथेच झोपला. रात्री तीनचे सुमारास भिंत पडून तो त्याखाली चिरडून मेला. ही गोष्ट महाराजांना समजताच महाराज म्हणाले, ''अरे मी त्याला रात्री सूचना देऊन आलो होतो. माणसाचे असेच असते. सत्पुरुषाजवळ राहून जर मनुष्य आज्ञापालन शिकला नाही, तर तो काहीच शिकला नाही. जो आज्ञापालन करील त्याला सुद्धा भोग भोगावे लागतील हे खरे, परंतु ते त्याच्या सोयीने भोगण्याची व्यवस्था होईल. प्रारब्धाचा जोर मोठा विलक्षण आहे. भोग भोगण्याचा समय आला की तो प्रथम बुद्धीवर परिणाम करतो. तेथे आपण सावध राहून सत्पुरुषांच्या सांगण्याप्रमाणे वागलो पर प्रारब्धाचा जोर मंदावल्यावाचून राहणार नाही.''

६) महाराजांचा एक दुरचा नातेवाईक व्यापार करण्याकरिता महाराजांचे जवळ पैसा मागायचा व नंतर परत करायचा नाही. महाराज त्याला नेहमी सांगत की 'रामराम' म्हण. एकदा तो पैसे मागायला आला असताना महाराज म्हणाले, ''अरे, धंदा तू करणार, बुडणार मी. बस् झाले हे. आता राम राम म्हणायचा धंदा कर.'' तो म्हणाला,

''शेवटी मनुष्य राम म्हणतोच.'' महाराज म्हणत, ''अरे, जिवंतपणी तू फक्त एकदा 'राम' म्हण. राम तुझे कल्याण करील.''

एकदा तो तापाने आजारी पडला. सारखा 'रामा, रामा' असे म्हणत होता. महाराज म्हणाले, जरी निंदा केली तरी त्याचे माझ्यावर खरे प्रेम आहे. पण त्याची प्रेम करायची तऱ्हा वेगळी.'' तेवढ्यात त्याच्या मृत्यूची बातमी आली. महाराज म्हणाले, ''पहिल्याने प्रपंचातली वस्तू हवी म्हणून भगवंतावर प्रेम करायला लागावे. चिकाटीने ते वाढवावे. म्हणजे नंतर वस्तूचे महत्त्व निघून जाते आणि भगवंत तेवढा शिल्लक राहतो. तसे त्याचे झाले. आणि भगवंताला एकदा धरला की वाटेल त्या परिस्थितीतही त्याला सोडू नये. हे नाम घेतल्याने साधते. म्हणून नाम घेत जा असे मी सतत सांगत असतो.''

७) महाराजांना खूप लोक भेटवस्तू देत असत पण महाराज त्या सर्व वाटून टाकत असत. दुसऱ्या आईसाहेबांनाही बरीच लुगडी, भांडी, खण, दागिने येत असत. त्या ते सगळे ट्रंकेत साठवून ठेवायच्या. महाराजांच्या हे लक्षात आले. व त्यांनी सुचविले, ''लोक जसे आपल्याला आपण न मागता देतात तसे आपण देखील आप्तइष्टांना आणि गरीब लोकांना ते मागत नसता आपल्या जवळच्या चांगल्या वस्तू द्याव्यात.''

८) रामनवमीच्या उत्सवात जागरण व इतर कामे करून माणसे खूप दमली होती. भाऊसाहेब फॉरेस्ट म्हणाले, ''महाराज उत्सवामध्ये प्रत्येकाला पुष्कळ श्रम होतात याचा प्रत्यक्ष फायदा काय होतो?'' महाराज उत्तरले, ''कोणत्याही देवाच्या उत्सवाचा मुख्य हेतू हा की आपल्याला त्याचे स्मरण अधिकाधिक व्हावे. भगवंताचे स्मरण हे

भगवंताच्या प्राप्तीसाठीच करायचे असते. परंतु भगवंताचे नाम सर्व प्रकारच्या दुरितांचा नाश करते.''

९) इन्स्पेक्टर मोठे कडक होते. त्यांचे घरी एकदा चार बडी मंडळी जेवावयास आली. बायकोला तूप वाढायला उशीर झाला. म्हणून ते ओरडले. महाराजांसकट सगळीच मंडळी पानावर बसली होती. त्यांचा विरस झाला. त्या बाईच्या तर डोळ्यांत पाणीच आले. काळ्यांना आपली चूक समजली. संध्याकाळी त्यांना महाराज सहज म्हणाले, '' परमार्थ साधण्यासाठी विकार नाहीसे करायचे नसतात, पण ते पूर्णपणे ताब्यात मात्र ठेवावे लागतात. क्रोधाने साधकाची फार मोठी हानी होते.''

१०) काशीमध्ये महाराजांच्या प्रेमातला एक पंडित होता. त्याला वादाची फार हौस होती. त्याचा भाऊ एकदा आजारी पडला. त्याची लघवी अडली. कोणत्याही औषधाने बरे वाटेना. तो महाराजांकडे अंगाऱ्यासाठी आला. महाराजांनी त्याला वादात एवढा गुंतवला की त्याला कशाला आलो हे सांगण्याची संधीच दिली नाही. नंतर बऱ्याच वेळाने त्याला विचारल्यावर कारण समजले. महाराज म्हणाले, ''अरेरे, तुमच्या वादाच्या हौसेने दोघेही फसलो. वाद करण्यापेक्षा नाम घेतले असते तर रामाला आपली करूणा आली असती. पण जा. राम दयाळू आहे. तुमच्या भावाला बरे वाटेल.'' त्याप्रमाणे त्याच्या भावाला बरे वाटले. लघवी सुटली. तो भाऊ म्हणाला, ''महाराज स्वतः आले. माझ्या कानात 'राम राम' म्हणाले व निघून गेले.'' ही हकीगत समजताच महाराज म्हणाले, ''नामाने जे काम होते ते जगामध्ये कोणालाही, प्रत्यक्ष भगवंतालाही, करता येत

नाही. इतःपर वादाच्या ऐवजी नामाची हौस बाळगावी. विद्वत्तेचा उपयोग नामाची निष्ठा वाढविण्याकडे करावा. आधी नाम घ्यावे मग वाटेल तर विद्वत्ता मिळवावी. पण ज्याला नामाची चटक लागली तो इतर भानगडीत पडतोच कशाला!''

११) महाराजांचे जवळ शिल्लक काहीच नसे. एकदा काशीमधील उत्तम अशा शंभर शास्त्री-पंडितांना त्यांनी जेवायला बोलाविले. यादी तयार झाली. दोनशे रुपये पाहिजे होते. महाराज सगळ्या पंडितांना एकेक वस्त्रही देणार होते. महाराजांनी त्यांच्या फरगुलच्या खिशात हात घातला. काहीही नव्हते. महाराज म्हणाले, ''अरेच्या आता काय आपापल्या कुवतीनुसार पैसे दिले. पण १८० रुपयेच जमले. महाराज म्हणाले, ''हरिपंत, आपल्या गादीखाली पाहा हो जरा.'' आणि काय आश्चर्य! तेथे नेमके दोनशे रुपये मिळाले. महाराज म्हणाले, ''ज्याच्या नावाने काम चालते त्याला लाज. खऱ्या प्रेमाने जर आपण आपला भार रामावर टाकला तर तो नेहमी आपल्या कल्पनेबाहेर गोष्टी घडवून आणतो, असा माझा अनुभव आहे. आपला देह व आपला प्रपंच भगवंताच्या सत्तेने चालतो ही जाणीव सतत ठेवून जगात वागावे म्हणजे आपल्याला कधी कमी पडणार नाही.'' महाराजांनी लोकांकडून घेतलेले सर्व पैसे ज्याचे त्याला परत केले व सर्वांना पोटभार अन्नदान केले.

१२) हर्द्याला असताना दामुअण्णा नावाचे एक विद्वान गृहस्थ महाराजांचे नाव ऐकून त्यांचे जवळ राहायला आले होते. एके दिवशी

स्वयंपाकाच्या बाई येऊन महाराजांना म्हणाल्या, ''आज रामरायाला नैवेद्याला भाजी नाही.'' महाराज म्हणाले, ''तुम्ही बायका संसार असाच करता का? आता मी भाजी कोठून आणू?'' माळ्याला विचारले तर तो म्हणाला, ''सध्या कोणतीही भाजी बागेत नाही. वांगी आत्ताशी फुलावर आली आहेत.'' महाराज म्हणाले, ''अरे, फूल आहे तिथे फळ असलेच पाहिजे. चल मळ्याकडे'' असं म्हणून महाराज वांग्याच्या वाफ्यात रोपांमध्ये जाऊन उभे राहिले व माळी एकेका रोपाकडे पाहून थक्क झाला.

रोजचे निरूपण दामुअण्णा ऐकत असत. दामुअण्णांना शंका फार होत्या. त्यांच्या सर्व शंका महाराज नाथांची ओवी घेऊन आपणच दूर करीत. त्यांच्या सर्व शंका अशा प्रकारे फिटल्या. महाराज म्हणाले, ''शंका ही फार चिवट आहे. ती मारता मरत नाही. शिवाय काही शंका आचरणाने आणि अनुभवानेच नाहीशा होतात. म्हणून मनात शंका असल्या तरी नाम सोडू नये. नाम सतत घेत गेल्याने मन स्वच्छ होत जाते आणि शंका आपोआप विरून जातात.''

१३) हर्दा येथे एक सात्त्विक भटजी राहात होते. त्यांना महाराज म्हणाले, '' जो साडेतीन कोटी जप करील त्याला रामाच्या प्रेमाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही.'' भटजींनी जप सुरू केला. पण देवदर्शन झाले नाही. महाराज रोज, देवाचे दर्शन म्हणजे काय? प्रेमाचा अनुभव कसा असतो, जप किती, कसा करावा, वगैरेवर विवरण करीत. एक दिवस हे बुवा हट्टाला पेटले. त्यांची झोप उडाली होती.

उन्माद होऊ पाहात होता. ते म्हणाले, "मला आज देव दाखवा. नाहीतर मी जेवणार नाही. विहिरीत जीव देईन." असे म्हणून विहिरीच्या काठावर जाऊन बसले. महाराज तेथे आले. त्यांना सांगून पाहिले. काही परिणाम होईना. एकच हट्ट-'देव दाखवा.' शेवटी महाराजांनी पायातील खडावा काढली आणि त्यांचे डोक्यावर सटासट मारली. हे झाल्यावर भटजी ओरडू लागले, "रामा, धाव रे धाव." महाराज म्हणाले, "माझ्या रामाचे नाव का घेतोस?" आणखी मारले. भटजींचे डोळ्यांतून खूप अश्रू आले. आणि ते मोकळे झाले. त्यांना प्रेमाने पोटाशी धरून म्हणाले, "आज ह्यांच्या डोळ्यांतून पाणी आले नसते तर हा वेडा झाला असता. उन्मादवायू डोक्यात शिरत होता. माझा नाइलाज झाला." आणि पुढे म्हणाले, "भगवंत हा हट्टाने किंवा उगीच केलेल्या कष्टाने साध्य होत नाही. तो एका प्रेमानेच वश होतो. प्रेमामध्ये हट्ट आणि कष्ट झाले तर ते शोभतात आणि हिताचे होतात. आपण भक्तांचे प्रेम न पाहता नुसताच त्यांचा हट्ट व कष्ट तेवढे पाहातो. परमार्थ आपोआप वाढावा. त्याला ताण देऊन वाढवू नये."

१४) गंगूबाईकडून एकदा चुकून बासुंदीमध्ये केशर-वेलदोड्याच्या ऐवजी हिंगाची पूड पडली. बासुंदी भरपूर केलेली होती. लगेच त्यांनी जाऊन महाराजांजवळ ही गोष्ट सांगितली. म्हणाल्या, "बासुंदी अजून नासली नाही पण नासेल." हे ऐकून महाराज म्हणाले, "एवढेच ना. घाबरायचे कारण नाही. राम सगळे नीट पार पाडील." सर्वांना जेवताना आग्रह करकरून बासुंदी वाढली.

कोणालाही हिंगाचा वास आला नाही. पातेल्यात हिंगाची गोळी बनून खाली बसली होती. गंगूबाईंनी ही हकीगत महाराजांचे कानावर घातली. ते म्हणाले, "परमात्मा अत्यंत दयाळू आहे. निस्वार्थीपणाने आपण लोकांच्या उपयोगी पडत असू आणि आपल्या हातून न कळत चूक झाली तर तो खात्रीने मधे पडून ती सुधारून देतो. लोक याला चमत्कार म्हणतात. आपण आपला देह मनाने एकदा भगवंताला अर्पण करून टाकावा. मुखाने त्याचे नाम अखंड घ्यावे आणि शक्य तेवढे लोकांसाठी झिजत जावे. तेथे काहीही कधीही कमी पडायचे नाही, असा माझा अनुभव आहे."

१५) एकदा एकादशीला चूल बंद ठेवून रामासमोर भजन करायला सर्वांना महाराजांनी बसविले. दुपारी सर्वांना उपास घडला. नंतर ते म्हणाले, "आता रामासमोर जप करीत बसा. तो काहीतरी खायला देईलच." साडेचार वाजता एक शेतकरी उकडलेल्या रताळ्यांची भरलेली गाडी घेऊन आला. उत्पन्नाचा दहावा हिस्सा महाराजांना अर्पण करण्याचा त्याचा नवस होता. सर्वांना पोटभर खायला मिळाले. महाराज म्हणाले, "भगवंताचे स्मरण करणाऱ्याला देह धारणेपुरते अन्न व वस्त्र मागण्याचा पूर्ण हक्क आहे. जास्त लोभ मात्र नसावा. म्हणजे भगवंत खात्रीने देतो."

१६) एकदा महाराज स्नान करून उन्हात उभे होते. इतक्यात एक कुणबी आला व शिंगणापूरला जाण्यासाठी तीन रुपये मागू लागला. महाराज म्हणाले, "मी कुठून तुला पैसे देऊ?" पण तो

ऐकेना. मग कमरेंकडे हात नेऊन दोन रुपये काढून दिले. ''आत्ता एवढेच आहेत. परत करायला विसरू नकोस.'' असे म्हणाले. तो निघून गेला. महाराज म्हणाले, ''गृहस्थाश्रमी माणसाने असा नियम ठेवावा की जो कोणी काही मागायला येईल त्याला 'नाही' म्हणू नये. आपल्याजवळ जे असेल त्यातले थोडे तरी द्यावे. अन्न द्यायला कधीच मागे पुढे पाहू नये. पैसे देताना मात्र आपली परिस्थिती पाहून आणि त्याचा हेतू पाहून तो मागेल त्याच्यापेक्षा जरा कमीच द्यावे. पण नाही म्हणणे चांगले नाही.'

महाराज म्हणतात :

राम नाम, अन्नदान, सगुणाची भक्ती।
हीच परमार्थ साधण्याची युक्ती।।
मुखात नाम, हाती काम, कर्ता राम।
हेच साधनात साधन जाण।।

◆◆◆

''श्रीराम समर्थ''

चाल - (घाव घालून पहा एकदा सोशील सारे घण)

राम नाम हे मधूर अमृत थोडे पीत जावे।
मनुजा, थोडे पीत जावे।।
त्यावाचुनी हे सर्व जिणे मग व्यर्थचि समजावे
मनुजा, व्यर्थचि समजावे।
रामनाम हे वाचे वदुनी आनंदित व्हावे

मनुजा, आनंदित व्हावे।
लोभ मोह ह्या दोघांचा करि नामामृते घात
समूळ करी नामामृते घात।
राम नाम हे अखंड वदत, राम करी साथ
निरंतर राम करी साथ।
हृदय मंदिरी शामवर्ण तो राम आठवावा
काहिवेळ राम आठवावा।
संसाराच्या दुःखाचा मग विसरचि पाडावा
काहि वेळ विसरचि पाडावा।।

◆ ◆ ◆

श्रीराम राम जय बोला हो, जय कृष्ण-कृष्ण बोला हो।।धृ.।।
राम कृपेने उठता बसता, राम नामे भवसागर तरता
का नच हृदयी स्मरत हो, जय कृष्ण कृष्ण बोला हो।।१।।
नाम स्मरता येत विरक्ति, विरक्तीत हो भगवत् प्राप्ती
का नच हृदयी स्मरत हो, जय कृष्ण कृष्ण बोला हो।।२।।
नामामध्ये राम राहतो, शुद्ध भक्तिला सदैव भुलतो
का नच हृदयी स्मरत हो, जय कृष्ण कृष्ण बोला हो।।३।।
नश्वरता देहाची जाणता, कथा पुराणे रोज ऐकता
संसारी का रमता हो, जय कृष्ण कृष्ण बोला हो।।४।।

।। श्रीराम ।।

◆ ◆ ◆



श्रीक्षेत्र गाणगापूर येथील श्रीदत्त-समाधिमंदिर